16-04-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SSK/ 10:00

16-04-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SSK/ MAP/ KGS/ 10:00

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती.

उपसभापती : विधानपरिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाद्वारे पारित कलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : (अ) खालील विधेयक विधानसभेने सुधारणेसह संमत केले.

सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक-1 महाराष्ट्र विद्यापीठ(सुधारणा)विधेयक,2005

(ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

1. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक-31 - महाराष्ट्र पुरवणी(विनियोजन) विधेयक 2005
2. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 42-महाराष्ट्र करविषयक कायदे(कर बसविणे,सुधारणा व विधी ग्राहयीकरण)विधेयक 2005
3. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक-39 -महाराष्ट्र विनियोजन(लेखानुदान) विधेयक,2005
4. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 28-महाराष्ट्र मूल्यवर्धित कर(सुधारणा) विधेयक,2004
5. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 43-महाराष्ट्र मूल्यवर्धित कर(कर बसविणे व सुधारणा) विधेयक,2005

(क) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली.

सन 2002 चे वि.स.वि.क्रमांक-60 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर(सुधारणा) विधेयक,2002.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. नतिकोद्दीन खतिब : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या तत्कालिन मा.गृहराज्यमंत्री(ग्रामीण) यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम 178(1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन विधेयक

मु.शी.: सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-15 महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंसबंधी प्रस्ताव

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री): सभापती महोदय, सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 15- शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयय यावर विचार करण्याकरिता नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावा असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक.

मु.शी.: सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक-20 - विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

श्री. दिलीप वळसे-पाटील(उच्च शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक-20 राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजाचे व कार्याचे विनियमन करण्यासाठी तसेच त्यांच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावा असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यापीठ(सुधारणा) विधेयक

मु.शी : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक-1 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम ,1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यास विधानसभेने केलेल्या सुधारणांना विधानपरिषदेने सहमती देण्याबद्दल विनंती करणारा विधानसभेचा संदेश व व तत्संबंधीचा प्रस्ताव.

उपसभापती : विधानसभेकडून एक संदेश आला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

संदेश

सचिव : मला आपणांस असे कळविण्याचा निदेश आहे की, महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक 24 मार्च,2005 रोजी पारित केलेले वि.प.वि.क्रमांक-1 महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,2005 यात विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांसहित दिनांक 12 एप्रिल,2005 रोजी पारित केले आहे. सुधारणांची यादी सदस्यांना वितरित करण्यात आली आहे. या सुधारणांना विधानसभेने विधानपरिषदेची सहमती मागितली आहे.

अ.क्र.1,खंड 2 : पृष्ठ क्रमांक 2,-

ओळ क्रमांक 2 व 3

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

अ.क्र.2,खंड 2 : पृष्ठ क्रमांक 2,-

ओळ क्रमांक 5,-

"संत गाडगे महाराज विद्यापीठ"या मजकूराऐवजी "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

अ.क्र.3,खंड 3 : पृष्ठ क्रमांक 2,-

(अ) ओळ क्रमांक 10,-

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ब) ओळ क्रमांक 11,-

"संत गाडगेमहाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री): सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक-1 महाराष्ट्र विद्यापीठ(सुधारणा) विधेयक,2005 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक यास विधानसभेने सुचविलेल्या सुधारणा विचारात घेण्यात याव्यात असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

अ.क्र.1,खंड 2 : पृष्ठ क्रमांक 2,-

ओळ क्रमांक 2 व 3

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

अ.क्र.2,खंड 2 : पृष्ठ क्रमांक 2,-

ओळ क्रमांक 5,-

"संत गाडगे महाराज विद्यापीठ"या मजकूराऐवजी "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

अ.क्र.3,खंड 3 : पृष्ठ क्रमांक 2,-

(अ) ओळ क्रमांक 10,-

"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(ब) ओळ क्रमांक 11,-

"संत गाडगेमहाराज विद्यापीठ" या मजकूराऐवजी "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर): सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मांडलेल्या विधेयकाबद्दल शासनाला मनापासून धन्यवाद देण्यासाठी मी येथे उभा आहे. महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक 2005 सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव नागपूर विद्यापीठाला आणि संत गाडगे बाबा यांचे नाव अमरावती विद्यापीठला देण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. त्याबद्दल शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत. विद्यापीठाला जरी नवीन नाव देण्यात येत असले तरी जुन्या नावाची कन्टीन्युईटी कायम राहिली पाहिजे. पाच दहा वर्षानंतर जुने नाव जाऊन सर्वाना नवीन नावाचा परिचय होतो परंतु तोपर्यन्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक समस्यांना त्या विद्यापीठांना तोंड द्यावे लागते तेव्हा जुन्या नावाची कन्टीन्युईटी कायम राहून संत गाडगे महाराजांचे नाव अमरावती विद्यापीठाला आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव नागपूर विद्यापीठाला देण्यात येणार आहे.महाराष्ट्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांचे नाव या विद्यापीठांना दिल्यामुळे त्यांचे जे स्मरण केले जाईल ते स्मरण चिरंतर राहील. गाडगे बाबा यांना " बाबा "म्हटले जाते परंतु तर्कशास्त्र आणि विचार यांच्या आधारावर त्या वेळी त्या समाजाची काय गरज होती याचे उत्तम संशोधन करुन समाजा समोर उत्तम शिकवणूक देणारा अनेक शतकात न झालेला असा हा थोर पुरुष होता. विशेष म्हणजे ते निरक्षर होते. ते काही सुशिक्षित नव्हते. परंतु त्या वेळच्या समाजाची त्यांना उत्तम जाण होती. ते कामाची सुरुवातच असे सांगून करीत होते की, " मी कोणाचा गुरु नाही आणि माझा कोणीही शिष्य नाही. "ब्रम्हदेवाने चार वेद रचले होते त्यानंतर तुकोबा रायाने पाचवा वेद रचला होता. माणसाच्या जन्माला येऊन आपण काय करावे याबद्दल हे महान पुरुष उपदेश करत असतात.पैसा कमवावा, बायका मुलांना पोसण्यात वेळ घालवावा की गणागोताचे करण्यातच वेळ घालवावा.या पैकी काय करावयाचे यासंबंधीचा उपदेश ते करीत असत. त्यानंतर ते असे सांगावयाचे की," तुम्ही ईश्वराचे नामस्मरण करावे ".ईश्वर हा त्यांनी डिफाईन केला होता.तुम्हा आम्हाला जो ईश्वर माहीत आहे तो त्यांना माहीत नव्हता.ईश्वर कोठे आहे याचे अत्यत चांगले वर्णन ते करीत असत.ते वर्णन असे असावयाचे की,दगडात देव नाही,तीर्थात देव नाही, यात्रेत देव नाही.तर या लोकांच्या मध्येच देव आहे. जी गरीब माणसे आहेत त्यांच्यामध्ये देव आहे. सुदैवाने या दोन्ही थोर पुरुषांना समजत्या वयात पाहण्याचे भाग्य मिळालेल्या प्रतिनिधींपैकी मी एक प्रतिनिधी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. शेकडो माणसांच्या मनावर अत्यंत उत्तम संस्काराचे आघात करण्याचे थोर कार्य ज्या शिक्षकाने केले होते त्या शिक्षकांचा वर्ग अमर्यादित असे.त्या शिक्षकाच्या वर्गामध्ये हजारो लोक असत. हा देव त्या गरीबामध्ये आहे असे त्यांनी सांगितले आणि त्यांनी " जनी जनार्दन " हा एक मंत्र सर्व लोकांना शिकवला होता . ते असे म्हणाले की, "लोकांमध्ये देव आहे".पंढरपुरला जाऊन त्यांनी विठोबाचे दर्शन न घेता तेथे येणा-या लोकांचे दर्शन घेणारा आणि तेथे येणा-या लोकांची सोय व्हावी म्हणून काम करणारा हा एकमेव मनुष्य होता. काशीला जाऊन त्यांनी विश्वेश्वराचेसुध्दा दर्शन घेतले नव्हते.त्या ठिकाणी जाऊन धर्मशाळा बांधून त्यांनी लोकांची सोय केली होती. या लोकांचे प्रबोधन करण्यासाठी त्यांनी लोकांची ही सोय केली होती. कीर्तनाचे माध्यम केवळ प्रबोधन करण्याकरिताच त्यांनी वापरले होते.ते असे सांगत असत की, भुकेलेल्या जीवाला अन्न द्या, तहानलेल्या जीवाला पाणी द्या, जे उघडे नागडे आहेत त्यांना वस्त्र द्या ..

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

बेघरांना आसरा द्या, बेकारांना रोजगार द्या, अंध-अपंगांना औषधोपचार द्या, जे दु:खी आहेत, निराश आहेत त्यांना जगण्याची हिंमत द्या, मुक्या प्राण्यांना अभय द्या, मुला-मुलींना शिक्षण द्या, गरीब तरूण-तरूणींचे विवाह ठरवा आणि ते पार पाडा, कर्ज काढू नका, चैन करू नका, कष्टाशिवाय भाकर खाऊ नका, निरंतर उद्योग करा. ज्याला शिक्षण नसेल त्याला खटाऱ्याचा बैल म्हटले तरी चालेल हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. अस्पृश्यतेच्या विरोधात आज पुष्कळ लोक बोलतात, पण त्या काळात त्यांनी प्रखरतेने हा विरोध प्रकट केलेला आहे. दारूच्या विरोधात, हिंसेच्या विरोधात, पशूंच्या हत्येच्या विरोधात देखील त्यांनी असाच प्रकट विरोध केलेला आहे. म्हणूनच या थोर पुरूषाचे नाव आपण या विद्यापीठाला दिले आहे व त्यातून लोकांच्या भावनांचा आदर केला. तीच गोष्ट राष्ट्रसंतांच्याबाबतीत आहे. राष्ट्रसंतांनी देखील सबंध आयुष्यभर देशाचा विचार डोळ्यासमोर ठेवूनच काम केले. या दोघांच्याही बाबतीत एक मोठा फरक आहे. राष्ट्रसंतांना अतिशय उत्तम स्वरूपात सरस्वती प्रसन्न होती. राष्ट्रसंतांचे विपुल लेखन आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळेला ... " झाड झाडू ले लो, शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना, अब काहे को धूम मचाते हो, आएंगे नाथ हमारे" ही जी वाणी त्यांनी उच्चारली त्यामुळे शेकडो लोक मैदानात उतरले. आणि तरूणांना त्यांनी उपदेश केला की, "सुन्दर दिखता है तो क्या है" म्हणजे तू सुंदर आहेस, पण त्याचा उपयोग काय ? लोकांसाठी तुझा वापर झाला पाहिजे. त्यांनीसुद्धा हीच गोष्ट सांगितली की, मंदिरामध्ये देव नाही, तर त्या गरीब माणसामध्ये देव आहे. या दोन्ही थोर पुरूषांची नावे नागपूर आणि अमरावती या दोन विद्यापीठांना दिली आणि त्या दोन्ही विद्यापीठांची कंटिन्यूटी ठेवण्यासाठी त्यांची मूळ नावे देखील कायम ठेवली याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो.

*****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....सी 2 ...

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, हे विधेयक महाराष्ट्र शासनाच्या वतीने अगोदरच आलेले होते परंतु आता ते दुरूस्त करून आलेले आहे आणि आताच सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे मूळ विद्यापीठांची नावे कायम ठेवून, अमरावती आणि नागपूर या दोन्ही विद्यापीठांना .. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ असे नाव दिले आणि एक ऐतिहासिक काम महाराष्ट्र शासनाच्या वतीने झाले त्याची नोंद शतकानुशतके महाराष्ट्रातील आम जनता, साधी भोळी जनता घेतल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, एक अतिशय योगायोग आहे की संत गाडगेबाबांच्या सेवाकार्याला 75 वर्षे पूर्ण होत असताना, त्यांच्या सेवाकार्याचा अमृत महोत्सव सर्वदूर साजरा होत असताना आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेला 50 वर्षे पूर्ण होत असताना त्याचा सुवर्णमहोत्सव सगळीकडे साजरा होत असताना योगायोगाने या दोन्ही वर्षांचे औचित्य साधले गेले आहे आणि या दोन महान संतांची नावे या दोन विद्यापीठांना आपण दिली आहेत. आताच सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे की, संत गाडगेबाबा हे अंगठाबहाद्दर होते, त्यांना लिहिता वाचता काहीही येत नव्हते. ते सहीच्या ठिकाणी अंगठा उठवत होते. ते कोठल्याही शाळेत वा विद्यापीठात गेलेले नव्हते. लौकिक अर्थाने ते कोणत्याही शाळेत गेले नव्हते, त्यांनी कोठलीही पदवी मिळविलेली नव्हती. परंतु माणसांच्या जीवनातील शाळा त्यांनी ओळखली होती आणि म्हणून संत गाडगेबाबांनी अस्पृश्यता निवारणाचे काम केले आणि आता सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे संत नाथांचा अभंग आहे ... जनहित हेच जनार्दन .. म्हणजे जनतेमध्ये म्हणजेच माणसामध्ये ईश्वर पाहण्याचे आणि विविध दृष्टांताच्या माध्यमातून त्यांनी ही गोष्ट साध्या भोळ्या जनतेला सांगितली. साध्या भाषेतून विविध दृष्टांत देत जनतेला एखादी गोष्ट पटविण्याचे सामर्थ्य संत गाडगेबाबांच्या मध्ये होते. विशेष करून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी जनतेला पटवून दिले होते. ते आपल्या कीर्तनामध्ये म्हणत असत की, बाबांनो, मुलांना शिकवा, त्यासाठी घराची कवेलू काढा, टिन काढा.. त्यावेळी पत्र्याला टिन म्हणायचे, तर घरावरील कवेलू, टिन विका, बायकोला साधी साडी घ्या, भारी घेऊ नका., पण पोऱ्याला शिकवा. बाबांच्या चरित्रामध्ये हे लिहिलेले आहे. त्यांनी उदाहरण दिले आहे की, घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या आई वडीलांनी शाळेत घातले नसते

..... सी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

तर त्यांना कोठे तरी मोलमजुरी करावी लागली असती. शिक्षणाची गंगा सर्वदूर खेड्यापाड्यात पोहोचविणारे डॉ.पंजाबराव देशमुख यांना त्यांच्या आई वडीलांनी शाळेत घातले नसते तर तेही कोठे तरी झाडलोट करीत बसले असते. म्हणून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. ते स्वत: कधीच कोठल्या शाळेमध्ये गेलेले नव्हते पण त्यांनी सामान्य माणसाला त्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मुंबईमध्ये त्यांनी धर्मशाळा काढल्या. आपण पाहतो की, त्याकाळामध्ये त्यांनी या धर्मशाळा काढल्या. आजच्या काळामध्ये आपण सहजपणे गाडगेबाबांच्या धर्मशाळांमध्ये गेलो.. मुंबईतील तीन चार हॉस्पिटल्समध्ये या धर्मशाळा आहेत आणि सुदैवाने आता आपले मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी त्यांना आणखी जागा दिलेली आहे. 5 रुपयामध्ये, 10 रुपयांमध्ये आणि काही ठिकाणी तर अगदी मोफत. ...

(यानंतर श्री. जागडे .... डी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरुन आलेल्या रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना राहण्याची तसेच जेवणाची सोय गाडगेबाबानी त्या काळात केली आहे. कालच मी दूरदर्शनवर एक दृश्य पाहत होतो. गाडगेबाबा हॉस्पीटलमध्ये आजारी असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना भेटावयाला आले होते. गाडगेबाबानी अनेक धर्मशाळा आणि वसतिगृहे बांधली आहेत. पंढरपूर येथे चोखामेळा यांच्या नावाने वसतिगृह बांधले आहे. आता या सर्व धर्मशाळा आणि वसतिगृहाची मालकी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे हॉस्पीटलमध्ये सोपविली. अभूतपूर्व असे काम संत गाडगेबाबांनी केले आहे. आता त्यांचे नाव अमरावती विद्यापीठाला दिल्याबद्दल मी या ठिकाणी शासनाचे अभिनंदन करीत आहे.

सभापती महोदय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेचा मी या ठिकाणी उल्लेख केला आहे. मला या ठिकाणी सांगावयाला आनंद होत आहे की, आपण संत गाडगेबाब यांच्या नावांने स्वच्छता अभियान सुरु केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता पुरस्कार आपण दिला आहे. मला या ठिकाणी आनंद होत आहे की, हीच सूचना मी अर्थसंकल्पाच्या वेळी मांडली होती. सभापती महोदय, मी सूचना मांडली म्हणजे फार मोठे काम केले असे होत नाही. हे दोन्ही संतच फार मोठे होते. या संतांच्या नावांमध्ये मोठे सामर्थ्य आहे. अलिकडच्या काळातील ही एकच योजना अशी आहे की, शासनाचा या योजनेसाठी कमी पैसा खर्च पडत आहे. अनेक प्रकारे ही योजना उत्तम प्रकारे साकार झाली आहे. माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्य आंदोलन असू द्या. अस्पृश्यता निवारण कार्यक्रम असू द्या. जातीय तणाव असू द्या. या सर्व कामामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अभूतपूर्व असे काम केले आहे. मला त्यांची ग्रामगीताची एक कविता आठवते. "गावागावाची जागवा, भेदभाव समुळ मिटवा, उजळा ग्रामविकासाचा दिवा, तुकड्या म्हणे." सभापती महोदय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कामाची नोंद या शासनाने घेतली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 1956 साली टोकीओमध्ये जागतिक सर्वधमभाव संम्मेलनाचे उदघाटन केले आहे. सवदूर जगात त्यांचा संदेश गेला आहे. तेव्हा नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नांव आणि अमरावती विद्यापीठाला संत गाडगेबाबांचे नाव दिल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. तसेच या विधेयकाचे स्वागत करतो आणि माझे मनोगत थांबवितो.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, आजची विधेयके महत्वाची आहेत. त्यासाठी आजचा वेळ आपण विधेयकांना ठेवला आहे. परंतु खेदाची गोष्ट अशी आहे की, सभागृहात कोरमच नाही. म्हणून कोरम नसताना कामकाज चालविण्यापेक्षा पाच मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करावी.

उपसभापती : कोरम आहे. माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची घटना आहे, असे मला वाटते. यापूर्वी वेगवेगळ्या विभागांची अस्मिता, ज्यांनी विचारप्रर्वतनाची काम केले आहे, अशा नेत्यांची अस्मिता यामध्ये काही काही वेळा संघर्ष निर्माण होत असतो. सभापती महोदय, या दोन राष्ट्रसंतांचे एक वैशिष्ट्य आहे. हिन्दू धर्माची सुधारणा करण्याचे ज्यांनी काम केले, त्या कामामध्ये या दोन्ही संतांचा अंतर्भाव होतो. संपूर्ण जगाच्या इतिहासामध्ये वेगवेगळ्या धर्मामध्ये सुधारणा करण्याचे ज्यांनी काम केले आहे, त्याला आधुनिक धर्माचा चेहरा देण्याच्या कामामध्ये या दोन्ही राष्ट्रसंतांचा मोलाचा वाटा आहे. मला या ठिकाणी काही तांत्रिक मुद्दांकडे लक्ष वेधावयाचे आहे. नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि अमरावती विद्यापीठाला संत गाडगेबाबांचे नांव देत आहोत.

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, बऱ्याच वर्षापासून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला सानेगुरुजी विद्यापीठ असे नावे द्यावे अशाप्रकारची मागणी वारंवार त्या भागातील लोकप्रतिनिधी विशेषत: खानदेश भागातील लोकप्रतिनिधींनी केली आहे. तसेच, साने गुरुजींची कर्मभूमी व जन्मभूमी या दोन्ही दृष्टीकोनातून खानदेशला महत्व प्राप्त झाले आहे. प्राचार्य जे. जी. खैरनार, सानेगुरुजी विद्यापीठ नामकरण समितीचे निमंत्रक डॉ. मु. ग. शहा, माजी शिक्षक आमदार श्री. जयवंतराव ठाकरे, श्री. अविनाश पाटील, श्री. पी.डी. दलाल, श्री. व्यंकटराव अण्णा रणभीर, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक अशा सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी, विचारवंतांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाला सानेगुरुजी खानदेश विद्यापीठाचे नाव द्यावे अशी 1999-2000 या काळात, सानेगुरुजी जन्म शताब्दी बर्ष असतांना मागणी केली. अशा वेळी महाराष्ट्रामध्ये नागपूर व अमरावती विद्यापिठाचे नामकरण करीत असतांना उत्तर महाराष्ट्र सानेगुरुजी खानदेश विद्यापीठ अशा प्रकारच्या नावाचा विचार करावा अशी विनंती करावीशी वाटते. ज्या वेळी अशा थोर विचारवंतांचे नाव विद्यापीठाला देतो तेव्हा या पुढील काळात त्या विद्यापिठामध्ये होणारे घोटाळे गैरव्यवहार असतील तर त्यामुळे त्यांच्या नावाला कलंक लागू शकतो याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. बऱ्याच वेळा नामांतर होते त्यावेळी इतर राज्यात आणि वेब साईटवर जुनी नावे राहिलेली असतात. माझी विनंती आहे की, या दोन्ही विद्यापीठांची स्वतंत्र वेबसाईट नसेल तर या विद्यापीठांच्या नावाने नवीन वेब साईट तयार केल्यास सर्व जगात या विद्यापिठांची नावे बदलली गेली आहेत हे कळेल. नाही तर आज सर्वच विद्यार्थ्यांना संत महात्म्यांच्या नावांची माहिती नसते. म्हणून हे नामांतर होत असतांना त्या संबंधीचा प्रचार आणि विचार सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे असे मला वाटते. माझ्या भाषणामध्ये दोन्ही विद्यापिठांच्या नामांतराचे स्वागत करीत असतांना खानदेश विद्यापीठाला सानेगुरुजींचे नाव देण्याच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घ्यावा अशी माझी आपणाला विनंती आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सुधारणा विचारात घेण्यात आल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम नसतांना सुध्दा सभागृहाचे कामकाज चालू आहे. आणि कोरम नसतांना माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा उपस्थित केला त्यावेळी चालवून घ्या असे सत्ताधारी बाकावरुन सांगण्यात आले व मी ते ऐकले आहे....

श्री. दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय, सभागृहामध्ये कोरम आहे. आणि माननीय सदस्य जसे म्हणत आहेत त्याप्रमाणे सभागृहात कोरम असतांना सभागृहातील सदस्यांना बाहेर जायला सांगणे हे सुध्दा अनुचित आहे. लोकांना बाहेर जायला सांगायचे आणि कोरमचा मुद्दा उपस्थित करावयाचा ही प्रथा चांगली नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या सभागृहाचे सभापती आहात. या सदनामध्ये कोरम नसतांना कामकाज चालविणे ही बाब योग्य आहे कां?

उपसभापती : असे झाले नाही. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कोरमचा मुद्दा उपस्थित केला त्यावेळी मी आणि सचिवांनी खातरजमा करुन घेतली त्याशिवाय पुढील कामकाज होऊ दिले नाही. कृपया आपण माझ्याविषयी गैरसमज करुन घेऊ नका.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, समोरच्या बाकावरुन चालवून घ्या असे म्हटले गेले आहे व मी ते ऐकले आहे...

उपसभापती : तसे बोलले गेलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : आपण सभागृहाची अप्रतिष्ठा करावयाची आणि आम्ही गप्प बसायचे असे आपले म्हणणे आहे कां?

श्री. अजित पवार (बसून बोलतात) : अजिबात नाही....

श्री. दिलीप वळसे पाटील : महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 1 महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2005 यात विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांना सहमती द्यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सन्माननीय सदस्य(खाली बसून) : नाही.

श्री.दिवाकर रावते : मघाशी तुकडोजी महाराजांच्या प्रस्तावावरील भाषण होते, म्हणून मी शांत होतो. हे लक्षात ठेवा.

एक सन्माननीय सदस्य(खाली बसून) : मघाशी कोरम होता.

उपसभापती : याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना मघाशी सांगितलेले आहे.

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक.

मु.शी.: सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 19-महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता,जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन,वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक,औद्योगिक,पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक यांस विधानसभेने केलेल्या सुधारणांना विधानपरिषदेने सहमती देण्याबद्दल विनंती करणारा विधानसभेचा संदेश व तत्संबंधीचा प्रस्ताव.

उपसभापती : विधानसभेकडून एक संदेश आला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

संदेश

सचिव : मला आपणास असे कळविण्याचा निदेश आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेने दिनांक 7 एप्रिल 2005 रोजी पारित केलेले विधान परिषद विधेयक क्रमांक 19- सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 19-महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता,जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन,वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषिविषयक,औद्योगिक,पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक यास विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांसहित दिनांक 13 एप्रिल 2005 रोजी पारित केले आहे. सुधारणांची यादी सदस्यांना वितरीत करण्यात आली आहे. या सुधारणांना विधानसभेने विधानपरिषदेची सहमती मागितली आहे.

अ.क्र.1,खंड 12, पृष्ठ क्रमांक 16 वर, ओळ क्रमांक 11 नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात यावा :--

"(11)या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीस दोनपेक्षा जास्त मुले असतील त्या व्यक्तीस, कृषी सिंचनासाठी पाण्याची हक्कदारी मिळण्याकरता या अधिनियमाच्या

. . . . एफ -3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कलम 11 च्या खंड (घ) अन्वये ठरविण्यात आलेल्या सर्वसाधारण पाणीपट्टी दराच्या दीडपट पाणीपट्टी भरावी लागेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, दोंन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती अशा प्रारंभाच्या दिनांकास त्या व्यक्तीला असणा-या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही, तोपर्यंत त्या व्यक्तीस दीडपट पाणीपट्टी भरावी लागणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण - या खंडाच्या प्रयोजनार्थ - (क) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल :

(ख) "मूल" या संज्ञेत,दत्तक घेतलेले मूल किंवा मूले यांचा समावेश होत नाही."

खंड 14, पृष्ठ क्रमांक 17, ओळ क्रमांक 18 ते 30 वगळण्यात याव्यात.

. . . . एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन,वाटप व वापर सुकर करण्याकरिता आणि त्यांची सुनिश्चिती करण्याकरिता कृषि विषयक,औद्योगिक,पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक यास विधानसभेने सुचविलेल्या सुधारणा विचारात घेण्यात याव्यात असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक विधान परिषदेने मंजूर केलेले होते. परंतु विधानसभे मध्ये ते बिल गेल्यानंतर त्यामध्ये "दोनपेक्षा जादा मुले असणा-या व्यक्तीस पाणी देण्यास बंदी असणारे कलम 14 चे (5) हे वगळण्याचे त्याठिकाणी ठरविण्यात आले आणि त्यामध्ये कलम 12 चे (11) हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहे. जे नव्याने कलम समाविष्ट करण्यात आले आहे, ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

अ.क्र.1, खंड 12, पृष्ठ क्रमांक 16 वर, ओळ क्रमांक 11 नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात यावा :--

"(11)या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीस दोनपेक्षा जास्त मुले असतील त्या व्यक्तीस, कृषी सिंचनासाठी पाण्याची हक्कदारी मिळण्याकरता या अधिनियमाच्या कलम 11 च्या खंड (घ) अन्वये ठरविण्यात आलेल्या सर्वसाधारण पाणीपट्टी दराच्या दीडपट पाणीपट्टी भरावी लागेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, दोंन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती अशा प्रारंभाच्या दिनांकास त्या व्यक्तीला असणा-या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही, तोपर्यंत त्या व्यक्तीस दीडपट पाणीपट्टी भरावी लागणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

स्पष्टीकरण - या खंडाच्या प्रयोजनार्थ - (क) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल :

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ख) "मूल" या संज्ञेत,दत्तक घेतलेले मूल किंवा मूले यांचा समावेश होत नाही."

खंड 14, पृष्ठ क्रमांक 17, ओळ क्रमांक 18 ते 30 वगळण्यात याव्यात.

सभापती महोदय, अशा प्रकारची दुरुस्ती यामध्ये सुचविण्यात आलेली आहे. माझी या सभागृहाला विनंती आहे की, यामध्ये जी दुरुस्ती सुचविलेली आहे. त्या सुधारणेसह मी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला मान्यता द्यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सुधारणा विचारात घेण्यात आल्या आहेत.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक यास विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांना सहमती द्यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

. . . .एफ-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य कोरमबाबत आपसात बोलतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, मी येथे विधेयकाचे प्रोसीजर वाचत आहे. नीलमताई, तुम्हाला एक मिनिट कुणीतरी बाहेर बोलाविले म्हणून तुम्ही बाहेर गेलात. त्यानंतर तुम्ही तेथे उभ्या होतात, म्हणून मी तुम्हाला लगेच बोलावून घेतले आणि तुम्हाला देखील बोलण्याची परवानगी दिली. म्हणजे जर माझा चांगुलपणा इतका माझ्या अंगाशी येणार असेल तर मला देखील अत्यंत कडकपणे, नियमाने काम करावे लागेल. रावतेसाहेब, मी कोरम आहे की नाही याची खात्री करुन घेतली, सचिवांनी देखील याची खात्री केली आणि त्यानंतरच मी कामकाज पुढे सुरु केले. म्हणजे माझ्यावर असा हेत्वारोप झाला तर मी तरी किती गप्प रहावयाचे ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : पुढचे राजकोषीय बील आहे त्याला आताच सुधारणा आलेल्या आहेत. त्या सुधारणा सर्क्युलेट होत आहेत त्यामुळे त्यावरील चर्चा थोडया वेळाने आपण करू. तोपर्यन्त पुढचे 54 क्रमांकाचे बील चर्चेला घेऊ.

-

पृ.शी. : सिंचन पध्दतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन विधेयक.

L.A.BILL NO. LIV OF 2004.

(A BILL TO PROVIDE FOR MANAGEMENT OF IRRIGATION SYSTEMS BY FARMERS AND FOR MATTERS CONNECTED THEREIWTH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 54 सिंचन पध्दतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले.

श्री.अजित पवार : महोदय मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 54 - सिंचन पध्दतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपण आताच वि.स.वि.क्रमांक 19 हे बील आपण मंजूर केले. त्यानंतर खालच्या सभागृहानेही त्यास मान्यता दिली, विधानपरिषदेनेही त्यास मान्यता दिली. तसेच हेही विधानसभेने बील मंजूर केलेले आहे आणि आता ते विधान परिषदेकडे मंजुरीसाठी आलेले आहे. दोन्ही सभागृहाचे 17 सन्माननीय सदस्य असलेल्या संयुक्त चिकित्सा समितीकडे हे बील गेलेले होते. त्यामध्ये ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब, सन्माननीय सदस्य सर्वश्री.गणपतराव देशमुख साहेब, दिवाकर रावते साहेब, श्रीकांत जोशी साहेब, धनाजी साठे, जगन्नाथ शेवाळे, एखनाथराव खडसे अशा बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांनी खूप विचार करून अतिशय बारकाईने अभ्यास करुन सुधारणा केलेल्या आहेत. या बिलाच्या संबंधामध्ये जवळपास 11 बैठका घेण्यात येऊन त्या ठिकाणी चर्चा केलेली आहे. डिसेंबर 2004 च्या नागपूरच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.अजित पवार (पुढे चालू....

अधिवेशनामध्ये हे बील आणण्यात आलेले होते. परंतु एकंदरीत शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे बील असल्यामुळे या विधेयकावर राज्यातील जनतेकडून, लोकप्रतिनिधींकडून, सन्माननीय सदस्यांकडून, वेगवेगळया स्वयंसेवी संस्था आहेत, त्यांच्याकडून अभिप्राय देखील मागविण्यात आले होते. त्या अभिप्रायावर अतिशय सखोल अशाप्रकारची चर्चा विविध कलमांच्याबाबतीमध्ये, आवश्यक त्या सुधारणा देखील त्यामध्ये करण्यात आलेल्या आहेति. एकंदरीत भविष्यात राज्यातील वाढीव लोकसंख्येच्या गरजा याचा सखोल विचार करूनच त्या विधेयकाला अंतिम स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विधेयकातील विशेष ठळक वैशिष्ट्य मी सांगण्याचा प्रयत्न करतो. या अगोदरच्या काळात शेतकऱ्यांना मोजून पाणी दिले जात नव्हते. परंतु या विधेयकाच्या निमित्ताने शेतकरी पिकासाठी जे पाणी वापरतात, ते मोजून देण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समन्यायी तत्वावर पाण्याचे वितरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. एखाद्या वर्षी पाऊस कमी असेल आणि धरणामध्ये 50 टक्केच पाण्याचा साठा असेल तर सुरुवातीचा जो शेतकरी असायचा तो पाणी जास्त घ्यायचा, बाकीच्यांना पाणी मिळत नव्हते. परंतु आता मात्र समन्यायी तत्वावर पाणी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. पाणी त्या ठिकाणी 50 टक्के असेल तर ते 50 टक्के पाणी हेडपासून टेलपर्यन्त सगळ्याच भागातील शेतकऱ्यांना देण्याचे सूत्र अवलंबिलेले आहे. यामध्ये जे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रमध्ये पाणी आहे ते पाणी वापर संस्थेच्याच मार्फत वितरित करण्याचा निर्णय यामध्ये घेण्यात आलेले आहे. हे देखील पाणी वापर संस्थेला समन्यायी तत्वावरच वापराचा कोटा देण्यात येणार आहे. पाणी वापर संस्थेला त्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व लाभधारकांना पाणी देण्याचे बंधनकारक त्यामध्ये करण्यात आलेले आहे. कालव्याच्या 'शेवटच्या भागापासून सुरुवाती'कडे या तत्वाचा अवलंब करून घनमापन तत्वावर पाण्याचे वितरण करण्याचे देखील यामध्ये सुचविलेले आहे. पाणी वापर संस्थेला त्याच्या हक्काच्या कोट्यामध्ये पीक घेण्याचे स्वातंत्र्य असल्याबाबतचा निर्णय या बिलामध्ये घेण्यात आलेला आह. जरी या मागच्या काळामध्ये गव्हाला पाळी दिली असेल आणि पाच पाळ्या त्याला मिळणार असतील तर त्या पाच पाळ्यामध्ये गव्हाच्या ऐवजी दुसरे कोणते तरी पीक घ्यायचे असेल तर त्याबाबत शेतकरी किंवा पाणी वापर संस्था निर्णय घेऊ शकणार आहेत. त्याचबरोबर मधल्या काळामध्ये अशाप्रकारच्या सातत्याने काही तक्रारी यायला लागल्या की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.अजित पवार (पुढे चालू....

विहिरीच्या पाण्यावर शासन पाणीपट्टी आकारते. पण पाणी वापर क्षेत्राच्या कार्यक्षेत्रामध्ये जर विहिरी असतील, त्यातील पाणी वापरावर मात्र शासन येथून पुढे पाणी पट्टी आकारणार नाही. अशा प्रकारचा महत्वाचा निर्णय शेतकऱ्यांच्या फायद्याच्या दृष्टीने या बिलाच्या निमित्ताने घेतलेला आहे. पाणी वापर व्यवस्थापन समितीच्या संचालकाची निवड निवडणुकीने होणार आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार..

पहिल्यांदा शेवटच्या भागातील एखाद्याला दोन वर्षे अध्यक्ष करायचे मग मधल्या भागामध्ये पाणी मिळते तेथील एखाद्याला अध्यक्ष करायचे आणि मग सुरुवातीच्या भागातील एखाद्याला दोन वर्षे अध्यक्ष करायचे असा प्रत्येकाचा कालावधी दोन वर्षे राहणार आहे.महिलांना पाणी वापर संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची तरतूद या बिलाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. पाणी वापर संस्थेकडे कार्यक्षेत्र हस्तांतरित करण्यापूर्वी वितरण संस्थेचे नूतनीकरण करुनच हस्तांतरण केले जाणार आहे. त्यामुळे शेतक-यांनी किंवा पाणी वापर संस्थांनी मनामध्ये आणूनये की, आमच्या येथील वितरण व्यवस्था इतकी काही चांगली नाही. वितरण व्यवस्था चांगली नसतांना हयांनी जर आमच्याकडे तिचे हस्तांतरण केले तर आम्ही त्यावर कशातून खर्च करायचा? तर जलसंपदा विभागच त्याचे नूतनीकरण करुन ते देणार आहे. आणि नंतर त्या पाणीवापर संस्थेकडे हस्तांतरीत करण्याच्या संदर्भातील कार्यक्रम केला जाणार आहे. पाणी वापर संस्थेचा सहभाग व्यवस्थापनाच्या कामामध्ये अनिवार्य या बिलाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. व्यवस्थापनाची कामे पाणी वापरसंस्थेच्या सहभागाने करावयाची आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, फार चांगल्या पध्दतीचा विचार करुन हे विधेयक आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. संयुक्त समितीने देखील खूप बारकाईने प्रत्येक कलमवार आणि ओळवार चर्चा केलेली आहे. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, या विषयांकित विधेयकावर कलमवार सविस्तर चर्चा झालेली आहे तरी हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 81 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. अजित पवार : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 54 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 54 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXXVIII OF 2005

(A BILL TO PROVIDE FOR THE RESPONSIBILITY OF THE STATE GOVERNMENT TO ENSURE INTER-GENERATIONAL EQUITY IN FISCAL MANAGEMENT, FISCAL STABILITY BY ACHIEVING SUFFICIENT REVENUE SURPLUS AND PRUDENTIAL DEBT MANAGEMENT CONSISTENT WITH FISCAL SUSTAINABILITY, GREATER TRANSPERENCY IN FISCAL OPERATIONS OF THE STATE GOVERNMENT AND CONDUCTING FISCAL POLICY IN A MEDIUM-TERM FRAMEWORK AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) :सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 38. राजकोषीय व्यवस्थापनाची पिढयांतर्गत समन्यायता सुनिश्चित करणे, महसुली अधिक्य गाठणे आणि दूरदर्शी कर्ज व्यवस्थापन अंमलात आणून आर्थिक व्यवहारात अधिकाधिक पारदर्शकता यांद्वारे राजकोषीय स्थैर्य गाठणे, मध्यम मुदत चौकटीमध्ये राजकोषीय धोरण राबविणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबी यांसाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 38. राजकोषीय व्यवस्थापनाची पिढयांतर्गत समन्यायता सुनिश्चित करणे, महसुली अधिक्य गाठणे आणि दूरदर्शी कर्ज व्यवस्थापन अंमलात आणून आर्थिक व्यवहारात अधिकाधिक पारदर्शकता यांद्वारे राजकोषीय स्थैर्य गाठणे, मध्यम मुदत चौकटीमध्ये राजकोषीय धोरण राबविणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबी यांसाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल. खंड 2 व खंड 3 ला सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सुधारणा सुचविलेल्या आहेत तसेच त्यांनी खंड 12 नंतर नवीन खंड 13 दाखल करण्यात यावा अशी सुधारणा दिलेली आहे. या सुधारणा त्यांनी एकत्रितपणे मांडाव्यात व त्यानंतर भाषण करावे.

खंड 2 - व्याख्या.

खंड 3- राज्य विधानमंडळासमोर मांडावयाचे राजकोषीय धोरण विवरणपत्र.

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो :-

1) खंड 2 मध्ये ओळ क्रमांक 28 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

" (ट) " राज्यपालाचे निदेश" म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 च्या खंड 2 नुसार दिलेल्या " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश 1994" मधील नियम 7 अन्वये राज्यपालांचे निदेश ;"

2) खंड 3 मध्ये ओळ क्रमांक 35 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

" मा. राज्यपालाच्या निदेशानुसार जलसंपदा क्षेत्रासाठी व त्याव्यतिरिक्तच्या विकासक्षेत्रासाठी संबंधित वर्षाच्या राज्यसरासरीवर दूर करण्यात आलेल्या किंवा वाढलेल्या भौतिक व आर्थिक अनुशेषाचे विवरणपत्र "

3) खंड 3 मध्ये ओळ क्रमांक 19 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

" सर्वच विकासक्षेत्राशी संबंधित जिल्हावार अनुशेष संपुष्टात आणण्यासाठी शासनाने केलेल्या व करावयाच्या उपाययोजना"

4) खंड 12 नंतर पुढील खंड 13 दाखल करण्यात यावा :-

" 13. या अधिनियमामध्ये काहीही नमूद करण्यात आलेले असले तरी प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या कोणत्याही उपाययोजना अंमलात आणण्यास त्यामुळे बाधा येत आहे असे मानता येणार नाही किंवा त्याचा तसा अर्थ लावता येणार नाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख .....

सभापती महोदय, या अतिशय चांगल्या विधेयकाला मी 4 सुधारणा सुचविलेल्या आहेत. राज्याचे जे राजकोषीय व्यवहार आहेत त्या व्यवहाराच्या बाबतीत जगातील अनेक देशांनी काही डिसिप्लीन आपल्यावर घालून घेतलेले आहेत आणि भारत सरकारने सुध्दा याबाबतीत कायदा करुन काही व्यवस्था निश्चित केलेल्या आहेत आणि त्यामुळे हे विधेयक निश्चितपणे स्वागतार्ह असले तरी यातील एक अत्यंत महत्वाचा दोष असा आहे की, राज्याच्या एकंदर अर्थव्यवस्थेचा विचार करीत असताना आपण महाराष्ट्र राज्याचा विचार करीत आहोत याचा विसर या विधेयकाला पडलेला आहे. आपण महाराष्ट्र राज्याचे शासन आहोत याचा विसर या विधेयकाला पडलेला आहे. या विधेयकामध्ये ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या तरतुदी करीत असताना हे राज्य ज्या अत्यंत स्फोटक अशा परिस्थितीला तोंड देत आहे ती स्फोटक परिस्थिती म्हणजे महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये असलेली प्रादेशिक असमतोलाची परिस्थिती आहे आणि त्या परिस्थितीचा नेमका विसर या विधेयकाला पडलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सभापती महोदय, मी याबाबत माझे विचार मांडताना स्पष्टीपणे काही गोष्टी नमूद करु इच्छितो. राजकोषीय व्यवहाराचे नियंत्रण करण्याचा कायदा जसा जलसंपदा विषयक विधेयकाच्याबाबतीत मी म्हटले होते की, त्या जलसंपदा विषयक विधेयकाला प्रादेशिक असमतोल माहीत नाही. त्या जलसंपदा विषयक विधेयकाला 371 (2) हे कलम माहीत नाही, ज्या जलसंपदा विषयक विधेयकाला राज्यपालांचे निर्देश माहीत नाहीत. ते महाराष्ट्राचे जलसंपदा विषयक विधेयक असू शकत नाही. ही भूमिका मी सभागृहामध्ये घेतली होती. मला याचा आनंद वाटतो की, हे बिल संयुक्त समितीकडे गेले आणि सर्व भूमिका त्याठिकाणी मान्य करण्यात आल्या. अतिशय चांगला न्याय त्याबाबत त्या विधेयकाला मिळू शकला. दुर्दैवाने याबाबतीत अशी संधी सभागृहाच्या सदस्यांना मिळाली नाही. या विधेयकाबाबत शासनाला फार घाई आहे असे एकूण दिसून येते. महाराष्ट्राचे विद्रुप चित्र, महाराष्ट्राचा विद्रुप भाग पाहण्याची शासनामध्ये कोणाचीही मन:स्थिती दिसत नाही ही दुर्दैवी गोष्ट आहे. या विधेयकामध्ये आपल्या असे लक्षात येईल की, खंड 3 मध्ये ज्या गोष्टी दिलेल्या आहेत की, "राज्यशासन प्रत्येक वित्तीय वर्षात, राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे वार्षिक आर्थिक विवरणपत्र आणि अनुदानविषयक मागण्या यांसह पुढील राजकोषीय-धोरण-विवरणपत्रे सादर करील." माझी अशी सुधारणा आहे की, " ही विवरणपत्रे सादर करीत असताना यापुढे विवरणपत्र सादर झाली पाहिजेत. निरनिराळया विकास क्षेत्रामध्ये कोण पुढे आणि कोण मागे आहे आणि त्याबाबत काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, याबाबतचे विवरणपत्र सादर झाले नाही आणि हा कायदा घाईने आणला जात आहे. खरे म्हणजे अशाप्रकारचे कायदे संपूर्ण देशभर करण्यात येत आहेत. परंतु सा-या देशात 371 (2) कलम नाही, 371 (2) हे कलम केवळ महाराष्ट्रामध्ये आहे. अशाप्रकारच्या प्रादेशिक असमतोलाला तोंड देण्यासाठी म्हणून दरवर्षी याबाबतचे विवरणपत्र दाखल केले पाहिजे. काही लोकांना दुर्दैवाने असे वाटते की, हा अनुशेष म्हणजे तात्पुरता फेज आहे. दांडेकर समितीचा आणि अनुशेष निर्देशांक समितीचा अहवाल जर वाचला तर असे लक्षात येईल की, राज्याच्या सरासरीच्या खाली असलेले अनुशेषात आणि सरासरीच्या वर असलेले बिगर अनुशेषाचे, त्यामुळे ते म्हणतात त्या पध्दतीने निधी दिला तर

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

खालचे लोक सरासरीच्या जवळपास येतील, वर सुध्दा जातील, वर असलेल्यांना निधी न मिळाल्यामुळे ते एखाद्या वेळेला पुढील सरासरीवर खाली सुध्दा राहतील. कोणत्याही आदर्श राज्यामध्ये सगळे एका सरासरीवर आहेत हे शक्य नाही, कोणी तरी थोडेबहुत वर राहणार, कोणी खाली राहणार ते सरासरीच्या जवळपास रहावे, खाली असेल तो फार खाली राहू नये आणि वर असेल तो फार वर राहू नये याची काळजी घेणे हे राज्याचे काम आहे असे त्या अहवालामध्ये म्हटले आहे. आज अत्यंत दाहक अशाप्रकारची परिस्थिती त्या क्षेत्रामध्ये आहे. मग ते चित्र राजकोषीय व्यवहार करीत असताना गेल्या वर्षभर आपण काय केलेले आहे ? खरोखर हा निधी कसा दिला हे चित्र सभागृहात मांडण्याला नकार देणे ही गोष्ट उचित नाही. म्हणून मी क्रमांक 2 ची सुधारणा मांडली आहे. सुधारणा क्रमांक 3 मध्ये ओळ क्रमांक 19 नंतर मी सुधारणा सुचविली आहे की, "निरनिराळया गोष्टी, उदा.राज्यशासनाच्या राजकोषीय क्षेत्रातील किमान वित्तीय वर्षाचे व्यूहरचनात्मक अग्रक्रम, मी हे वाक्य मोठयाने यासाठी वाचले की, येथे असे का म्हणू नये ? प्रादेशिक असमतोल दूर करण्याविषयीचे व्यूहरचना आणि त्याबाबतचे अग्रक्रम हे का येऊ नये ? हा प्रश्न महाराष्ट्रामध्ये जीवंत नाही काय ? आणि म्हणून मी क्र.3 ची सुधारणा दिलेली आहे. " ज्या विविध प्रकारच्या उपाययोजना, कराधान व खर्च यांच्यासंबंधात राजकोषीय धोरणामध्ये कोणताही मूलभूत फरक असल्यास त्याबाबतची कारणमीमांसा आणि महत्वाच्या आर्थिक उपाययोजनांमध्ये सर्वच विकास क्षेत्राशी संबंधित जिल्हावार अनुशेष संपुष्टात आणण्यासाठी शासनाने केलेल्या व करावयाच्या उपाययोजना या सुध्दा समाविष्ट करण्यात याव्यात." असे माझ्या तिस-या सुधारणेमध्ये म्हटलेले आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.बी.टी.देशमुख पुढे सुरु...)

4थ्या सुधारणेमध्ये फार तपशीलवार भाष्य न करता मी एवढेच सांगू इच्छितो की, या विधेयकामध्ये काही तरतुदी अशा आहेत की, त्यांचा उपयोग उद्या प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी केला जाईल अशी मला नुसती शंका नाही तर खात्री आहे आणि या सभागृहामध्ये मी मुद्दाम हे नमूद करु इच्छितो की, तसा उपयोग होण्याला प्रतिबंध करण्यासाठी खंड 12 नंतर खंड 13 मी सुचविलेला आहे. खंड 13 पुढील प्रमाणे आहे -

"13. या अधिनियमामध्ये काहीही नमूद करण्यात आलेले असले तरी प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या कोणत्याही उपाययोजना अमलात आणण्यास त्यामुळे बाधा येत आहे असे मानता येणार नाही किंवा त्याचा तसा अर्थ लावता येणार नाही." अशा चार सुधारणा मी दिलेल्या आहेत. खरे म्हणजे या चारही सुधारणांना राज्य सरकारने "नाही" म्हणण्याचे काही कारण नाही. कारण एवढेच असू शकते की, आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे ही सुधारणा विधानसभेमध्ये संमत होऊन पुन्हा ती विधानपरिषदेमध्ये येण्यासाठी अवधी लागेल. परंतु हे कारण व्हॅलिड नाही. हजारो लोकांना ज्या स्थितीला आज तोंड द्यावे लागत आहे त्याचा आपण विचार केला पाहिजे. या विधेयकामध्ये एका पेक्षा एक पक्षपातीपणाच्या अशा योजना करण्यात आलेल्या आहेत त्या सा-या योजन मी वाचून दाखवित नाही. पण एकच विनंती करतो. एका बाजूला पूर्ण धरणामध्ये एक थेंबही पाणी नाही अशा स्थितीला तोंड देणारे अकोला शहर आणि तत्सम इतर शहरे यांनासुध्दा समानतेची वागणूक दिली जाईल किंवा नाही अशा या शंका येणा-या काही तरतुदी आहेत. म्हणून मी चौथी सुधारणा सुचविलेली आहे. तांत्रिक बाबी समोर न आणता मी सुचविलेल्या सुधारणा शासनाने स्वीकारल्या आणि सभागृहाने मान्य केल्या तर मला मनापासून आनंद होईल. मी सुचविलेल्या सुधारणा सभागृहाने संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सुधारणा प्रस्तुत झाल्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचे असे विधेयक या सभागृहामध्ये आपण चर्चेसाठी आणलेले आहे. महाराष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेमध्ये एकूणच शिस्त आणण्याच्या दृष्टीने आणि दिशा देण्याच्यादृष्टीने हे विधेयक फार महत्वाचे आहे. या पूर्वी विधानसभा आणि विधानपरिषद या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचे विधेयक आणण्यासंबंधीच्या सूचना केलेल्या आहेत. अशा प्रकारचे विधेयक आणणारे केवळ महाराष्ट्र राज्यच नसून उत्तर प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांनी देखील अशा प्रकारचे विधेयक पास करुन घेतलेले आहे. एनडीए सरकारच्या काळामध्ये तत्कालीन केन्द्रीय अर्थमंत्री श्री.जसवंत सिंग यांनी केन्द्रामध्येही अशा प्रकारचे विधेयक पास करुन घेतले. येणा-या पुढच्या काळामध्ये राज्याच्या अर्थव्यवस्थेला दिशा देणारे असे हे विधेयक आहे. राज्यातील सर्व अर्थतज्ज्ञांनी अशा प्रकारचे विधेयक सर्व राज्यांनी आणावे अशा प्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. महाराष्ट्र हे पुरोगामी आणि अग्रेसर राज्य आहे, सतत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारे राज्य आहे. म्हणून या सदनाने हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी या विधेयकाला सुधारणा सुचविलेल्या आहेत. त्यांचा अनुशेषाबद्दलचा आग्रह, अनुशेषाबाबतची पोटतिडिक आणि त्यांचे अनुशेषाच्या संदर्भातील काम याची सा-या विधिमंडळाला जाणीव आहे. त्यांनी ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत त्या सुधारणा अव्यवहार्य आहेत असे मी कधीच म्हणणार नाही. त्यांनी ज्या सुधारणा दिलेल्या आहेत त्यामधील क्रमांक 2 आणि 3 च्या सुधारणा रुलमध्ये घेण्यास आमची काहीच हरकत राहाणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख ....

आणि सुधारणा क्रमांक 1 आणि सुधारणा क्रमांक 4 देण्यात आलेली आहे. या सुधारणा सध्याच्या बिलाला छेद देणा-या असल्यामुळे, सध्याच्या बिलात या सुधारणाना आजच्या घडीला काही स्थान नसल्यामुळे त्या सुधारणा आम्ही स्वीकारु शकत नाही. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुधारणा क्रमांक-2 "माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार जलसंपदा क्षेत्रासाठी व त्या व्यतिरिरिक्तच्या विकासक्षेत्रासाठी संबंधित वर्षाच्या राज्यसरासरीवर दुर करण्यात आलेल्या किंवा वाढलेल्या भौतिक व आर्थिक अनुशेषाचे विवरणपत्र" अशा प्रकारची सुधारणा दिलेली आहे. ती आम्ही मान्य करण्यास तयार आहोत. यासंदर्भात आम्ही जे रुल्स करणार आहोत त्या रुल्समध्ये आपल्या सूचनेला निश्चित आम्ही स्थान देऊ. त्याच प्रमाणे " सर्वच विकासक्षेत्राशी संबंधित जिल्हावार अनुशेष संपुष्टात आणण्यासाठी शासनाने केलेल्या व करावयाच्या उपाययोजना" अशी सन्माननीय सदस्यांनी तिसरी सुधारणा दिलेली आहे. ही सुधारणा देखील आमच्या रुल्समध्ये घेण्यास काही हरकत नाही. हे विधेयक येण्यापूर्वी विधान परिषदेची नेहमी मागणी रहावयाची आणि एकदा बजेट पास झाल्यानंतर जिल्हावार काय खर्च झाला ? यासंबंधीचे विवरण पत्र सादर केल्या शिवाय सभागृहाचे कामकाज चालत नव्हते. दोन वेळा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. हे विधेयक पास झाल्यानंतर दर तीन महिन्यानंतर आम्ही काय सांगितलेले आहे? आम्ही काय कबूल केलेले आहे? जिल्हावार किती तरतूद देण्याचे कबूल केलेले आहे ? ती तरतूद त्याप्रमाणे खर्च झाले काय ? ती तरतूद खर्च झाली नसेल तर ती का खर्च झाली नाही ? खर्च न करण्यास काय अडचणी आल्या ? यासंबंधीची संपूर्णपणे माहिती घेऊन सन्माननीय अर्थमंत्र्यांना पुन्हा आपल्यासमोर यावयाचे आहे. त्यामुळे जास्त पारदर्शकता येणार आहे. पूर्वी वर्षाच्या अखेरीस अशी विवरणे मागविण्यात येत होती. आता दर तीन महिन्यांनी यासंबंधीची विवरणे घेण्यात येणार आहेत. ही विवरणे तीन महिन्यात मागविण्यासंबंधीची जबाबदारी आल्यामुळे यामध्ये अधिक पारदर्शकता निश्चितपणे येणार आहे. आपण जेवढी तरतूद केलेली आहे ती व्यवस्थित खर्च होते आहे किंवा नाही ? जो अनुशेष आहे तो दूर होतो आहे किंवा नाही ? यासंबंधीची माहिती देण्यात येणार असल्यामुळे अर्थमंत्र्यांची जबाबदारी वाढणार आहे. मी माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छिजो की, आपल्याला यासंदर्भात काही रिझर्व्हशन्स असतील तर आपल्याला त्यासंदर्भात पुढील काळात अमेडमेंट आणता येतील. आमची विधेयक आणण्यामागची भावना अत्यंत चांगली-

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख...

आहे. या विधेयकामुळे एका आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाला 700 कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. 12 व्या वित्त आयोगाने आपल्यावर जी जबाबदारी सोपविलेली आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी त्या फ्रेमवर्कमध्ये हे विधेयक आणलेले आहे. केंद्रात जसे विधेयक पास झाले आहे तसेच विधेयक आपल्यासमोर संमतीसाठी सभागृहासमोर ठेवलेले आहे. मी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांना विनंती करतो की, आमची भावना लक्षात घेऊन, आमचे उत्तरदायीत्व लक्षात घेऊन आपण दिलेल्या सुधारणा मागे घेतल्या तर येणा-या काळात आपल्या मनातील ज्या भावना आहेत. त्या भावना रुल्समध्ये टाकून त्या भावनांना कुठेही छेद देणारे काम सरकार करणार नाही एवढी ग्वाही मी आपणास देतो. सन्माननीय सदस्यांनी आपल्या सुधारणा मागे घ्याव्यात अशी मी पुन्हा विनंती करतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, चार सुधारणापैकी सुधारणा क्रमांक 1 आणि 4 का स्वीकारल्या जात नाहीत हे मला कळू शकले नाही. सुधारणा क्रमांक 2 आणि 3 च्या बाबतीत त्या गुणवत्तेवर योग्य आहेत व त्या रुल्समध्ये आणू असे माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले. रुल्स ही विधानमंडळाच्या हाती नसलेली गोष्ट आहे. माझ्या दोन सुधारणाच्या बाबतीत रुल्समध्ये घेतल्या जाण्यासबंधीचा उल्लेख त्यांनी केला त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. परंतु येथे माझा जो अधिकार आहे तो सोडून द्यावा असे मला काही वाटत नाही. सुधारणा क्रमांक 1 व 4 च्या संदर्भात मी न ऐकल्यामुळे मी माझ्या सुधारणा मांडू इच्छितो. सभापती महोदय, मी आपल्याला पुन्हा सांगू इच्छितो की, सुधारणा क्रमांक 2 आणि 3 या गुणवत्तेवर उत्तम आहेत असे माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने या ठिकाणी सांगितले आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ते आम्ही रुल्स आणू. दुर्देवाची गोष्ट अशी आहे की, संबंध महाराष्ट्राच्या वित्तीय स्थितीचे विवरण करणा-या या विधेयकामध्ये साधी विवरण पत्रे स्वीकारण्याची अमेंडमेंट मंजूर होत नाही.नियमात त्यांनी आणाव्यात त्याबद्दल मी त्यांना शुभेच्छा देतो. नियमांचा अधिकार हा विधानमंडळाचा नाही. तो त्यांचा अधिकार आहे. त्या कामासाठी त्यांना शुभेच्छा देतो. माझ्या सुधारणा विधेयकात आणल्या गेल्या तर अनुशेषग्रस्त भागास फार मोठा दिलासा मिळणार आहे. म्हणून माझ्या सुधारणा सभागृहाने मान्य कराव्यात अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

उप सभापती : आपण आपल्या सुधारणा मागे घेण्यास तयार आहात काय ?

प्रा. बी.टी. देशमुख : नाही.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

उपसभापती : आता मी खंड 2 ला असलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून असंमत झाली.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

उपसभापती : आता मी खंड 3 ला असलेल्या सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून असंमत झाल्या.

खंड 3 विधेयकाचा भाग झाला.

उपसभापती : आता मी खंड 12 नंतर नवीन खंड 13 दाखल करण्यासंबंधीची सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून असंमत झाली.

खंड 2 ते 12(दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,अनुसूची, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक-38 महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन(सुधारणा) विधेयक संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक -38 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद(सुधारणा)विधेयक

L.C. BILL NO. XV OF 2005.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA STATE COUNCIL FOR OCCUPATIONAL THERAPY AND PHYSIOTHERAPY ACT, 2002.)

श्री. दिलीप वळसे-पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक-15 महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम 2002 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.दिलीप वळसे - पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 15 मांडतो.

उपसभपती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.दिलीप वळसे - पाटील : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 15 - महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, 2002 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 15 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 15 संमत झाले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कोणत्याही विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी आपली भूमिका मांडावयास पाहिजे होती. परतु त्यांनी कोणतीही भूमिका मांडलेली नाही. या विधेयकावर काहीही चर्चा न होता ते पास झालेले आहे. विधेयकाचे उद्देश आणि कारणे यामध्ये जे काही सांगितलेले आहे त्या व्यतिरिक्त माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी काहीही सांगत नाही ही पध्दत बरोबर नाही. हे वरिष्ठ सभागृह आहेयेथे येणा-या प्रत्येक विधेयकाचा कायदा तयार केला जातो. असे असतांना त्या विधेयकावर काहीही चर्चा न करता केवळ "होय" चे बहुमत आहे होय चे बहुमत आहे असे सांगून जर आपण ते बिल पास करुन लगेच पुढचे विधेयक चर्चेसाठी घेणार असू तर ते वर्तन आपल्या सभागृहाला शोभणारे आहे काय याचा विचासर करावयास पाहिजे. जर आपण चर्चा करीत नसू तर मग या सभागृहाला वरिष्ठ सभागृह म्हणू नका.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : वैद्यकीय परिषद (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL COUNCIL ACT, 1965.)

श्री.दिलीप वळसे पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, 1965, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक - विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची स्थापना 1993 साली करण्यात आली होती आणि त्या परिषदेची मुदत 1998 साली संपली होती. त्यानंतर परिषदेवर सदस्य निवडून देण्यासाठी निवडणुका घेण्यात आल्या होत्या. त्यावेळी रिझल्ट डिक्लेअर करण्याच्या अगोदर काही जणांनी हायकोर्टात रीट पिटीशन दाखल केले होते. या परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या परंतु माननीय उच्च न्यायालयाने रिझल्टस जाहीर करण्यास स्थगिती दिली होती.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे-पाटील ..

अशा परिस्थितीमध्ये स्थगिती दिल्यानंतर मध्यंतरीच्या काळात परिषदेची मुदत संपली म्हणून त्यावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आणि ही नियुक्ती करताना सुरूवातीस कायद्यामध्ये दोन वर्षाची तरतूद त्यासाठी होती. नंतर तीही मुदत तीन वर्षांपर्यंत वाढविण्यात आली. ती मुदत देखील 13 जानेवारी 2005 रोजी संपली आणि नियुक्त प्रशासकाचीसुद्धा मुदत संपली. परंतु हायकोर्टाचा निकाल लागलेला नाही अशा परिस्थितीमध्ये प्रशासकाचे काम पुढील निवडणुका होऊन परिषद अस्तित्वात होईपर्यंत हा कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव या विधेयकातून आपल्यापुढे मांडण्यात आलेला आहे, तो सभागृहाने मान्य करावा ही विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..... ओ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे जे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे त्यामध्ये वरकरणी जरी हे कारण असे दिसत आहे की, ही सगळी न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत आणि त्यामुळे परिषदेचे काम थांबणार आहे आणि ते न थांबता पुढे चालू आपण ठेवू इच्छिता आहेत. आता ही प्रकरणे न्यायालयामध्ये केव्हा गेली ? ती प्रकरणे जास्तीत जास्त लौकरात लौकर मार्गी लावावी म्हणून शासनातर्फे कोणते प्रयत्न केले गेले आहेत ? आणि यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे तेव्हा कोणते प्रश्न न्यायामध्ये आहेत की ज्यांच्यामुळे आज हे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या मुलांना जो त्रास होतो त्याचा विचार करून आपण हे अधिकारी नेमता पण ते नेमल्यानंतर त्याच्याच हातामध्ये सगळे अधिकार आणि निर्णय राहणार आहेत. म्हणजे ज्या उद्देशाने हे प्रकरण न्यायालयामध्ये गेले तो उद्देश तसाच राहिला आणि तुमचे कार्य तसेच पुढे चालू राहणार आहे. त्यामुळेच याबाबत स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मी मघाशी जो प्रश्न येथे उपस्थित केला तोही हाच आहे की, येथे विधेयक मांडताना ते विधेयक मांडण्यामागील उद्दिष्टे येथे रेकॉर्डवर तुम्ही आणली पाहिजेत. ही उद्दिष्टे लेखी स्वरूपात या विधेयकात दिलेली असतील तरीही त्यातील महत्त्वाचे जे मुद्दे आहेत ते या सदनात मांडले तर त्याची दुसरी बाजूही आम्हाला मिळू शकेल आणि त्यावर चर्चा होऊ शकेल. परंतु तसे न होता, अगोदरच शेवटच्या दिवशी एवढ्या मोठ्या संख्येने विधेयके येथे आणली जातात आणि मग त्यावर पुरेशी चर्चा करता येत नाही आणि चर्चेविनाच ती संमत होतात हे केव्हाही योग्य नाही. आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, खरे म्हणजे हे अधिवेशन किमान 7 आठवड्यांचे व्हायला पाहिजे परंतु ते एक महिन्यामध्येच संपविले जात आहे. वस्तुत: अशा प्रकारचे अधिवेशने ही कमीत कमी 100 दिवस तरी व्हावीत अशी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. परंतु आपण अधिवेशनाचा कालखंड कमी करण्याचाच प्रयत्न करीत आहात, हे बरोबर नाही, उचित नाही. तेव्हा ही विधेयके जेव्हा येथे येतात तेव्हा ती येथे चर्चेसाठी, संमतीसाठी येण्यापूर्वी आम्हाला वाचण्याचा, त्यावर विचार करण्याची संधी मिळाली पाहिजे आणि त्यामध्ये काही दुरूस्त्या, सुधारण आम्हाला सुचविता आल्या पाहिजेत, त्यासाठी पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. परंतु असे घडत नाही. शेवटच्या दोन दिवसात विधेयके येथे आमच्या हातामध्ये ठेवली जातात आणि ती चर्चा करून संमत करण्यास सांगितले जाते. काल परवा देखील

..... ओ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

एका विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर केला आणि आम्हाला सांगितले की, तो वाचा आणि संमत करा. म्हणजे अहवालसुद्धा वाचण्याची संधी सदस्यांना न देता तो संमत करावा अशी भूमिका येथे शासनाकडून घेतली गेली तर ते लोकशाहीला आणि राज्य व्यवस्थेला देखील मारक आहे, घातक आहे. त्यातून ते समाजाला देखील भविष्यात घातक होण्याची शक्यता आहे. आता या विधेयकामध्ये आपण जो अधिकारी नियुक्त केलेला आहे त्याच्या अधिकाराची कक्षा काय आहे हेही आम्हाला येथे समजले पाहिजे. तसेच याची अमलबजावणी कशी होईल हेही समजले पाहिजे. कारण कायदा करूनही तो पायदळी तुडविला जातो, कोण कोणाला जुमानत नाही, आयएएस अधिकाऱ्यावर तुमचा होल्ड रहात नाही अशी परिस्थिती आहे. अशा वेळी आपण याबाबत सदनाला माहिती द्यावी.

*****

..... ओ 4 ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी देखील सहमत आहे. अशा प्रकारे एखादी परिषद कोर्टाच्या निर्णयानुसार 5-5 वर्षांसाठी स्थगित राहणे आणि पाच वर्षामध्ये तेथे प्रशासकाने काम करणे उचित नाही. या बाबतीत कोर्टाने लौकरात लौकर निर्णय जाहीर करावा यासाठी आपण वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत. दुसरे असे की, ही परिषद विद्यार्थ्यांच्या संबंधातील परिषद नाही तर डॉक्टरांसंबंधातील, त्यांची नोंदणी करणे वगैरे संबंधातील परिषद आहे. तरीसुद्धा ज्यावेळेस या विभागाचा कार्यभार मी स्वीकारला त्यानंतर ही बाब माझ्या लक्षात आली तेव्हा ॲडव्होकेट जनरल यांना कळवून त्यांना सांगण्यात आलेले आहे .....

(यानंतर श्री.जागडे ..... पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

पाच वर्षे कोर्टात केस पेंडींग राहिली. परिषदेच्या निवडणूकीचा रिझल्ट जाहीर करण्याबाबत कोर्टाने स्थगिती दिली आहे. ती पाच वर्षे उठवू शकलो नाही. दरम्यानच्या काळात प्रशासक त्या ठिकाणी राहिला. प्रशासकाची मुदत पाच वर्षाची होती. आता त्या प्रशासकाला असे सांगण्यात आले आहे की, येत्या सहा महिन्याच्या कालावधीत या परिषदेची पुन्हा निवडणूक घेण्याच्या दृष्टीकोनातून तयारी करावी. तेव्हा येत्या सहा महिन्याच्या कालावधीत या ठिकाणी निवडणूक होईल. आता प्रशासकाला सहा महिन्याच्या वर त्या ठिकाणी ठेवावयाचे नाही. जानेवारीमध्ये प्रशासकाची मुदत संपली असल्यामुहे त्यांना सहा महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. या ठिकाणी आता सहा महिन्याच्या कालावधीत निवडणूका घेण्यात येतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मेडिकल व्यावसायिकांच्या नोंदणीचा हा प्रश्न आहे. आज महाराष्ट्रात जवळ जवळ पाच हजार बोगस डॉक्टर्स आहेत. लोकांच्या जीवनाशी ते खेळत आहेत. तेव्हा याबाबतचा निर्णय घेण्याची क्षमता या शासनामध्ये आहे की नाही ? सभापती महोदय, शासनातर्फे मांडण्यात येणा-या विधेयकांवर सविस्तर चर्चा होण्याची गरज आहे. राज्यकर्ते जी विधेयके या सदनात आणतील त्यांना आम्ही सहकार्य करणार आहोत. परंतु योग्य विधेयक नसेल तर आम्ही त्याला विरोध करु. त्यावर या ठिकाणी चर्चा करु. मुंबईत आज जवळ जवळ तीन हजार बोगस डॉक्टर्स आहेत. त्यांच्या विरुध्द हे शासन काही कारवाई करणार आहे की नाही ? या बाबत योग्य प्रकारची उपाययोजना करणार आहे की नाही ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या निवेदनावर तसेच लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर माननीय सदस्यांनी या सदनात वेगवेगळे प्रश्न उपस्थित केलेले होते. बोगस डॉक्टर्स असतील नर्सिंग होम असेल तर त्या बाबत एक स्वतंत्र व्यवस्था करुन राज्यातील जनतेकरिता चांगल्या प्रकारची सोय होण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही निर्णय घेत आहोत. मी याबाबत अगोदरच बोगस डॉक्टरांबाबत माझे विचार मांडले आहेत. बोगस डॉक्टरांच्या माध्यमातून तसेच नर्सिंग होमच्या माध्यमातून जनतेच्या जीवाशी कोणी खेळू नये. काल मानवी अवयव रोपनाबाबतची चर्चा झाली आहे. तेव्हा या बाबत निश्चित अशी भूमिका शासनाकडून घेण्यात येत आहे. सभापती महोदय, सभागृहासमोर असलेले विधेयक वेगळे आहे. या ठिकाणी प्रशासकाचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

कालावधी पाच वर्षाचा होता. आता नवीन परीषद अस्तित्वात येईपर्यन्त सहा महिन्याची मुदतवाढ प्रशासकाला देण्याबाबतचे हे विधेयक आहे. त्यामुळे इतर चर्चेमध्ये जाण्याची आवश्यकता नाही, असे मला वाटते.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या ठिकाणी आपण प्रशासक नेमला होता. तेव्हा त्या प्रशासकाने निवडणूकीचा कार्यक्रम अगोदरच घोषीत का केला नाही ? त्या प्रशासकाच्या विरुध्द आपण काही कारवाई करणार आहांत की नाही ? या ठिकाणी मेडिकल कौन्सीलला फक्त रजिस्ट्रेशन देण्याचे काम नाही.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी....

आरोग्य खात्याकडे आपली जाणीवपूर्वक हेळसांड होत आहे. आपणाला फक्त रिझल्ट डिक्लेअर करायला स्टे दिला होता. या व्यतिरिक्त पुढील कोणत्याही कारवाईला कोर्टाने स्टे दिला नाही. शासनाला प्रतिबंध केलेला नाही. असे असतांना तेथील प्रशासकाने याची कारवाई सहा महिने अगोदर कां चालू केली नाही? मतदार यादी कां घोषित केली नाही? आणि हे सर्व सपल्यानंतर आपण हा कायदा आणून त्यांना प्रोटेक्शन देत आहोत. यामध्ये शासनाने कुठेतरी आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. आपण लोकशाहीपासून दूर गेलो आहोत आणि आता आपण. हुकुमशाहीला आणि ब्युरॉक्रेसीला जास्त महत्व ं देत आहोत याचा विचार आपण कां करीत आहोत याचे स्पष्टीकरण करावे? आता तरी तीन महिन्याच्या आत मतदार यादी घोषित होईल यासंबंधीचा कार्यक्रम जाहीर करा. नाहीतर सहा महिन्यांनी पुन्हा मुदतवाढ मागण्याकरिता या सभागृहामध्ये विधेयक मांडले जाईल. तेव्हा त्यासंबंधी ठोस आश्वासन द्यावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या विधेयकाच्या पान क्रमांक 2 वरील कलम 4 मध्ये म्हटले आहे की, "मुख्य अधिनियमाच्या कलम 20 मध्ये व समासटीपेमध्ये, "भारतातील" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी, त्याऐवजी "भारतातील किंवा विदेशातील" हा मजकूर दाखल करण्यात येईल. याबाबत मला थोडे स्पष्टीकरण हवे होते. त्यासाठी सदनाचा वेळ घेण्यात मला रस नव्हता.

श्री. दिलीप वळसे पाटील : मा. सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे आपण कोणत्या विधेयकाविषयी बोलत आहात?

डॉ. नीलम गोऱ्हे : मी 15 क्रमांकाच्या विधेयकावर बोलत आहे...

श्री. दिलीप वळसे पाटील : 15 क्रमांकाचे विधेयक संमत झाले आहे, आता 13 क्रमांकाच्या विधेयकावर चर्चा सुरु आहे...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार साहेबांनी हाच प्रश्न उपस्थित केला होता. आपण मला बोलण्याकरिता वेळ देत आहात याबद्दल मी आपले आभार मानते. परंतु प्रश्न असा आहे की, काही विधेयकांच्या बाबतीत कुणाला बोलायचे आहे की नाही हे न कळताच आपण संमत करीत चालला आहात...

उपसभापती : मा. सदस्या डॉ. नीलमताई आपण तरी हा आरोप कृपया माझ्यावर करु नये. आपण जेव्हा जेव्हा हात वर करता तेव्हा तेव्हा मी आपल्याला संधी देतो. आपण माझे आभारही मानता आणि भारही माझ्यावर ठेवता...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा आरोप नाही तर ही वस्तुस्थिती आहे. ज्याला काही वस्तुस्थितीचा आधार नसतो त्याला आरोप म्हणतात. आणि तुम्ही ज्यावेळी आम्हाला संधी देता त्यावेळी आभार मानणे आमचे कर्तव्यच आहे. सभापती महोदय, शेवटचा दिवस असल्यामुळे कामकाज गुंडाळले जाऊ नये अशी माझी विनंती आहे...

उपसभापती : "आभाराचा भार कशाला, सत्काराचा हार कशाला,
घरच बांधायचे आहे प्रेमाचे त्या हृदयाला दार कशाला"

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दिलीप वळसे पाटील : महादेय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

L.C.BILL NO. XIV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, स-ा 2005 चे वि.प.वि. मांक 14 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अ-ुमती-ने मांडतो.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, लँड रेकॉर्डचे कॉम्प्युटरायझेशन करण्याच्या संदर्भात सर्वात प्रथम वर्धा जिल्हयाने सुरुवात केली. तेव्हापासून आपण या कामाला गती देत गेलो. या माहिती तंत्रज्ञानाचा फायदा केवळ मूठभरांपर्यंत सीमित रहाता कामा नये, त्याचा फायदा जनसामान्यांना सुध्दा मिळावा व सुलभ पध्दतीने त्यांना रेकॉर्ड उपलब्ध व्हावे म्हणून संपूर्ण जिल्हयातील 7/12 चे उतारे व इतर लँड रेकॉर्डचे संगणकीकरण करण्याचे काम सुरु केले. परंतु जो पर्यंत या कामाला वैधानिक दर्जा दिला जाणार नाही तोपर्यंत कोर्टामध्ये हे सर्व रेकॉर्ड ग्राह्य धरले जाणार नाही. म्हणून हे सर्व रेकॉर्ड संगणकामध्ये स्टोअरेज करण्यासाठी हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर या डिव्हाईसचा वापर करणे अपरिहार्य आहे. आणि या डिव्हाईसला कायद्यातील तरतुदीनुसार मान्यता मिळणार नाही तोपर्यंत आपल्याला कोर्टामध्ये किंवा इतर कामांमध्ये जी लिगल डॉक्युमेंट मिळावयास पाहिजेत ती मिळत नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख . . . .

म्हणून या मूळ रेव्हीन्यू कोडमध्ये त्याचा समावेश करण्याच्या संदर्भातील हे छोटेसे आणि आपल्याला मान्य असणारे बिल आम्ही मांडलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार(खाली बसून) : छोटेसे पण महत्वाचे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, होय. छोटे, महत्वाचे आणि आपल्याला सर्वांना मान्य असणारे असे हे बिल येथे मांडलेले आहे, त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, ते चांगले आहे. पण आमच्यासमोर एकच महत्वाचा प्रश्न उपस्थित झालेला आहे की, 7:12 च्या उता-यामध्ये परिवर्तन करणे, खोडाखोड करणे, एक नाव काढून दुसरे नाव टाकणे हे सगळे चमत्कार होत असतात. हे सर्व काम तहसिलदार कचेरीमध्ये आणि विशेषत: त्या भागातील जे तलाठी किंवा इतर अधिकारी असतात, त्यांच्या हातामध्ये हे सर्व असते. त्यामुळे आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, अगदी मुंबई शहरामध्ये सुध्दा अनेक भूखंडाच्या बाबतीत 7:12 च्या उता-यावर नको त्या लोकांची नावे केवळ पैसे स्विकारुन लावली जातात. याचा परिणाम लोकांना त्यांच्या आयुष्यात त्यांना भोगावे लागतात. या सगळया गोष्टीचे आपण संगणकीकरण करीत आहात. एकदा संगणकीकरण केले की त्यामध्ये खाडाखोड करण्यास संधी नाही. एक प्रकारे याबाबतीत चांगले रेकॉर्ड तयार होत आहे, पण माझ्या मनामध्ये एकच आशंका, भीती आहे की, खेडयापाडयामध्ये सुध्दा तलाठी किंवा अन्य संबंधित अधिकारी पैसे घेऊन कुणाची जमीन, कुणाच्या 7:12 च्या उता-यावर, कुणाच्या तरी नावावर टाकतील याचा भरवसा नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि जे रेकॉर्ड आहे, आपण असे म्हणालात की, संगणकीकरणाचे हे संपूर्ण काम पूर्ण झाले आहे. अशा वेळी त्यात होणा-या खाडाखोडीच्या बाबतीत काय केलेले आहे? हे मला माहिती नाही. पण अशा पध्दतीने 7:12 च्या उता-यामध्ये परिवर्तन करुन, खाडाखोड करुन रेकॉर्ड बदलण्याचे चमत्कार आपल्या महाराष्ट्रात खूप ठिकाणी झालेले आहेत. त्या दुरुस्त्या करुन आपण हे सर्व संगणकीकरण केलेले आहात की ज्यावेळी संगणकीकरण झाले, त्यावेळी तुमच्याकडे जे उपलब्ध रेकॉर्ड आहे ते तुम्ही व्हेरीफाय केलेले आहे का ? संबंधित खातेधारकांना विचारुन, ती सगळी व्यवस्था पाहून आपण जर संगणकीकरण केले असेल तर आम्ही या विधेयकाचे स्वागत करतो.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, या सगळयाची आपण नीटपणे काळजी घेतली असून, खाडाखोड होणार नाही. उलट सगळी जी ओरिजनल डॉक्युमेंटस् आहेत, ती आता आपण कॉम्प्युटरमध्ये फीड केल्यामुळे आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक वर्षी ते अपडेट करावे याचीही व्यवस्था आपण यामध्ये केलेली आहे. कारण काही वेळेला जमीन हस्तांतरीत केली जाते किंवा जमिनीवर कर्ज घेतले जाते.त्या कर्जाचा बोजा असतो. तिसरा हक्क म्हणजे थर्ड पार्टी राईटस् निर्माण होतात. त्या प्रत्येकाचे अपडेट करण्याची व्यवस्था आपण यामध्ये केलेली आहे.

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख . . . .

एवढेच नाहीतर यासाठी मोबाईल व्हॅन्स तयार करुन गावागावामध्ये ही मोबाईल व्हॅन त्या ब्लॉक मध्ये फिरत राहील आणि गावातल्या गावात त्याला 7:12 ची प्रत उपलब्ध होईल. अशा प्रकारची व्यवस्था देखील आपण केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे बिल अतिशय चांगले आहे. जुने जे अभिलेख आहेत, शेतक-यांचे रेकॉर्ड आहेत, ते आता नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे अधिक चांगले करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु आहे. मी या बिलाचे स्वागत करतो. फक्त एकच गोष्ट याठिकाणी सांगू इच्छितो की, या तंत्रज्ञानाच्या पध्दतीच्या माध्यमातून काय होऊ शकते ? माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे बिल मांडले, त्यानुसार आता हे सर्व रेकॉर्ड कॉम्प्युटरमध्ये फीड होणार आहे. पण वेळोवेळी शेतक-यांच्या शेतीच्या नोंदीमध्ये फेरफार होतात आणि हे फेरफार करीत असताना तेथील तलाठी काही गडबडी करतो, त्याच्यावर काही हरकती असतात, त्या हरकतींकडे तो दुर्लक्ष करतो. अशा वेळेला हे बिल आल्यानंतर एकदा त्या पटवा-याने फेरफारीच्या नोंदी घेतल्या किंवा एखादा शेतकरी मयत झाला आणि त्याच्या कुटुंबात 4 मुले किंवा मुली असतील तर तो पटवारी मॅनेज होऊन एका मुलाच्याच नावावर ती शेती टाकतो. अशा प्रकारे जर एखाद्या पटवा-याने हे सर्व फीड केले आणि कायमचे ते रेकॉर्ड तयार झाले तर त्याचा इतर मुलांवर अन्याय होऊ शकतो. याचाही थोडासा विचार या करुन असे होणार नाही याची दक्षता घेण्याचे काम या बिलाच्या माध्यमातून केले पाहिजे असे मला वाटते.

उपसभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत माननीय मुख्यमंत्री एकत्रितपणे उत्तरे देतील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.फुंडकर साहेबांनी सांगितले, त्याच विषयात सोयगावची एक बैठक झाली होती, तेथे कॉम्प्युटरायझेशन चांगल्या पध्दतीने झालेले आहे. पण अशाच प्रकारे अडचण आली. मुख्यमंत्री महोदयांनी आताच सांगितले की, संगणकीकरण हे मुठभरांच्या हाती न जाता मोठयाप्रमाणात झाले पाहिजे. त्या संदर्भाने मला महत्वाची सूचना करावयाची आहे. सातबारावर लॅन्ड ओनरचा फोटो हा संगणकाच्या मार्फत आपल्याला एम्बॉस करता येतो, कलर प्रिंट काढता येते. त्याला फार खर्च येत नाही. त्या निमित्ताने खरेच मुठभर जमीन असणाऱ्यांच्या नावावर शेकडो एकर जमीन आहे, हे त्या मूठभरालाही कळेल की, आपण 100 एकर जमिनीचे मालक आहोत. अशी बऱ्याच ठिकाणची शेकडो एकर जमीन वेगवेगळ्या लोकांच्या नावावर असते, परंतु त्यांचा मात्र त्यावर हक्क नसतो, ते त्या ठिकाणी कोणाचे तरी नोकर म्हणून काम करत असतात. परवा एका अधिकाऱ्याचा विषय निघाला, जमीन ड्रायव्हरच्या, क्लिनरच्या नावावर होती. अशा पध्दतीने सूचना देऊन आपण बदल करू शकला तर संगणकीकरणाचा खऱ्या अर्थाने उपयोग होऊ शकेल. शेतकऱ्याला स्वत:चा फोटो आणि त्याच्यासमोर असलेली त्याची जमीन या दोन्ही गोष्टी दिसू शकतील, याला फार खर्च येणार नाही. या संबंधात लॅन्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, काही काही ठिकाणी 50-50 जणांची नावे पी.आर.कार्डवर असतात, त्याचा मिळून एक गट असतो. अशावेळेला आम्ही कसे करायचे ? त्यावर मी सांगितले की, त्याकरिता ॲडीशनल अजंडा टाईप वेगळी यादी लावता येऊ शकते. छोटेछोटे सेक्शन करता येऊ शकतात. "Where there is a will, there is a way" या पध्दतीने त्यावर मार्ग काढता येऊ शकतात. पण मार्ग काढायचाच नाही, शक्य तो असेच ठेवायचे अशाप्रकारची महसूल अधिकाऱ्यांची मानसिकता आहे. माझी अपेक्षा आहे की, मा.मुख्यमंत्री महोदयांनी त्यास गतीमान करून खऱ्याअर्थाने दोन वर्षामध्ये फोटोसह पी.आर. कार्ड किंवा सातबारा उपलब्ध करून द्यावा, त्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये आश्वासन द्यावे, एवढीच विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हे विधेयक मांडले, त्याचे स्वागत करतो. मा.मुख्यमंत्री महोदयांनी नंतरच्या खुलाशामध्ये मोबाईल व्हॅन गावागावात जाईल आणि सातबाराचे उतारे उपलब्ध करून देईल, असे सांगितले. 'सातबारा उतारा शेतकऱ्याच्या दारी' अशाप्रकारची संकल्पना शिवशाही सरकारने मांडून कामाला सुरुवात केली होती. आपण त्याच्या पुढचे पाऊल उचलले. यामध्ये माझ्या दृष्टीने एकच महत्वाचे आहे की, आता जेव्हा संगणकीकरण होईल, हा रेकॉर्ड आऊटपूट काढून ताबडतोब शेतकऱ्यांना दिले पाहिजे. संगणक म्हटला म्हणजे बऱ्याचवेळा चुका या होतात, काही वेळा मानवी चुका होतात, काही वेळा संगणकाकडून होतात. इनपूट काय देणार त्यावर आऊटपूट मिळते. त्या चुका झाल्या आणि अनवधानाने शेतकऱ्याच्या लक्षात आले नाही तर कालांतराने तलाठी आणि बाकीचे लोक त्यांना वेठबिगारासारखे वागवायला लागतील. म्हणून माझी एवढीच विनंती आहे की, आपण जे काही करता त्याचे स्वागत करतो, आपण मोबाईल व्हॅन त्या गावात जाऊन सातबाराचे उतारे देईल, असे आपण म्हणाला. त्यासाठी कालावधी ठरवावा. त्या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना सांगू की आम्ही कॉम्प्युटराईज्ड रेकॉर्ड दिलेले आहे, तुमच्या मूळ सातबाराच्या उताऱ्याची प्रत सुसंगत आहे की नाही, हे पाहून त्याचे कन्फर्मेशन द्या. हे कन्फर्मेशन जाणीवपूर्वक घ्यावे असे मला वाटते. ते कन्फर्मेशन घेतले नाही तर पुन्हा जुने वादविवाद होऊन पुन प्रश्न निर्माण होतील. तेवढीच एक सूचना करण्यासाठी मी बोललो. पुन्हा एकदा या बिलाचे स्वागत करुन माझे बोलणे संपवितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : या ठिकाणी अतिशय चांगले विधेयक आणलेले आहे. पण काही वेळेला "जे नसेल ललाठी ते करील तलाठी", असे काही वेळेला असते. मग काय आपल्या नशीबामध्ये तलाठी करेल याचा नेम नाही. कोकणामध्ये काही वेळेला दोन भाऊ असतील तर त्यापैकी एक शेती करत असतो आणि दुसरा मुंबईत नोकरीच्या निमित्ताने असतो. अशा वेळेला त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सातबाराच्या उताऱ्यामध्ये बदल केला जातो. म्हणून नोंदवह्या आणि दस्तऐवज आता उपलब्ध आहेत, निदान हे सगळे संगणकीकरण होऊन, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी चांगली सूचना केली की, या संबंधात लोकांचे कन्फर्मेशन घ्यावे. कारण निदान पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग आणि विदर्भ सोडला तर कोकणामध्ये आम्ही ज्याला धडे वाटप म्हणतो, अशाप्रकारे छोटे, छोटे तुकडे असतात. दोन भाऊ एकत्र राहू शकत नाहीत, अशावेळी त्याची फसवणूक होणार नाही हे पाहिले पाहिजे. सरपंच, तलाठी याला विश्वासात घेऊन जी फसवणूक केली जाते, ती होणार नाही. कारण लिखित स्वरुपामध्ये रेकॉर्ड आहे, ते पुढे पाच-दहा वर्षे तरी ठेवावे, दुर्दैवाने कोणी त्यामध्ये बदल करुन फसवणूक करण्याचे ठरविले तर त्याला ते करता येणार नाही. त्यानंतर या सातबाराच्या उतारा देण्यास शुल्क आपण किती घेणार ? हा मुद्दा स्पष्ट करावा लागेल. या कामासाठी केंद्रीय अनुदान राज्य शासनाला मिळते, त्यामुळे शुल्क आकारण्याची गरज नाही. एकूणच लॅन्डच्या संबंधाने आपल्याला केंद्र सरकारकडून रिव्हेन्यू मिळतो, त्यामुळे यामध्ये दोन रुपये, पाच रुपये घेण्याची स्थिती असू नये. मी सांगू इच्छितो की,सातबाराच्या उता-याला पाच रुपये पडतात पण तो घेण्यासाठी 100 रुपये तलाठ्याला द्यावे लागतात. अशाप्रकारे चार आण्याची मुर्गी आणि रुपयाचा मसाला असा प्रकार होतो. या निमित्ताने मला दोन सूचना करायच्या आहेत. अतिशय चांगल्या गोष्टी आपण केलेल्या आहेत. परंतु तलाठ्याच्या हातामध्ये फसवणूक करण्याचे काही रहाणार नाही, ही या संगणकीकरणामध्ये काळजी घेण्यात यावी. तसेच लिखित स्वरुपात जो दस्तऐवज आहे, नोंद वह्या आहेत, त्या काही काळ पाच दहा वर्षे तरी कायम ठेवाव्यात. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी एक चांगले विधेयक या ठिकाणी मांडले आहे. या विधेयकाच्या निमित्ताने माझी एकच मागणी आहे. संगणकीकरण झाल्यानंतर स्टाफ अतिरिक्त होणार आहे. म्हणून या स्टाफचे त्या त्या ठिकाणी मूल्यमापन केले पाहिजे. सभापती महोदय, मी अतिशय गंभीरपणे आणि माझ्या अनुभवाने सांगत आहे. माझ्या बँकेचे संगणकीकरण केल्यानंतर स्टाफ कमी झाला. महसूल खात्यामध्ये संगणकीकरण झाल्यानंतर तेथे जास्त स्टाफ झाल्यामुळे त्यांना काम नसेल तर तो वेगळया मार्गाकडे वळू शकतो. त्यादृष्टीकोनातून त्याचे पुनर्वसन कसे करता येईल, याबाबतीत फेर धोरण शासन आखणार आहे काय? ते केले तर निश्चितपणाने ही मॅन पॉवर इतर विकाससाठी आपण वापरु शकतो असे या विधेयकाच्या निमित्ताने मी या ठिकाणी विचार मांडतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख :सभापती महोदय, या ठिकाणी सर्वसाधारणत: सभागृहाने या बिलाचे स्वागतच केले आहे. परंतु काही शंका या निमित्ताने उपस्थित होणे साहजिकच आहे. म्हणून मी एकच सांगू इच्छितो की, या ठिकाणी सात-बाराच्या उता-यावर मालकाचा फोटो लावता आला तर अधिक चांगले राहील अशा प्रकारची पहिली सूचना केलेली आहे. काही वेळेला एका जमिनीचे चार मालक मालक असू शकतात किंवा कंपनी मालक असू शकते किंवा इतर हक्कांमध्ये लोकांचा काही अधिकार असू शकतो, ही बाब निश्चितपणाने तपासून घेण्यासारखी आहे. आम्ही जरुर याचा विचार करु. कारण ते अधिक चांगले होईल. कारण त्याच्यामध्ये मग फारशी खाडाखोड नावात झ ाली तरी त्या फोटोत करता येणार नाहीत. तेव्हा श्री. जोशी महोदेयांनी चांगली सूचना केलेली आहे. तिचा जरुर आम्ही विचार करु. दुसरा मुद्दा दोन सन्माननीय सदस्यांनी मांडला की, आता पर्यंत तलाठयाकडून रेकॉर्ड उपलब्ध होत होते ती व्यवस्था आम्ही सुरु ठेवली आहे. असे नाही की, सात-बाराचे उतारे फक्त संगणकामधूनच मिळतील. तलाठयाकडून सुध्दा ज्याला सात-बाराचा उतारा हवा असेल तर ती पण व्यवस्था ठेवली आहे. या दोन्ही व्यवस्था सध्या सुरु आहेत. ब-याचदा जुन्या वळणाचे लोक असतात त्यांना तलाठयाकडून सात-बाराचे उतारे अधिक शाश्वत किंवा अधिक ऑथेंटिक असे वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून काही दिवस या दोन्ही व्यवस्था आपण सुरु ठेवणार आहेत. त्यामुळे त्याचीही काही फारशी अडचण होणार नाही. तिसरा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, संगणकीकरणामुळे स्टाफ अतिरिक्त होईल. खरे म्हणजे महसूल विभागात नव्या नव्या ठिकाणी आणखी पोस्ट वाढविण्याची मागणी करण्यात येत आहे. खरे म्हणजे सात-बाराचे उतारे देण्याचे काम प्रामख्याने तलाठी करीत होता. तलाठयाकडे जी इतर अनेक कामे आहेत त्यात हेही एक काम होते. त्यामुळे या पध्दतीमुळे त्याला थोडीफार राहत रीलिफ निश्चितपणाने मिळेल. परंतु संगंणकीकरणामुळे यामध्ये वारंवार खाडाखोड करण्याचे जे प्रकार होत होते ते होणार नाहीत. कारण एकदा संगणकामध्ये मूळ रेकॉर्ड आत गेल्या नंतर सहजपणाने त्यामध्ये खाडाखोड करणे शक्य होत नाही. कारण अनेक ठिकाणी तो सातबाराचा उतारा असेल. कलेक्टरकडे असेल, तहसीलदाराकडे असेल, डायरेक्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

तलाठयालाही तो उपलब्ध होऊ शकेल. ही सगळी व्यवस्था निर्माण केली गेल्यामुळे एका ठिकाणी जरी खाडाखोड केली तरी कारण पूर्वी एकच रेकॉर्ड असायचे आता चार ठिकाणी ते रेकॉर्ड असल्यामुळे त्याच्यावर आपोआप मर्यादा निश्चितपणे येणार आहे. त्यामुळे सहजपणे कोणाचेही नाव टाकता येईल ही परिस्थिती नव्या परिस्थितीमुळे राहणार नाही. कारण तीन-चार ठिकाणी ते रेकॉर्ड असणार आहे. आणि म्हणून मला असे वाटते की, चुकीचे नांव दाखल करणे आणि रेकॉर्डवर कारण नसताना बोजा निर्माण करणे हा जो कल असतो तो निश्चितपणानने दूर होईल. मोबाईल व्हॅन गावागावात पाठवून ते सात-बाराचे उतारे देण्याची व्यवस्था, पायलट स्कीम म्हणून ती व्यवस्था राज्यात सुरु केली आहे. त्याची व्याप्ती राज्यभर वाढविणार आहेत याचा फायदा निश्चित पणे होईल. खरे म्हणजे सात-बाराचे उतारे मिळण्यासाठी जे शुल्क लावले आहे, ते 15 रुपये लावलेलें आहे. त्याचा उद्देशच हा आहे की, त्यातून जो पैसा येईल त्यातून व्हॅन चालवायची आहे.त्यातून गाडीचा आणि ड्रायव्हरचाही खर्च निघाला पाहिजे. आपण सांगितले की, पाच रुपये असेल तर त्याला 100 रुपये खर्च येतो. तो खर्च होणार आहे. त्यामुळे निश्चितपणाने त्याला पंधरा रुपयात सातबाराचा उतारा मिळेल. तो प्रत्येक वर्षी सात-बाराचा उतारा घेऊ शकतो, आपल्या रेकॉर्डला ठेवू शेकतो, त्याचे व्हेरिफिकेशन तो स्वत: करु शकतो. अशी व्यवस्था यामध्ये केलेली आहे. आजचा विषय त्याला वैधानिक दर्जा, लिगल स्टेटस देणारा हा विषय आपल्यासमोर मांडलेला आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ....

कारण याला आपण एकदा मान्यता दिली की, उद्या कोर्टामध्ये सुध्दा हा रेकॉर्ड ग्राहय धरला जाईल. आज तो ग्राहय धरला जात नाही. कारण त्यामध्ये ही व्यवस्था नाही. म्हणून या नवीन व्यवस्थेला वैधानिक दर्जा देण्यास सदनाने मान्यता द्यावी. आपण केलेल्या सूचनांचा शासन निश्चित विचार करील हे आश्वासन देऊ इच्छितो.

प्रश्न मता टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. विलासराव देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 14 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 14 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या सभागृहामध्ये आता माननीय मुख्यमंत्री बसलेले आहेत. आपण या राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अधिवेशनाच्या सुरुवातीला दिलासा दिला. त्यावेळी 1200 कोटी रुपये देण्याचे आपण जाहीर केले आणि शेतकऱ्यांना कापसाची रक्कम देण्यास सुरुवात केली. 15 मार्चला या राज्याच्या माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये सांगितले की, 1200 कोटी रुपये आम्ही तीन दिवसांमध्ये शेतकऱ्यांना देण्याची व्यवस्था करु आणि तीन दिवसानंतर त्यांना पैसे देण्यास सुरुवात केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी या राज्याच्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना असा शब्द दिला होता की, हे अधिवेशन संपण्याच्या आत कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे पै न पै पैसे ताबडतोब देऊ. आज अधिवेशन संपत आहे. आपण 1200 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. ते पैसे देण्याची प्रक्रिया सुरु झाली परंतु त्या प्रक्रियेमध्ये 20 क्विंटलपर्यन्त कापूस घातलेल्या शेतकऱ्यांना कापसाचे पैसे देण्यास सुरुवात केली. ज्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी 20 क्विंटल 10 किलो कापूस विकला असेल त्यांना पैसे मिळाले नाहीत. 10 किलोसाठी त्यांच्या संपूर्ण कापसाचे पैसे रोखले गेले. माननीय मुख्यमंत्र्यांकडे लोक आशेने पाहात आहेत. आपण शब्द दिला होता. तुमच्या पक्षाने जो शब्द दिला तो पाळला की नाही हे माहीत नाही. निवडणुकीच्या वेळी कापसाला 2700 रुपये भाव देण्याचे जाहीर केले होते त्याप्रमाणे भाव दिला नाही. त्यानंतर 2500 रुपये भाव देऊ केला पण तोही भाव मिळाला नाही. आपण 2200 रुपये या भावाने कापूस खरेदी केली. या राज्यामध्ये एक ऐतिहासिक अशी कापूस खरेदी झाली परंतु सहा सहा महिने या राज्यातील शेतकऱ्यांना कापसाचे पैसे मिळालेले नाहीत. एका बाजूला पैसे मिळत नाहीत, व्याज माफ झाले नाही त्यामुळे विदर्भ प्रदेशामध्ये 10 हजार गावांमध्ये दुष्काळ असताना पैसे न मिळाल्यामुळे कर्ज फिटले नाही. जिल्हा बँकांनी त्यांच्या प्रॉपर्टीची हराशी लावली, जप्ती लावली. त्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली. अजूनही आत्महत्यांचे सत्र सुरु आहे. आपण शब्द दिला होता की, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे देऊ. त्यासंबंधी जर माननीय मुख्यमंत्र्यांनी या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिला आणि आज जर काही जाहीर केले तर अधिक चांगले होईल असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्दयाला पाठिंबा देत असताना मला यावर बोलावयाचे आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्यासंदर्भात दोन तीन गोष्टी शासनाच्या लक्षात आणून देण्याची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट अशी की, निवडणुकीत तुम्ही काय जाहीर केले होते तो त्यावेळचा प्रश्न होता. मी त्यासंदर्भात उगाळत बसत नाही. परंतु आपण जे धोरण म्हणून ठरवितो ते मागेपुढे होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. निर्णय घेण्यापूर्वी शंभरवेळा विचार करावा परंतु एकदा निर्णय घेतला की, त्याला चिकटून राहिले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

या हमी भावाने आम्ही तुम्हाला पैसे देऊ. तर ते पैसे वेळेवर देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. ज्या पध्दतीने राणाभीमदेवी थाटामध्ये येथे सांगितले की, 1200 कोटी रुपये आम्ही 3 दिवसामध्ये देतो. त्याच्यावर खूप मोठे रामायण घडले आणि अद्याप शेतक-यांना पैसे मिळालेले नाहीत. ज्यांनी 20 क्विंटल कापूस पिकविला आहे ते शेतकरी आणि ज्यांनी 50 क्विंटल कापूस पिकविला ते शेतकरी नाहीत काय ? त्यांना गरज नाही काय, जितकी शेती जास्त तितका खर्च जास्त हे आपण जाणता. केवळ छोटया शेतक-यांची गरज जास्त आहे आणि मोठया शेतक-यांना गरज नाही असे मी मानत नाही. प्रश्न फक्त एकच येतो की, जी कमिटमेंट करता ती ऑनर करणे हे कोणत्याही शासनाचे पहिले कर्तव्य आहे आणि तेच नेमके घडत नाही. विजेच्याबाबतीत तसे घडले आहे. विजेची बिले माफ करतो असे शासनाने सांगितले होते परंतु अद्यापी लोकांना बिले जात आहेत. कर्ज माफ करतो असे सांगितले पण लोकांची कर्जे तशीच आहेत. शासन म्हणून जे धोरण ठरविता ते स्पष्टपणे जाहीर करावे आणि त्याच्याशी चिकटून रहावे. मुंबई शहराबाबत असेच घडत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय, मी आपले अभिनंदन करतो. काल दिल्लीमध्ये मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये आपण जे सांगितले ते आम्ही येथे 12-13 वर्षे ओरडून सांगत आहोत. मी लोकसभेमध्ये सुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी मार्क्सवादी पक्षाचे खासदार बसले होते ते सगळेजण माझ्या अंगावर धाऊन आले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, ते तुम्हाला एवढे जवळचे वाटत असतील तर बांगलादेशीय नागरिकांना तुमच्या कलकत्यामध्ये पाठवितो. तुम्ही त्यांना सांभाळून ठेवा, आमची काही तक्रार नाही. परंतु कोणतेही बांगलादेशीय नागरिक संपूर्ण देशामध्ये राहणे हे योग्य नाही. आज आसामची परिस्थिती काय आहे ? बांगलादेशीय नागरिकांनी संपूर्ण राज्य व्यापून टाकले आहे आणि त्यांना बाहेर काढणे आता कठीण आहे. आपल्याला त्याची कल्पना आहे. आताच आपण मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये जाऊन आला आहात. यादृष्टीने शासनाला मला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, तुमच्यासमोरची आव्हाने काय आहेत ? आर्थिकदृष्टया संपूर्ण राज्याची परिस्थिती तपासून त्यासंबंधी कोणती परखड पावले उचलू शकतो त्यावर शासनाने विचार केला पाहिजे. जी कमिटमेंट आहेत ती फूलफिल केली पाहिजेत तरच लोकांचा शासनावरील विश्वास वाढेल. आश्वासने द्यावयाची, घोषणा करावयाच्या आणि प्रत्यक्षात अंमलबजावणी नाही, हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

भयानक चित्र आहे. यादृष्टीकोनातून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे मी त्याला पाठिंबा देतो. आपण सगळा कारभार ज्या पध्दतीने पुढे नेत आहात त्याविषयी विश्वास ही सगळयात महत्वाची गोष्ट आहे. आर्थिक क्षमता नसणे हा गुन्हा आहे असे मी मानत नाही, परंतु आर्थिक क्षमता नसताना घोषणा करणे हा मात्र निश्चित गुन्हा आहे, असे होऊ नये यादृष्टीने मी या औचित्याच्या मुद्याला पाठिंबा देत आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी जो औचित्याचा मुद्या उपस्थित केला आहे त्याला एक उपसूचना करीत आहे. त्यांनी बोलताना असे सांगितले की, ज्याचा कापूस 20 क्विंटलपर्यंत आहे तो खरेदी करु असे शासनाने सांगितल होते. परंतु ज्या शेतक-याने 20 क्विंटल आणि 10 किलो कापूस विकला असेल त्याला पैसे दिले जात नाहीत. त्यांचा कापूस खरेदी केलेला आहे परंतु पैसे दिले जात नाहीत. म्हणून माझी सूचना आहे की, 30 क्विंटलच्या वर कापूस असू द्या, 50 क्विंटल कापूस असू द्या परंतु त्याला 20 क्विंटलचे तरी पैसे द्या ही व्यथा त्यांनी मांडली आहे. त्यांनी असे म्हटले की, 20 क्विंटलच्यावर 10 किलो जरी असला तरी पैसे मिळालेले नाहीत....

उप सभापती : मा.सदस्यांनी कृपया खाली बसावे. मा.मुख्यमंत्री महोदय औचित्याच्या मुद्याला उत्तर देत आहेत.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात राज्यशासनाची भूमिका स्पष्ट आहे. कारण ज्याचा कापूस घेतला आहे त्याचे पैसे वेळेवर दिले पाहिजेत ही गोष्ट आम्ही सगळे जाणतो. यावर्षी एवढे अमाप पीक आले त्यामुळे राज्यसरकारचे सगळे अंदाज चुकलेले आहेत. म्हणून पेमेंटला विलंब लागत आहे. शासनाने जो कापूस खरेदी केलेला आहे त्याचे 3600 कोटीचे पेमेंट करावयाचे आहे. आतापर्यंत त्याच्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये सुरुवातीला 20 क्विंटल कापसाचे पेमेंट करावे म्हणजे निदान लहान शेतक-यांचे तरी त्याच्यातून पैसे मिळतील. मा.विरोधी पक्ष नेते असे म्हणाले की, 20 क्विंटलच्या वर 10 किलो जरी असेल तर 10 किलो कापसाचे पैसे दिलेले नाहीत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्याचा कापूस 20 क्विंटलच्या वर होता म्हणजे 20 क्विंटल 30 किलो विकला तर, 20 क्विंटल 40 किलो विकला तर तो शेतकरी लटकला. शासनाने फक्त 20 क्विंटल आणि त्याच्या आतील शेतक-यांना पैसे दिले आहेत. म्हणून मी असे सांगितले की, हा रेश्यो कसा काय लावण्यात आला ? त्याऐवजी 20 ते 30 क्विंटल असे केले असते तर 20 क्विंटल 40 किलो विकलेल्या शेतक-याला पैसे मिळाले असते, 21 क्विंटल, 22 क्विंटलवाल्या शेतक-याला पैसे मिळाले असते.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, पैशाची मूळ अडचण असल्यामुळे हे सर्व प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्याच्यातून मार्ग काढण्याचे शासनाने ठरविलेले आहे. मी सभागृहाला यापूर्वीही सांगितलेले आहे. खालच्या सभागृहात हा प्रश्न उपस्थित झाला होता तेव्हा आम्ही असे म्हटले होते की, अधिवेशन संपण्यापूर्वी हे पेमेंट करु. परंतु मुळात अधिवेशनाचा कार्यक्रम 27-28 एप्रिल पर्यंत ठरविला होता. तो कालावधी गृहित धरुन आमचे ते आश्वासन होते.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख...)

अधिवेशन थोडेसे लवकर संपत आहे. आम्ही आश्वासन बदललेले नाही, आश्वासन कायम आहे. म्हणून या महिना अखेर 30 एप्रिल पूर्वी हे पेमेंट करण्याच्या संदर्भातील भूमिका सरकारने घेतलेली आहे. त्याप्रमाणे पैशाची व्यवस्था करण्यासाठी वेगवेगळया बँकांशी संपर्क सुरु केलेला आहे. 30 एप्रिल पूर्वी सर्व शेतक-यांचे पेमेंट होईल हे मी पुन्हा एकदा सभागृहाला सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी.: औद्योगिक विविद (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C.BILL No. VI OF 2003

A BILL FURTHER TO AMEND THE INDUSTRIAL DISPUTES ACT,1947 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2003चे वि.प.वि.क्रमांक 6 - औद्योगिक विवाद अधिनियम, 1947, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापति महोदय, औघोगिक विवाद अधिनियम, 1947 में संशोधन करने के लिए यह विधेयक लाया गया है. इस अधिनियम के सेक्शन दो में "1600 रुपये" के बजाए "6500 रुपये" करना है. इस प्रकार की अमेंडमेंट है. 1984 में कामगारों को जो वेतन दिया जाता था, उसके संबंध में 1600 रुपये की तरतूद इस विधेयक में की गई थी. अब प्रति माह 6500 रुपये तक वेतन लेने वाले पर्यवेक्षकों का समावेश करने के लिए विहित किए गए वेतन सीमा में वृध्दि करने के लिए सेक्शन 2 में अमेंडमेंट की जा रही है.

उसी प्रकार से सेक्शन 9 में एक अमेंडमेंट की जा रही है. विद्यमान यंत्र सामग्री के आधुनिकीकरण, संगणकीकरण के कारण कामगारों के कुल वेतन एवं काम के घंटों पर परिणाम न हो एवं कामगारों के हित में आवश्यक सुविधा करना नियोक्ताओं को संभव हो इसलिए सेक्शन 9 में अमेंडमेंट करने के लिए यह विधेयक लाया गया है. ये अमेंडमेंट कामगारों के हित में है. इसलिए मैं माननीय सदस्यों से अनुरोध करता हूं कि वे इस विधेयक को पारित करें. धन्यवाद.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2003चे वि.प.वि.क्रमांक 6 - औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकासंबंधीचा उद्देश सांगत असताना माननीय मंत्री महोदय कलम 9 (अ) संबंधात बोलले की कलम 9 (क) संबंधात बोलले हे काही मी समजू शकलो नाही.

श्री. बाबा सिद्दीकी : कलम 9(अ)

श्री. मधुकर सरपोतदार : कलम 9(अ) कशाच्या संदर्भात आहे हे मंत्री महोदयांना माहीत आहे काय ? मंत्री महोदय 9 (क) संबंधी बोलत आहेत.

श्री. बाबा सिद्दीकी : सेक्शन 2 आणि सेक्शन 9 मध्ये सुधारणा करीत आहोत.

उप सभापती : मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपले भाषण सुरु करावे. त्यानंतर मा.मंत्री महोदय खुलासा करतील.

श्री. मधुकर सरपोतदार : माझी मंत्री महोदयांना एक सूचना आहे. सगळयाच गोष्टी एखाद्या मंत्र्यांना माहीत असायला पाहिजे असा आमचा आग्रह नाही. परंतु एद्याच्या सेक्शनमध्ये परिवर्तन करण्यासाठी जेव्हा सुधारणा मांडली जाते त्यावेळी त्यामध्ये चुका होऊ नयेत याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या कायद्याच्या प्रत्येक कलमामध्ये कामगार वर्गाचा जीवनमरणाचा प्रश्न आहे. आज कामगार वर्ग धोक्याच्या शेवटच्या टोकावर उभा आहे. त्याचे अस्तित्वच धोक्यात आलेले आहे. बारीक बारीक सुधारणा आणून या कामगारांना भविष्यात आपण कुठे ढकलून देणार आहात हे काही कळत नाही. या विधेयकान्वये जे सुपरवायझरी लोक आहेत आहेत ज्यांना पर्यवेक्षक म्हटले जाते त्यांच्या पगारामध्ये परिवर्तन करणार आहात.त्यांचा पगार दरमहा साडेसहा हजार रु. करणे हा तुमचा मूळ उद्देश आहे.

..नंतर श्री. गिते...

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

ABG/ KGS/ SBT/ MAP/ MHM/ प्रथम श्री.शिगम 11:55

श्री.मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय, उद्या साडेसहा हजार रुपये त्याचा पगार झाला. आपण त्यास "कामगार" या संज्ञेमध्ये बसविणार आहात काय ? खंड-9 (क) मध्ये असे म्हटले आहे की, "नवीन कामाचे कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून नियोक्ता,कामगारांना प्रशिक्षण इत्यादीसारख्या सर्व कायदेशीर आणि आवश्यक सुविधा पुरवीत असेल, त्याबाबतीत ". आता नवीन नवीन कामे येत आहेत त्याच्या संबंध 9 (अ) येतो. 9 (अ) सेक्शन असे आहे की, एखादा कामगार स्कील्ड आहे. स्कील्ड टर्नरला दुसरे काम द्यावयाचे असेल त्यामध्ये अशी तरतूद आहे की, "Without making any changes in his status, he can be given alternate work" असा त्याचा अर्थ आहे. यात स्टेटस जर चेंज होत असतील कलम 9 (अ) त्याला परवानगी देत नाही. हा कलम 9 (अ) चा अर्थ आहे. आपण विधेयक आणून आपण साडेसहा हजार रुपयांची मर्यादा केली त्याबद्दल आमची काही तक्रार नाही. त्याला साडेसहा हजार रुपये पगार दिला नंतर त्याची संज्ञा "कामगार" या वर्गात बसते आहे की नाही याचा खुलासा या ठिकाणी केला गेला पाहिजे. त्याला "कामगार" म्हणून संबोधणार की नाही ? सभापती महोदय, या ठिकाणी वि.प.वि.क्र.4 मांडलेले आहे. त्यात औद्योगिक विवाद अधिनिय, 1947,महाराष्ट्र राज्यास लागू असताना यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम"असा करण्यात आला आहे. त्याच्या कलम 2 मधील,खंड (घ) मधील उप खंड (चार) मध्ये "एक हजार सहाशे रुपयाहून" या मजकुराऐवजी " सहा हजार पाचशे रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल. एक हजार सहाशे वरुन ही मर्यादा सहा हजार पाचशे पर्यन्त गेलेली आहे. साडेसहा हजार रुपये ज्यांना पगार मिळतो तो या कायद्यामध्ये बसेल असा त्याचा अर्थ होता. दुसरा बदल खंड 3 च्या (ग) मध्ये दिलेला आहे. तो असा आहे की, "विद्यमान यंत्रसामग्रीच्या अद्ययावतीकरणामुळे किंवा पुन:स्थापनेमुळे, संगणकीकरणामुळे किंवा स्थावर मालमत्तेत वाढ झाल्यामुळे आणि उत्पादनात वाढ झाल्यामुळे बदल करण्यात आला असेल तर". यासाठी काय करावयाचे त्या संबंधीची देखील माहिती विधेयकात नमूद केलेली आहे. ती अशी आहे की, अशा बदलामुळे कामगारांच्या एकूण वेतनावर आणि त्याच्या कामाच्या तासांवर परिणाम होणार नसेल, त्याबाबतीत, आणि नवीन कामाचे कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून नियोक्ता, कामगारांना प्रशिक्षण इत्यादीसारख्या सर्व कायदेशीर आणि आवश्यक सुविधा पुरवीत असेल त्या बाबतीत." या दोन तरतूदी म्हणजे "क" हे नवीन सेक्शन तुम्ही जोडता आहात. हे सेक्शन पूर्वी नव्हते. आहे त्यात आपण ॲडीशनल तरतूद करीत आहात.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

दुसरा पगाराच्या सेक्शनमध्ये बदल करीत आहात. या दोन गोष्टींसाठी आपण या ठिकाणी विधेयक आणले आहे. विधेकय वाईट आहे असे आमचे म्हणणे नाही. परंतु त्याचे भविष्यकाळात दूरगामी काय परिणाम होऊ शकतात याची खरी माहिती घेण्याची आवश्यकता आहे. पूर्वीच्या औद्योगिक विवाद कायद्यामध्ये जो पर्यवेक्षक होता त्याला "कामगार" समजत नव्हते. तो कामगार या सज्ञेत बसत नसल्यामुळे त्याला औद्योगिक न्यायालयात किंवा कामगार न्यायालयामध्ये त्यांना जाता येत नाही. त्यांना तेथे जाण्यास परवानगी नव्हती. कामगार आयुक्ता समोर देखील जाण्यास त्यांना परवानगी नव्हती. म्हणून मी आपल्याला स्पेसिफीक प्रश्न विचारला आहे की, आपल्या म्हणण्याप्रमाणे जे पर्यवेक्षक आहेत, ज्यांचा पगार साडेसहा हजार रुपये होणार आहे. साडेसहा हजार रुपयांच्या मर्यादेपर्यन्त असे सगळे पर्यवेक्षक Whether they can be considered as workmen? या प्रश्नाचे आपल्याला उत्तर द्यावे लागेल. दुसरे "क" खंडाचा गैरफायदा घेऊन असे तर होणार नाही ना की, सेक्शन 9(अ) च्या तरतूदी या "क" मध्ये वापरुन घेऊन त्या कामगार वर्गावर उद्योगपती अन्याय करणार नाही अशा प्रकारची शाश्वती आपल्याला या सदनात हे विधेयक पास होण्यापूर्वी द्यावी लागेल. या विधेयकातील ही तरतूद महत्वाची असल्यामुळे त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. धन्यवाद.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : या सभागृहात जे विधेयक मांडण्यात आले आहे त्याचा परामर्श या सभागृहातील जेष्ठ सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांनी घेतला आहे. 1600 रुपये पगार अशी जी व्याख्या होती त्यातून हा मूळ मुद्दा पुढे आला आहे. 1600 रुपये बेसीक का सर्व वेतन हा खरा प्रश्न आहे. चौथा वेतन आयोग आणि पाचवा वेतन आयोग यातून हा प्रश्न निर्माण झाला.

यानंतर श्री.कानडे..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....
सभापती महोदय, 5 वा वेतन आयोग केंद्र सरकारने लागू केल्यानंतर या राज्यामध्येही लागू करेण्यात आला. याठिकाणी लागू केल्यानंतर पर्यवेक्षकांचा पूर्वीचा 1600 रुपये बेसिक होता तो आता 6500 होणार आहे. पर्यवेक्षक हे तृतीय श्रेणीतील कर्मचारी आहेत. यामुळे आता बोनस ॲक्टमध्ये देखील अमेंडमेंड करावी लागणार आहे आणि त्याचा फायदा या पर्यवेक्षकांना होणार आहे. बोनस ॲक्टमध्ये देखील 6500 रु.प्रमाणे तरतूद करावी लागेल. 6500 रु. हा मूळ पगार राहणार आहे किंवा एकूण पगार राहणार आहे याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा. कलम 9(क) मधील तरतूद शासनाने लक्षात घ्यावी.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, मी या विधेयकाचे स्वागत करतो. उद्देश आणि कारणे दिलेली आहेत त्यामध्ये दुस-या परिच्छेदात असे म्हटले आहे की जागतिकीकरण,पुन:संघटन व उदारीकरण यामुळे मनुष्यबळावर परिणाम झाला आहे. म्हणजेच मनुष्यबळाची आवश्यकता कमी झाली आहे. इ. मला असे वाटते की औद्योगिक लवादाचा परिणाम होतो आहे किंवा नाही याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, मा. सदस्य सरपोतदार जी को बताना चाहता हूँ कि "वर्कमॅन" आई.डी.बी. एक्ट में कवर होगा, यह वर्कमॅन के लिए ही बनाया गया है. दूसरी बात यह है कि अगर आप इसे अंग्रेजी में देखेंगे तो क्लॉज 9(ए) मे ही यह अमेंडमेंट प्रपोज किया है. मा. सदस्य श्री. सावंत को बताना चाहता हूँ कि इसमें बेसिक और डी.ए. शामिल है.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की 6500रु. पर्यंत पर्यवेक्षक म्हणून काम करतील. ते कामगार म्हणून संबोधले जातील काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय "होय" .

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.
खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-6 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक-3 संमत झाले आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : अजून विधानसभेत पास झालेली बिले याठिकाणी चर्चेला आणि मंजुरीसाठी यावयाची आहेत. आपण आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक तहकूब करु.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, 2005-06 या वर्षाचे मासिक निधी वितरणाबाबतचे विवरणपत्र अजून प्रिंट झालेले नाही. दोन तासामध्ये ते मिळेल.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, मी काल अशी सूचना केली होती की, आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक न ठेवता दुपारी 12.00 वाजता ठेवण्यात यावी.खालच्या सभागृहात विधेयके पास झाल्यानंतर ती आपल्याकडे येणार आहेत. आपल्याकडे जी विधेयके आहेत ती पास झाल्यानंतर विधान सभेकडून विधेयके येईपर्यन्त आपण काय करावयाचे ?असा प्रश्न उपस्थित होईल असे मी काल सांगितले होते .आज नेमके तेच झालेले आहे. अति उत्साह कधी कधी सर्व सन्माननीय सदस्यांना गैरसोयीचा ठरत असतो.

उपसभापती : आपल्या सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांचे ऐकावयास पाहिजे होते.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, परतु कोणीही ऐकत नाही हीच आमची व्यथा आहे.आता दोन तास वाट पहात बसण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. तेव्हा आता पुढचे सर्व कामकाज संपवून टाकावे. असे मला वाटते. आम्ही दोन तास कशाला वाट पहावयाची ? खालच्या सभागृहात विधेयके पास झाल्यानंतर ती आपल्याकडे येणार आहेत त्यानंतर ती आम्ही वाचणार आणि चर्चा करणार. त्यामध्ये बराच वेळ जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : काल अर्धा तास चर्चा सुध्दा घेण्यात आली नाही.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(12.06 ते 2.30 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नतर श्री.सुंबरे

(मध्यंतरानंतर ....)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी. : नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये, महात्मा फुले वस्तूसंग्रहालय,पुणे., महाराष्ट्र कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,2005.

L.A.BILL NO. LII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE NAGPUR IMPROVEMENT TRUST ACT,1936, THE MAHARASHTRA SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION BOARDS ACT,1965,THE MAHARASHTRA PUBLIC LIBRARIES ACT,1967, THE MAHATMA PHULE VASTU SANGRAHALAYA, POONA ACT,1968, THE MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT,1983,THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT,1994 AND THE MAHARASHTRA UNIVERSITIES OF HEALTH SCIENCE ACT,1998

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 52 - नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम,1963, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम 1965, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967, महात्मा फुले वस्तुसंग्रहालय,पुणे अधिनियम 1968, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम 1983, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 52 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 52 - नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम,1963, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम 1965, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम 1967, महात्मा फुले वस्तुसंग्रहालय,पुणे अधिनियम 1968, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम 1983, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील ज्या विविध विद्यापीठांच्या अधिसभा आहेत, कृषि विद्यापीठांची कार्यकारी परिषद आहे, राज्य शिक्षण मंडळे, नागपूर सुधार प्रन्यास, सार्वजनिक ग्रंथालये आदी ज्या संस्था आहेत की अशा संस्थांवर महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य जाण्यासाठी म्हणून माननीय अध्यक्ष, विधान सभा आणि माननीय सभापती, विधान परिषद यांच्या माध्यमातून निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करतो आणि त्याप्रमाणे निवडणुका होऊन सदस्य या संस्थांवर निवडून जातात, त्यांची नेमणूक आपण या संस्थांवर करतो. परंतु मी या ठिकाणी ही जी दुरूस्ती सुचविली आहे त्यानुसार या निवडणुकांच्या माध्यमातून विधीमंडळाकडून सदस्यांची नेमणूक करण्याऐवजी माननीय अध्यक्ष, विधानसभा आणि माननीय सभापती, विधान परिषद यांना हे सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार प्रदान आपण करीत आहोत. ज्याप्रमाणे विधीमंडळाच्या अन्य समित्यांवर सदस्यांच्या नेमणुका या दोन्ही पीठासीन अधिकाऱ्यांकडून केल्या जातात त्याचप्रमाणे या संस्थांवर देखील त्यांचेमार्फत सदस्यांच्या नेमणुका कराव्यात अशी ही सुधारणा याद्वारे आपण करीत आहोत. सभापती महोदय, गेली तीन वर्षे दोन्ही सदनातील सर्वच सदस्यांची ही वेळोवेळी मागणी होती आणि आपल्या मार्फत हा कार्यक्रम जाहीर व्हायचा परंतु एकमत न झाल्यामुळे 3-3, 4-4 वर्षे या संस्थांवर विधी मंडळाकडून सदस्य पाठविला गेलेला नाही. त्यामुळेच मुख्यत्वे करून आपण ही दुरूस्ती येथे आणली आहे आणि याद्वारे हा अधिकार आपण सर्वस्वी माननीय अध्यक्ष, विधानसभा आणि माननीय सभापती, विधान परिषद यांना देत आहोत की जे या सर्वोच्च सभागृहांचे सर्वोच्च अधिकारी आहेत. तरी सभागृहाने या दुरूस्ती विधेयकाला मान्यता द्यावी जेणे करून विधीमंडळाचे सदस्य या संस्थांवर सहजरित्या जाऊ शकतील.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(यानंतर श्री.जागडे ....बीबी 12...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहासमोर 2005 चे वि. स. वि. क्र. 52 चर्चेलाआहे. नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ तसेच इतर मंडळावर विधानसभा तसेच विधान परिषद सदस्य पूर्वी निवडणूकीच्या माध्यमातून पाठविले जात होते. आता हे विधेयक आणून अतिशय चांगले असे काम शासनाने केले आहे. आता आपण हे अधिकार मा.सभापती आणि मा. अध्यक्षांना देत आहोत. माझ्या मनात फक्त एकच भीती आहे. सध्याचे आघाडीचे सरकार आहे. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षात अनेक गट आहेत. यामुळे मा. सभापती आणि मा. अध्यक्षांसमोर पेचप्रसंग निर्माण होईल. आरोग्य विज्ञान विद्यापीठात विधानसभेचे तीन आणि विधानपरिषदेचे दोन सदस्य पाठवावयाचे आहेत. आता यामुळे दोन्ही पक्षातील मतभेद उफाळून येण्याची शक्यता आहे. मा. सभापती आणि मा. अध्यक्ष यामुळे अडचणीत येऊ शकतील. त्यामुळे माझ्या मनातील ही भीती माननीय मंत्रिमहोदय कशी दूर करतील. या बाबतची प्रक्रीया कशी असेल, या बाबत जर माननीय मंत्रिमहोदयांनी प्रकाश टाकला तर बरे होईल. सभापती महोदय, मी पुन्हा एकदा या विधेयकाचे स्वागत करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, लोकशाहीच्या माध्यमातून विद्यापीठाच्या सिनेटवर निवड ही निवडणूकीच्या माध्यमातून केली जाते. निवडणूकीची तारीख जाहीर करुन नंतर निवडणूक घेऊन या सदनातील सदस्य त्या ठिकाणी आपण यापूर्वी पाठवित होतो. अर्थात पूर्वीची परिस्थिती वेगळी होती. पूर्वी एकाच पक्षाचे दोन तृतियांश सदस्य सभागृहात असायचे. त्यामुळे निवडणूकीच्या प्रक्रियेला तितकेसे महत्व नव्हते. सत्तारुढ पक्षाला वाटेल, त्याप्रमाणे एकतर्फी निवड होत होती. ती निवड फक्त सदनात जाहीर केली जात होती. गेले काही वर्ष निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला जातो. त्यासाठी तारीखही ठरविली जाते. अनेक वेळा तर निवडणूक पुढे ढकलली गेली आहे. गेले काही वर्षे वेळेवर निवडणूक होत नव्हती. त्याचा परिणाम गेले दोन वर्षे विधीमंडळाचा प्रतिनिधी विद्यापीठाच्या सिनेटवर जाऊ शकला नाही. यासाठी आता माननीय मंत्रिमहोदयांकडून नवीनच सूचना आली आहे. परंतु मला एका गोष्टीची साशंकता वाटते. या बाबतीत मला काही स्पष्टपणे बोलावयाचे आहे. आता आपण पीठासीन अधिकारी म्हणजेच मा. सभापती आणि मा. अध्यक्षांना हे अधिकार देणार आहोत. ते आता या बाबतच कोणती कार्यपध्दती स्वीकारणार आहेत ? या बाबतचे कोणतेही मार्गदर्शन माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला केलेले नाही. त्यामुळे यामध्ये काय होणार आहे ? सभागृहाचे नेते, विरोधी पक्षनेते तसेच सर्व गटनेते यांना विश्वासात घेऊन जर ही नांवे निश्चित झाली तर कोणत्याही प्रकारचा वितंडवाद होणार नाही. परंतु नको असलेल्या सदस्याचे नाव चुकून आले तर त्याचा दोष पीठासीन अधिका-यांकडे जाणार आहे. मा. सभापती आणि मा. अध्यक्ष दोषारोपापासून दूर राहावे, त्यांचे पद उंच राहावे, असे वाटत असले तरी ते शक्य कसे होणार आहे. यामुळे माझ्या मनात शंका आहे. मला एका गोष्टीबद्दल विशेष करुन उल्लेख करावयाचा आहे. लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर प्रथम मा. अध्यक्षांची निवड होते. त्यानंतर विरोधी पक्ष आणि सर्व पक्षाच्या नेत्यांना विश्वासात घेऊन उपाध्यक्षांचे पद विरोधी पक्षाला देण्यात येते.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आताच्या काळात दिसून येते की, खालच्या सदनामध्ये 1999 मध्ये मा. उपाध्यक्षांची निवडणूक घेतली तो एक राग मनात ठेवला गेला आणि सत्ताधारी पक्षाने अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या दोन्ही पदांबाबत आपला ठेका कायम ठेवला...

उपसभापती : मी तुमचाच आहे असे समजा...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी खालच्या सभागृहाचे उदाहरण देत आहे. सुरुवात तिथून झाली आहे, आपल्या सभागृहातून झाली नाही. म्हणून कोण आपला आणि कोण पराया हा प्रश्न यामध्ये येत नाही. लोकशाहीची ही एक उच्च परंपरा आहे, ती डावलून जर प्रत्येक गोष्ट घडायला लागली तर या संदर्भात उद्या असे काही होईल की काय? हा प्रश्न निर्माण होतो. आणि त्यावेळी आम्ही कुणाकडे दाद मागायची? असे धरुन चाला की, उच्च स्थानावर जी व्यक्ती बसली आहे, सत्ताधारी पक्ष म्हणून आज तुमच्याकडे मेजॉरिटी आहे. तुम्ही म्हणाल की,आम्ही सांगतो ती नावे तुम्ही जाहीर करा. नाहीतर You will be trouble असे म्हटल्या गेल्यानंतर ही परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे. आणि म्हणून आमच्या मनामध्ये आशंका आहे ती स्पष्टपणे मांडण्याची खूप आवश्यकता आहे. माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब तुमच्यासारख्या लोकशाहीवर विश्वास ठेवणारी माणसे त्या पक्षात असतांना या वर्षी उपसभापतींच्या निवडणुकीमध्ये असे घडायला नको होते. पण ते घडले आणि जे इथे घडले ते खालच्या सभागृहामध्ये सुध्दा घडले. विरोधी पक्षाला काही महत्वच द्यायचे नाही, अशा ज्या जागा आहेत त्या आपणच बळकावून बसायच्या. याचे कारण तुमच्याकडे आता दोन पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांना समाधान द्यायला पाहिजे. याकरिता एकाला अध्यक्ष तर दुसऱ्याला उपाध्यक्ष पद देऊन विरोधी पक्षाला फाटयावर मारायचे. कारण आम्ही एकत्र नांदलो तर सत्ता नांदेल. आम्ही जर एकत्र नांदलो नाही तर सत्ता नांदणे शक्य नाही. या विचाराने आपण निर्णय घेत आहात.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, फाटयावर मारणे हा संसदीय शब्द आहे कां?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, फाटयावर म्हणजे रेल्वेच्या फाटयावर...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मा. सदस्यांनी असंसदीय शब्द वापरला आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी संसदीय शब्द वापरला आहे. मी असंसदीय शब्द वापरीत नाही. to extend to the possible आणि जर तो शब्द वापरला गेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

तर व आपण माझ्या निदर्शनास आणून दिला तर तो मी परत घ्यायला तयार आहे. परंतु वस्तुस्थितीचे बरोबर चित्रण करायचे असेल, शब्दामध्ये बरोबर त्याची मांडणी करायची असेल तर तो शब्द मांडल्यानंतर त्याचा अर्थ कळेल असा शब्द वापरण्याची आवश्यकता निर्माण होते. त्याचा परिणाम असतो आणि भविष्य काळात कुणी आपल्याला फाटयावर तर मारणार नाही ना अशी भावना लोकांमध्ये येऊ नये यासाठी ते काळजी घेत असतात. म्हणून मी तो उल्लेख केला आहे. तेव्हा तो असंसदीय शब्द आहे असे मला वाटत नाही.

उपसभापती : "फाटयावर मारणे" हे शब्द मी कामकाजातून काढून टाकीत आहे....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, तो असंसदीय शब्द असेल तर सांगा. माझ्या मते हा शब्द असंसदीय नाही, मी हे जबाबदारीने बोलत आहे...

उपसभापती : पूर्वी असा उल्लेख झालेला नाही म्हणून मी निर्णय दिला आहे....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अशी भविष्य काळात साधार भिती वाटते म्हणून मी हे उदाहरण दिले. भविष्य काळात असे होऊ नये याची सत्ताधारी पक्षाने काळजी घ्यावी. आज तुम्ही सत्तेवर आहात भविष्य काळात आम्ही सत्तेवर आलो तरी आम्ही सुध्दा असे वागता कामा नये या दृष्टीकोनातून मनातील भिती या विधेयकाच्या निमिताने मी मांडली आहे. आपण मांडलेले विधेयक चांगले आहे. आमच्या माननीय सभापतींना व खालच्या सभागृहामध्ये माननीय अध्यक्षांना हे अधिकार देत आहात त्यामध्ये चुकीचे काही वाटत नाही. एकच काळजी घ्यावी की, पूर्वी साईबाबा संस्थानचे विधेयक आले त्यावेळी या सदनातील परिस्थिती आम्ही पाहिली आहे. तुम्हाला ते विधेयक पारीत करायचे नव्हते. परंतु कॉग्रेस पक्षाला ते पारीत करायचे होते. परंतु त्यावेळची सत्ताधारी पक्षाची सर्व वर्तणूक आम्ही पाहिली, त्यामुळे मनामध्ये संशय येतो. जो मनात संशय येतो तो या ठिकाणी व्यक्त करणे आवश्यक आहे. शेवटी साईबाबा संस्थान विधेयकाचे काय झाले हे आपण सर्वजण जाणता. उद्या सिनेट सदस्यांचा हा प्रश्न असल्यामुळे प्रत्येकाला वाटते की, नागपूर युनिव्हर्सिटी असो, मुंबई युनिव्हर्सिटी असो, मराठवाडा युनिव्हर्सिटी असो या सर्व विद्यापिठांवर आपले जबाबदार सदस्य त्या ठिकाणी जाऊन तेथील कामांना न्याय देऊ शकतील अशा लोकांना सिनेटवर पाठविण्याची काळाची गरज आहे. त्या ठिकाणी पुष्कळ गोंधळ निर्माण झाले आहेत त्याला मुंबई विद्यापीठ अपवाद नाही. हे गोंधळ ठीक करण्याच्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

लोकप्रतिनिधींनी जाणे खूप आवश्यक आहे. म्हणून निवड करतांना अशा कोणत्याही गोष्टींना वाव मिळणार नाही, योग्य निवड केली जाईल अशी अपेक्षा कोणताही पक्ष, मग तो सत्ताधारी किंवा विरोधी पक्ष असो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

विरोधी पक्ष असो, अन्य कोणताही पक्ष असो, आपल्या माणसाचा आग्रह धरत असताना, योग्य काय,न्याय काय आहे, तसेच कोणाला प्रतिनिधीत्व दिले तर ते योग्य ठरेल याचा विचार करुनच निवड करण्यात यावी अशी मी यानिमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो. तसेच आतापर्यंत पाठिमागे जे घडले, त्याची भविष्यामध्ये पुनरावृत्ती होणार नाही, असे काही घडणार नाही अशा प्रकारची शाश्वती आपल्याकडून या सदनाला मिळाली पाहिजे. आमचा कोणताही सत्ताधारी पक्ष याबाबतीत कोणावर दबाव आणणार नाही आणि दबावाचे राजकारण करुन प्रतिनिधींना विद्यापीठांवर पाठविले जाणार नाही असा आपण याठिकाणी विश्वास दिला तर मग आम्ही या विधेयकाचे स्वागत करु. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

. . . .2डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "केविलवाणापणा" असतो, फाटयाबिटयावर असे नको. सरकार किती केविलवाणे झालेले आहे याचे उदारहण म्हणजे हे विधेयक आहे. मी असे म्हटल्यावर माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. हे विधेयक कशासाठी आहे ? तर मघाशी त्यांनी असे सांगितले की, "महाराष्ट्र विधानसभा आणि महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेले महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य, हे नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य ग्रंथालय परिषद,पुणे येथील महात्मा फुले वस्तुसंग्रहालयाचे विश्वस्तमंडळ, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, 1983 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रत्येक विद्यापीठाची कार्यकारी परिषद, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 खाली स्थापन झालेल्या प्रत्येक विद्यापीठाची अधिसभा आणि आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जे नाशिकला स्थापन झालेले आहे, त्याची अधिसभा यावर सदस्य पाठविणे." हे बिल याठिकाणी का मांडले ? याबाबत बोलत असताना या संदर्भात पूर्वीची प्रथा काय होती ? तर पूर्वी या सदनातून सदस्य निवडून पाठविण्याची पध्दत होती, ती कशामुळे आली ? आणि आता ती आता बदलण्याची अवस्था का निर्माण झाली ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, गेली 3-3 वर्षे या संदर्भातील निवडणुक होऊ न शकल्यामुळे सन्माननीय सदस्यांना या समित्यांवर जाता आले नाही. त्यामुळे आम्ही हे बिल आणून यासंबंधीचा कायदा बदलत आहोत. मला एक गोष्ट कळत नाही की, जो अधिकार या सदनातील सदस्यांचा आहे, तो आपण हिरावून घेत आहात. आमच्या सदनात अशी परिस्थिती आहे की, येथे स्पष्ट असे पक्षीय सदस्य असले तरी तेवढयाच तोलामोलाने निवडून आलेले विपक्ष सदस्य सुध्दा आहेत. म्हणून या सदनातील सदस्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी अमुक-अमुक ठिकाणी जाणे असा यातील एक भाग होता. मी सुरुवातीला "केविलवाणा" असा शब्द एवढयासाठी वापरला की, माननीय संसदीय कार्यमंत्री माननीय सभापतींना आणि माननीय अध्यक्षांना भेटणार आणि सांगणार की, आमच्या नेत्यांची मारामारी अजून संपलेली नाही. त्यांच्यात एकमत झालेले नाही. त्यामुळे निवडणुका शुक्रवारी घेऊ. त्यानंतर शुक्रवारी जाहीर केलेल्या निवडणुका पुढे ढकलावयाच्या असतील तर पुन्हा माननीय सभापतींना सांगावे लागते की, ही निवडणूक आणखी एक आठवडा पुढे ढकलावी लागणार आहे आणि मग जन गण मन, जय हिंद, जय महाराष्ट्र असे म्हणण्यापूर्वी मग माननीय सभापती सांगतात की, आता पुढच्या अधिवेशनात घेऊ. असे होण्यामागचे महत्वाचे कारण

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

म्हणजे सक्षम नेतृत्वाचा अभाव. आपापल्या गटाचे सक्षम नेतृत्व असेल आणि एकदा त्यांनी सांगितले की, पक्षाकडून हे नॉमिनेशन नक्की झालेले आहे. पण तुमच्या पक्षातील एकेक माणसाच्या हेकखोरपणामुळे, हट्टीपणामुळे, विरोधी पक्षाच्या नाही. मी याठिकाणी अधिकृतपणे सांगतो की, या विरोधी पक्षाकडून या निवडणुकांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अडवणुकीचे धोरण करण्यात आलेले नाही.परंतु आपल्या पक्षामध्ये म्हणजे काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षातर्फे कोणत्या समित्यांवर कोणी जावयाचे याबाबतीत एकेक, दोन-दोन सदस्यांकरता प्रतिष्ठेच्या मारामा-या झाल्या, त्यामुळे तुम्ही 3-3 वर्षे या सदस्यांना सदर समित्यांवर जाऊन काम करण्यापासून वंचित केले आहे. नंतर असे लक्षात आले की, आता असलेल्या सदनाच्या नेतृत्वाला या संदर्भातील तिढा सोडवता येत नाही, आपल्या सदस्यांना गप्प बसविता येत नाही आणि त्यांनी विविध माध्यमातून आणलेल्या दबावाबाबत आपल्याला काही करता येत नाही अशी अगतिकता निर्माण झाल्यामुळे, त्यातून मार्ग काढण्यासाठी आपण हे विधेयक आणून आता आपल्या गळयातील घोंगडे, माननीय सभापतींच्या गळयात अडकवून मोकळे झाले आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे चालू...

तरीही मारामारी सुटणार आहे, अशातला भाग नाही. शेवटी पक्षाकडूनच नावे जाणार आहेत. जी पध्दत निवडणुकीच्या नॉमिनेशनकरिता होती, या सदनामध्ये ती प्रथा चांगली होती. या विविध मंडळावर आणि न्यासावर जाण्यासाठी जरी आपण अर्ज भरत होतो तरी देखील सगळे गटनेते एकत्र सभापती महोदयांच्या दालनात यायचे आणि बिन विरोध निवडणूक होईल, याबाबतची तजवीज करून बिन विरोध निवडणूक व्हायची. या समित्यांकरिता या सदनामध्ये काही मतदान झाले नाही. परंतु निवडून देण्याचा अधिकार हा सदस्यांचा आहे, तो आपण हिरावून घेत आहात, हे तुमच्या कसे लक्षात आले नाही ? खालच्या सदनामधून निवडून आलेले जे सदस्य आहेत, त्यांचा हा अधिकार काढून घेत असतांना ...केवळ आपल्या अगतिकतेमुळे तो काढून घेतला. आता परत सभापतींकडे डोकेदुखी होणार. कालपर्यन्त त्यांना एवढी मुभा होती की, संसदीय कार्य मंत्र्यांनी येऊन सांगितले की, अजून काही जमले नाही, असे सांगितल्यानंतर पुढे ढकलण्याचे तेवढेच जाहीर व्हायचे. या सगळ्या पध्दतीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांसारख्या सदस्यांना अमरावती सारख्या विद्यापीठावर जायचे म्हटले तर तुमच्या-आमच्या मेहरबानीची गरज लागत नसे. ते नॉमिनेशन भरायचे, भले निवडणूक झाली तर निवडून येतील की नाही हा नंतरचा भाग, पण आज बी.टी.भाऊंसारख्या एखाद्या त्या क्षेत्रातील विद्वत्ताप्रचुर अशा व्यक्तीमत्वाला त्या विद्यापीठावर जायचे की नाही, याबाबतचे एकमत आपल्याला म्हणजे विविध पक्षांच्या मंडळींना करावे लागणार आहे. मग आम्ही एका जागेचा त्याग करायचा काय ? एवढ्या मारामाऱ्यामध्ये सन्माननीय सदस्य बी.टी.भाऊंच्या विद्वत्तेचा, त्यांच्या अनुभवाचा, त्याचा विद्यापीठाला असलेल्या गरजेचा कोण विचार करते ? आता तर प्रश्नही येत नाही. कारण आपली विद्यापीठे पावसाळ्यातील छत्रीसारखीच उगवतात. कोई भी आव, कोई भी सर्टिफिकेट ले के जाव. पुन्हा आपण परदेशातील विद्यापीठे येथे आणणार आहात. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेब बोलतील.

श्री.आर.आर.पाटील (बसून) : आपली विद्यापीठे परदेशामध्ये जायला लागलेली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय उपमुख्य मंत्री महोदय, आपले तर कौतुकच करायला पाहिजे. जे आपण मनावर घेता, ते प्रसिध्द होते. आजपर्यन्त सर्वसाधरण लोकांना डान्सबार हे काय आहे हे माहीत नव्हते. परंतु आता छोट्या-छोट्या मुले आपल्या वडिलांना विचारातात की, बाबा, डान्सबार काय भानगड आहे ? आबांनी एकदा हातामध्ये विषय घेतला की..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (बसून) : पेपरमध्ये छापून येते.

श्री.दिवाकर रावते : पेपरमधून बातमी येऊ दे. परंतु त्याची अशी पसिध्दी होते की, आबा जे जे चांगले करायला जातात, त्यांच्या प्रसिध्दीमुळे, ज्यांना प्रसिध्दी व्हावी असे वाटते, ते दुखवले जातात आणि ते नंतर त्यांच्या मागे लागतात. नाईलाजाने शिवसेना प्रमुखांनाही म्हणावे लागते की, तुम्ही चांगले काम करता, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. आमचा विरोध असला तरी आम्हाला... आमच्याकडे पध्दत आहे. बघा, तुम्ही कसे बोलला. आम्ही सेनाप्रमुखांच्या आदेशाची बांधिलकी स्वीकारणारी माणसे आहोत, या सभागृहातून सदस्य पाठविण्याची बांधिलकी स्वीकारण्याची आपल्यामध्ये धमक नाही, अशाप्रकारचे हे विधयक आहे. मी हे सगळे जाणिवेने बोललो, आपल्याला ती गंमत वाटली. ती गंमत नव्हती. या सभागृहामध्ये आपल्या या सदनाचे नेते आर आर. पाटील यांना तुमच्या बाजूने तरी नियुक्त केलेले आहे. विरोधी पक्षात आहोत, म्हणून आम्ही आमच्या नेत्याचे ऐकतो. तिकडे ऐकले जाते काय, याचा सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम आपण विचार करा. आपण त्या दिवशी होता, ते एकटे सापडले होते. त्यावेळेला कापसाच्याप्रश्नावर आर.आर. पाटील एकटे सापडले होते. आम्ही बसून सगळे पहात होतो. त्यांचा अभिमन्यू करून टाकला होता, कोंडीत सापडून कसा खातमा करायचा...त्यांचे नशीब सिकंदर. कापसाचे पैसे देण्याच्याबाबतीत त्यांचा प्रामाणिकपणा होता, म्हणून ते बचावून बाहेर पडले. त्यांची कोंडी कापसाने झाली होती तर यांना डान्सबारच दिसतो आहे. नवीन मुंबईत सन्माननीय श्री. पतंगराव, हे सगळे तुमच्याच आजूबाजूला कसे डान्सबार निघाले ? नवी मुंबईत पहिला घाला तिकडे घालावा लागला, तुम्ही कसे विद्यार्थी जमा केलेले आहेत ?

यानंतर कु.थोरात.....

अशुध्दीत प्रत / अशुध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही जी अगतिकता निर्माण झाली आहे, त्यातून हे बिल आले आहे. आणखीन एक बाब मी या सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. आता निवडणुका झालेल्या आहेत. हे बिल मंजूर झाल्या नंतर निवडणुका होणार नाहीत. हे वरचे सभागृह आहे. या सभागृहात कुठलाही सदस्य जातीच्या तत्वावर निवडून येत नाही. आरक्षणाच्या तत्वावर निवडून येत नाही. या सदनामध्ये येणा-या सदस्यासाठी आरक्षण निर्माण करण्याचे काय कारण आहे? कशासाठी हे केले? खालच्या सदनामध्ये ते बरोबर आहे. खालच्या सदनामध्ये आरक्षित जागेवरुन आमदार निवडून येत असतात. म्हणून त्यांना या साठमारीमध्ये संधी म्हणून खालच्या सभागृहात आरक्षण असणे योग्यच होते. वरच्या सभागृहात हे आणण्याची काय गरज होती? या सदनाचा तो अवमान आहे. या सदनाला सेक्युलर परंपरा आहे. कोण कुठल्या जाती-पातीचा नाही, तो वरच्या सदनाच्या सदस्यत्वाचा जो काही ढाचा ठरलेला आहे त्या पध्दतीने तो येथे आलेला आहे. हे आरक्षण खालच्या सदनासाठी आहे, कारण तेथे आमदार तशा पध्दतीने निवडून येतात. हया नियुक्त्यांमध्ये काही महत्वाचे भाग असतात. मराठवाडा कृषि विद्यापीठ असेल, पंजाबराव कृषि विद्यापीठ असेल, मुंबई विद्यापीठ असेल. मुंबई विद्यापीठावर नागपूरच्या व्यक्तिला नेमले तर त्याचा काय उपयोग आहे? प्रा. बी.टी.भाऊंना सांगितले की, तुम्ही मुंबई विद्यापीठावर जा. तर ते म्हणतील मला काही देणे-घेणे नाही. मी अमरावतीमध्ये निश्चित स्वरुपामध्ये त्या विद्यार्थ्यांकरिता, विद्यापीठाच्या कायद्यामध्ये आणि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये निश्चितपणाने बदलण्याची क्षमता राखतो, मी तेथे गेलो तर माझा उपयोग आहे. मग याला काय अर्थ राहिला? त्या त्या भागामध्ये राहणारे किंवा त्या त्या भागात काम करणारे किंव क्षेत्रामध्ये काम करणारे जे सदस्य आहेत ते त्या त्या भागात निवडून गेले पाहिजेत. पुन्हा ही साठमारी होणार आणि हा ताप निर्माण होणार. आणि मग काही ठिकाणी आपल्या सवईप्रमाणे आपल्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे आपणही मग थोडीशी मध्यस्थी करणार. पण ती सरकार बरोबर नाही करणार. सदस्यांना बोलावणार, थोडेसे समजावणार. सभापती महोदय, तीन-तीन वर्षे लोकांना वंचित ठेवून आपली जी आगतिकता निर्माण झालेली आहे. हा कायदा करण्यामागे या सदनामध्ये, खालच्या सदनामध्ये नेतृत्व करणा-या सत्तारुढ पक्षाचे नेतृत्व करणा-या नेत्यांचे हे अपयश म्हणजे हे बिल आहे. आणि म्हणून तुमची आपल्या सदस्यांवरची पकड आता ढिली झाली आहे, त्याचा हा पुरावा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. म्हणून हा पुरवा आपण येथे आणल्या बद्दल आपल्याला धन्यवाद देतो. आणि आपली अशीच वारंवार पकड ढिली होईल त्यावेळेला तुम्हाला अशाच प्रकारची मुक्ताफळे ऐकावी लागतील. मी मघाशी म्हणालो काय केले ते येथे बोलत नाही. आपण हे सोडवलेले झेंगट आहे, ते अशा प्रमाणे सोडवलेले आहे. धन्यवाद.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हया बिलातील मुख्यत्वेकरुन तीन बाबीं विषयी बोलणार आहे. प्रकरण 3- महाराष्ट्र माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, प्रकरण -6 महाराष्ट्र कृषि विद्यापीठ. आणि प्रकरण-7 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994. त्याचबरोबर प्रकरण -8. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ. सभापती महोदय, मराठवाडयात तीन महत्वाची विद्यापीठे आहेत. डॉ. बबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,सभंजीनगर. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड. आणि परभणीचे कृषि विद्यापीठ. आजच्या तारखेला दोन्ही विद्यापीठामध्ये कुलगुरु नाहीत आणि विभागीय आयुक्त श्री. भोगे यांच्याकडे त्याचा चार्ज आहे. दुसरी एक अत्यंत शरमेची गोष्ट मला सांगावयाची आहे. कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुंना रजेवर पाठविलेले आहे.या बिलाच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, कृषि विद्यापीठाच्या बाबतीत सभापतींना जे अधिकार दिलेले आहेत त्याप्रमाणे मॅनेजमेंट कौन्सिलर आप□ आमदार नेमतो. पण बाकीच्या दोन्ही विद्यापीठामध्ये आपण अधिसभेवर आमदारांची नेमणूक करतो.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

मला प्रामुख्याने एक मुद्दा सांगावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्यासंदर्भात तो मुद्दा सांगितला. आम्ही पदवीधर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्यानंतर तसेच शिक्षक मतदारसंघातून शिक्षक मतदारांचे प्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर या शैक्षणिक संस्थांची जी मंडळे आहेत, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे असतील किंवा विद्यापीठे असतील त्या ठिकाणी लोकप्रतिनिधींनी काही देखरेख करावी, त्या ठिकाणी काही अंकुश ठेवावा आणि त्या ठिकाणी काही सहकार्य करावे, मदत करावी याऐवजी त्या ठिकाणी शक्य तितका गोंधळ वाढावा असे सरकारचे धोरण आहे. त्यामध्ये बदल करावा अशी माझी सूचना आहे. खरे म्हणजे या विद्यापीठांच्या व्यवस्थापन समितीवर डायरेक्ट आमदाराची नेमणूक केली पाहिजे. आपण लोकशाहीला मानणारे आहोत. त्या त्या क्षेत्रातील जो शिक्षक आमदार आहे तो तेथील उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या व्यवस्थापन समितीचा, एक्झिक्युटीव्ह कौन्सीलचा कायमस्वरुपी सदस्य असला पाहिजे आणि त्याचप्रमाणे पदवीधर मतदारसंघातून जो सदस्य निवडून आलेला आहे तो त्या पदवीधर क्षेत्रात येणाऱ्या विद्यापीठांच्या मॅनेजमेंट कौन्सीलचा कायमस्वरुपी सदस्य असला पाहिजे. हजारो पदवीधरांनी मतदार करुन निवडून द्यावयाचे, शेकडो शाळा कॉलेजचे प्रश्न आम्ही मांडावयाचे आणि त्या विद्यापीठामध्ये गेल्यानंतर तेथील कुलगुरु नावाच्या व्यक्तीला उलट बोलता येत नाही. उच्च शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणामध्ये कशा पध्दतीची हेळसांड चालू आहे हे सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम तसेच श्री. वसंत पुरके साहेबांना माहीत आहे. त्या ठिकाणी छोटे छोटे प्रश्न आहेत अशा वेळी ते प्रश्न मांडावयाचे असतील तर त्या ठिकाणी अक्षरश: भिंतीला बोलल्यासारखी परिस्थिती होते. सभापती महोदय, जिल्हा परिषद शाळा उदगीर येथे गेल्या 52 वर्षापासून एस.एस.सी. बोर्डाचे परीक्षा केंद्र आहे. त्या ठिकाणी परीक्षा होतात. यावेळी लातूरच्या बोर्डामध्ये पैसे खाऊ घालून, भ्रष्टाचार करुन उदगीरच्या मध्यवर्ती असलेल्या जिल्हापरिषद शाळेतीले बोर्ड काढून कॉपी करण्यास परवानगी मिळावी म्हणून ते बोर्ड कोपऱ्यामध्ये टाकण्यात आले. मी तेथील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

पदवीधरांचा आमदार आहे. मी म्हटले की, मी फोन करतो. ते म्हणाले की, तुम्हाला अधिकार नाही, आम्ही स्वायत्त आहोत.....

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी बिलावर बोलावे. हे नेमणुकीच्या संदर्भातील विधेयक आहे. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, नेमणुकीचे अधिकार आपल्याला देत आहेत. त्याचबरोबर त्यामध्ये बदल करुन एक्झिक्युटीव्ह कौन्सीलवर आम्हाला नेमण्याचा अधिकार द्यावा अशा प्रकारचा बदल करण्याबाबत मी सांगत आहे. यामध्ये खंड 3 मध्ये असे म्हटले आहे की, " (क) "वर्ग ब - निवडून दिलेले सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (दोन) आणि (तीन) वगळण्यात येतील. (ख) "वर्ग क - नामनिर्देशित सदस्य" या शीर्षकाखालील परिच्छेद (एक) नंतर पुढील परिच्छेद समाविष्ट करण्यात येतील :- "(एक-अ) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले महाराष्ट्र विधानसभेचे दोन सदस्य. (एक-ब) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींनी नामनिर्देशित केलेला महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य." हे एवढेच तुम्ही ठेवले आणि त्या त्या बोर्डावर कोणताच अंकुश राहणार नसेल तर त्या बोर्डाचा कारभार कोण सुधारणार ? हा सगळा गोंधळ तुम्हाला चालू द्यावयाचा आहे काय ? आम्ही निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्या विद्यापीठातील, शिक्षण मंडळातील गोंधळ थांबविणार नसेल आणि त्या पध्दतीने पुनर्रचना करणार नसाल तर मला असे वाटते की, या गोंधळाला आपण सर्वजण कारणीभूत आहोत. अशा पध्दतीची मानसिकता होत आहे. दुर्दैवाने विद्यापीठातील गोंधळ आपल्यापैकी काही लोकांना माहीत नसेल. माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील आता या ठिकाणी उपस्थित नाहीत तसेच माननीय राज्यमंत्री सुध्दा उपस्थित आहेत की नाहीत हे माहीत नाही. हे विधेयक मांडणारे मंत्रीच या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यामुळे आम्ही कोणाशी बोलत आहोत हे आम्हाला समजत नाही. विद्यापीठात गेले की भिंतीशी बोला, विधिमंडळात आले की भिंतीशी बोला अशी परिस्थिती आहे. आमच्या संवेदना कोणी समजून घेणार आहे की नाही ? माझे असे स्पष्ट मत आहे की, हे विधेयक परत घ्यावे. सगळया मंडळाच्या एक्झिक्युटीव्ह कौन्सीलवर, मॅनेजमेंट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ...

कौन्सीलवर लोकप्रतिनिधी असले पाहिजेत. विशेषत: शिक्षक आमदार व पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेले आमदार हे पध्दसिंध्दपणे त्या त्या मंडळांवर कायमस्वरुपी नेमले गेले पाहिजेत. त्यामध्ये कोणत्याही पध्दतीची तडजोड करणे चुकीचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

उपसभापती : आपल्याकडे अधिकार आलेले आहेत ते आपल्याकडे राहू द्यावेत. सन्माननीय सदस्यांनी ही बाब समजून घ्यावी.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापुरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 52 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकामध्ये "निवडून दिलेले सदस्य" याच्या ऐवजी "नामनिर्देशित सदस्य" अशा प्रकारचा बदल केलेला आहे. हा बदलच मुळाच लोकशाही पध्दतीच्या आणि संकेताच्या विरोधी आहे. कारण शासनामधील, प्रशासनामधील एकूण निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीतील आत्मा आहे. या विद्यापीठांच्या किंवा राज्य शिक्षण मंडळांच्या ठिकाणी जी माणसे नेमावयाची होती ती नेमलेली नाहीत याला खरे कारण वेगळे आहे. ती माणसे कोणत्या कारणांसाठी नेमता आली नाहीत ? ती कारणे कदाचित पक्षीय स्वरुपाची असतील किंवा इतर काही अडचणी असतील. यामध्ये इतर अडचणी असतील असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापूरे.....

तेथील वाटणी कोणाला जास्त आणि कोणाला कमी यामुळे ही वाटणी 3 वर्षे होऊ शकली नाही. वास्तविक ही पदे सत्तेची आणि लाभाची आहेत असेही नाही. परंतु विद्यापीठावर मा.सदस्य श्री.श्रीकांत जोशीसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे योग्य माणूस योग्य समितीवर जावा यासाठी प्रयत्नशील असल्याची तरतूद यामध्ये दिसत नाही. निवडणुकीच्या प्रक्रियेला या पध्दतीने मारणे आणि निर्देशित करणे असे बिल आपल्या लोकशाही प्रक्रियेमध्ये तरी येऊ नये. निदान कमीत कमी अशा लोकशाही मार्गाने स्थापन झालेल्या सभागृहामध्ये ते मंजूर होऊ नये अशी माझी इच्छा आहे. शेवटी सभापती आणि अध्यक्ष महोदय यांना हे अधिकार दिले आहेत. परंतु त्यांच्या माध्यमातून निवड करीत असताना निकष काय लावले जाणार आहेत ? शेवटी शासनच त्यांना मदत करणार आहे आणि येथून पुढे युतीची सरकारे येतील, एकाच पक्षाचे सरकार येण्याची शक्यता कमी आहे. ही पदे गुणवत्तेपक्षा सोयीच्या वाटपानुसार वाटली जाणार आहेत अशी शक्यता जास्त आहे. त्यामुळे अत्यंत पात्र असलेल्या माणसाला येथे संधी न मिळता आपल्या सोयीच्या माणसाला बसविण्यासाठी या विधेयकाचा उपयोग होईल असे मला वाटते. विशेषत: ही ॲकॅडेमिक पदे आहेत. त्या त्या क्षेत्रातील लोकांच्या अनुभवाचा उपयोग व्हावा अशी माणसे तेथे जातील असा भरवसा वाटत नाही. परंतु आज सरकारमध्ये असलेल्या लोकांची भावना जरी चांगली असली तरी पण भविष्य काळामध्ये याच पध्दतीचे लोक शासनामध्ये असतील याची हमी देऊ शकत नाही. त्यामुळे या तरतुदीचा उपयोग भविष्यात आपल्याच लोकांना घ्यावे, पात्र नसलेल्या लोकांना सोयीसाठी बसविण्यासाठी याचा उपयोग होण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे ही पदे 3 वर्षे का भरली नाहीत याचे कारणच कळलेले नाही. कारण ही पदे लाभाची नाहीत, भत्ता मिळत नाही, केवळ सिनेटच्या सभांना हजर रहावयाचे असते. वर्षातून 2 वेळा सिनेट सदस्य म्हणून हजर रहावयाचे असते. एकूण 3 तास सभा चालते. एखादा प्रश्न विचारण्याची संधी मिळते नाही तर तीही मिळत नाही. विद्यापीठामध्येही त्याला फारसे मानत नाहीत. तरी सुध्दा 3 वर्षे होऊ शकले नाही. आता किरकोळ गोष्टीही राजकीय पक्षातील लोकांनी सोडावयाच्या नाहीत असे ठरविले आहे काय ? त्यामुळे आज परिस्थिती अशी आहे की, शासनाला आपले मत विद्यापीठामध्ये किंवा राज्य

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंडळामध्ये व्यक्त व्हावे व त्याच्या बुध्दीचा वा अनुभवाचा लाभ व्हावा असे वाटते ते होत नाही त्यामुळे विद्यापीठ एका बाजूला चालले आहे, विद्यापीठाचा कारभार एका बाजूला चालला आहे आणि शासन दुस-या बाजूला चालले आहे. आज दोन्ही दोन विरुध्द दिशेने चालले आहेत. दोघांमध्ये संघर्ष आहे. विद्यापीठात येथून पुढे दोन्ही सभागृहाचे योग्य प्रतिनिधीत्व झाले तर येथील मत तेथे मत मांडता येईल. विद्यापीठ चुकीचा निर्णय घेतात, कित्येक वेळा असे होते की, आपण महाविद्यालयांना मान्यता देता, परंतु विद्यापीठ संलग्नता देत नाही. अशा ब-याच गोष्टी होऊन जातात. त्यात मी शिरणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, विधिमंडळ सदस्यांचा आपला प्रतिनिधी निवडून देण्याचा जो मुलभूत अधिकार आहे, त्याच्यावर गदा आणण्याचा प्रकार होत आहे. माझा प्रतिनिधी निवडून देण्याचा माझा मुलभूत अधिकार आहे तो काढून घेतल्यामुळे एक प्रकारे माझ्या हक्कांचा संकोच होत आहे असे मला वाटते. अशाप्रकारच्या इतक्या शंका व्यक्त करुन सुध्दा या क्षणी विरोध करता येणे शक्य नाही असे माझे विचार व्यक्त करुन मी या विधेयकाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 52 वर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, श्री.मधुकर सरपोतदार, श्री.दिवाकर रावते, श्री.श्रीकांत जोशी आणि श्री.जी.एल.ऐनापूरे यांनी विधेयकातील दुरुस्तीच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या सर्वांच्या भाषणातून मला जाणवले की, ती गठित करण्यासाठी किंवा यांच्या निवडणूका व्हावयास पाहिजे होत्या त्या का झाल्या नाहीत ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील....)

मला असे वाटते की, या संदर्भामध्ये आपण अनेक वेळा प्रयत्न करुन सुध्दा दुर्देवाने एकमत होऊ शकले नाही. दुस-या बाजूला मा.सदस्य अशीही चर्चा करायचे की तीन-तीन वर्षे होऊन सुध्दा विद्यापीठाच्या सिनेटवर आपला प्रतिनिधी जात नाही. विद्यापीठाच्या कारभारावर अंकुष ठेवण्याकरिता किंवा विद्यापीठाच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेत असताना, सिनेटमध्ये चर्चा होत असताना आपला प्रतिनिधी तेथे असणे गरजेचे आहे. सिनेटची बैठक वर्षातून दोन वेळा होते की चार वेळा होते हे त्या त्या कार्यकारीणीवर अवलंबून असते.परंतु वर्षातून दोन वेळा तरी सिनेटची बैठक व्हावयास पाहिजे. पॉलिसी मॅटरबाबतचा निर्णय हा सिनेटच्या माध्यमातून घेतला जातो आणि ती प्रथा आहे. दुर्दैवाने दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या नेमणुका निवडणुकीच्या माध्यमातून होऊ शकल्या नाहीत. म्हणून संसदीय कार्यमंत्री या नात्याने माझ्याकडे जबाबदारी आल्यानंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात एकवाक्यता घडवून आणून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा मी प्रयत्न केला. त्यावेळी मला ज्या ज्या काही अडचणी आल्या त्या सर्वच अडचणी मी या सदनामध्ये मांडू शकत नाही. परंतु मुदतीमध्ये अशा प्रकारच्या निवडणुका होत नसतील आणि त्याबाबतीत एकवाक्यता होत नसेल आणि तो कालावधी वाढत जात असेल तर ते योग्य नाही. मुळातच तीन-पाच वर्षाची टर्म असताना सदस्यांच्या नेमणुका न होता तीन-तीन वर्षाचा कालावधी असाच जाणार असेल तर तेही योग्य नाही. यासंदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली. मी या विषयी गट नेत्यांच्या बैठकीमध्येही चर्चा केली, विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या नेत्यांशी आणि विरोधी पक्षनेत्यांशी सुध्दा चर्चा केली. सर्वांशी विचारविनिमय करुन हे दुरुस्ती विधेयक याठिकाणी आणलेले आहे. या विधेयकामध्ये कोणती दुरुस्ती आपण आणीत आहोत ? तर नामनिर्देशन पध्दतीने निवड करण्याचे अधिकार हे सभापती महोदय, आपणाला दिलेले आहेत. त्यामुळे आपण जो निर्णय द्याल तो या सभागृहाला मान्य असेल. सभापती महोदय, या विधिमंडळाच्या विविध समित्या गठित करीत असताना पक्षाच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात त्या त्या समित्यांवर सदस्यांच्या नेमणुका करण्याचे अधिकार दोन्ही सर्वोच्च सभागृहाचे मा.अध्यक्ष आणि मा.सभापती, यांना आहेत. त्याप्रमाणे सिनेटवर देखील सदस्यांना नामनिर्देशित करण्याचे अधिकार, सभापती महोदय आपणाला दिलेले आहेत. सभापती महोदय, आपणावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील....)

आमचा पूर्ण विश्वास आहे. तुम्ही यासंदर्भात योग्य पध्दतीने न्याय देऊ शकता. आपल्या माध्यमातून योग्य व्यक्तिचीच निवड केली जाईल. हे दुरुस्ती विधेयक मांडत असताना दोन्ही सभागृहांच्या नेत्यांची, विरोधी पक्षनेत्यांची आणि गटनेत्यांची देखील यासंदर्भात आपणाला सहकार्य जबाबदारी आहे आणि त्यादृष्टीकोनातूनही हे दुरुस्ती विधेयक याठिकाणी आणलेले आहे. या ठिकाणी काही मा.सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या सिनेटवर गेलेल्या प्रतिनिधीला काय अधिकार राहाणार आहेत? काही कृषी विद्यापीठे आहेत तर काही आरोग्य विद्यापीठे आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या संदर्भात याआधीच अशा प्रकारे आपला प्रतिनिधी पाठविण्याची तरतूद केलेली आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठावर नामनिर्देशनाने प्रतिनिधी पाठविला जातो. तीच पध्दत उर्वरित सर्व विद्यापीठांच्याबाबतीत अवलंबिण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. संख्याबळ न पाहता जे अनुभवी सदस्य आहेत, ज्यांना खरोखरच त्या क्षेत्रामध्ये काम करण्याची आवड आहे, विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी ज्यांची तळमळ आहे अशा दोन्ही सदनातील मा.सदस्यांना आपण सिनेटवर पाठवीत आहोत. मा.सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी या ठिकाणी कौन्सिलचा उल्लेख केला. प्रत्येक विद्यापीठाचे वेगवेगळे ॲक्ट आहेत. कुलगुरुंची नेमणूक झालेली नाही असेही मा.सदस्यांनी सांगितले. परंतु तो विषय याच्याशी संबंधित नाही. या विधेयकाच्या संदर्भात जी एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती मी या सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचे माझे कर्तव्य समजतो. अधिवेशन चालू असताना सिनेटच्या बैठकासंबंधीचा विद्यापीठाचा अजेंडा निघतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

आणि मग सन्माननीय सदस्यांनी अडचण येते की, विधिमंडळाच्या अधिवेशनास जाऊ की सिनेटच्या बैठकीस जाऊ अशी सदस्यांसमोर अडचण निर्माण होते. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या दिवशी अधिवेशनाचा कामाचा दिवस असेल त्या दिवशी सिनेटच्या बैठका घेण्यात येणार नाही. जर अधिवेशन काळात जास्त गरज असेल तर अधिवेशनाच्या कालावधीत सुटीच्या दिवशी सिनेटच्या बैठका घेण्यात याव्यात अशा प्रकारच्या सूचना राज्यातील सर्व विद्यापीठांना देण्यांत येतील. अधिवेशन सुरु असताना सिनेटच्या बैठका घेतल्या जातात त्यावेळी या सभागृहातील सदस्यांना त्या बैठकीस उपस्थित रहाता येत नाही. या बैठका अधिवेशनाच्या कामकाजाच्या दिवशी घेतल्या जाणार नाहीत याची निश्चितपणे खबरदारी घेण्यात येईल. सभापती महोदय,यासंबंधीचा निर्णय घेताना आपल्याला काहीही अडचण येणार नाही. आपला निर्णय हा सभागृहात सर्वश्रेष्ठ मानला जातो. या विधेयकामुळे सिनेटच्या समितीवर अशा पध्दतीने तात्काळ सदस्य आपल्याला नेमता येतील. सभापती महोदय, या ठिकाणी दुरुस्तीचे विधेयक मांडण्यात आलेले आहे ते एकमताने मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या विधेयकाच्या अनुषंगाने खुलासा केला. तो खुलासा करीत असताना ते म्हणाले की, गेल्या दोन,तीन वर्षात ज्या काही अडचणी आल्या त्या मी येथे सांगू इच्छित नाही. आपण येथे सांगू इच्छित नाही ही आपली अगतिकता आहे की आपली काही सांगण्याची इच्छा नाही वा काही गोष्टी सांगू नये असा कोणी सल्ला दिलेला आहे. या तिन्ही गोष्टींचा सन्माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभागृहापुढील कामकाज करणे ही शासनाची संयुक्तिक जबाबदारी असते असे मी मघाशी सांगितले. पूर्वीच्या कालावधीत डॉ. पतंगराव कदम हे संसदीय कार्य मंत्री होते. गेल्या सहा महिन्यापासून संसदीय कार्य मंत्री म्हणून मी काम पहात आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डॉ.पतंगराव कदम हे संसदीय कार्य मंत्री होते त्यांनी बिचा-या विरोधी पक्ष नेत्यास वा विरोधी पक्षाच्या सदस्यांना साधा चहा सुध्दा पाजला नाही. संसदीय कार्य मंत्री असताना ते समितीसाठी आमच्याकडून सदस्यांची नावे घेऊन जावयाचे. राष्ट्रवादी पक्षाचे सदस्य ठरत नव्हते. सभापती महोदय, डॉ. पतंगराव कदम हे संसदीय कार्य मंत्री होते त्यावेळी त्यांना आम्ही वेळावेळी मदत केलेली आहे. परंतु त्यांच्याकडून आम्हाला कोणतीही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

भरपाई मिळालेली नाही. सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर लागलीच त्यांनी सभागृहातील सर्व सदस्यांना जेवण द्यावे अशा प्रकारची शिक्षा आपण त्यांना द्यावी व तसे आपण त्यांना निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी संसदीय कार्यमंत्री असताना सर्वांना विश्वासात घेऊन काम केलेले आहे. त्या गोष्टीचा आणि जेवणाचा काही संबंध येत नाही. सन्माननीय सदस्यांनी एक वेळा जेवणाची मागणी केली आहे मी सर्व सदस्यांना दोन वेळा जेवण देण्यास तयार आहे.

उपसभापती : याउपर तुम्ही केलेली सूचना कोड ऑफ कंडक्टमध्ये टाकून देऊ.

श्री. हर्षवर्धन पाटील : सदर दुरुस्तीचे विधेयक सभागृहाने एकमताने मंजूर करावे अशी मी पुन्हा विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हर्षवर्धन पाटील :महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 52 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती :सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 52 संमत झाले आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आज अधिवेशन समाप्त होत आहे. परंतु औचित्याच्या माध्यमातून एका अतिशय महत्वाच्या विषयाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. राज्यामध्ये जिल्हा सहकारी बँक,अर्बन बँक,भूविकास बँक यांच्यामार्फत शेतक-यांना कर्ज दिले जाते. 10 रुपये कर्ज घेतले तर 10 रुपये व्याज वसूल केले जाते. पैसे वसूल करण्यासाठी मालमत्ता जप्त केली जाते. राष्ट्रीयीकृत बँका 10 रुपयांचे कर्ज 4 रुपयांमध्ये सेटलमेंट करतात. शेतक-यांच्या बाबतीत 40 रुपये वसूल केले जातात. 550 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. ज्याप्रमाणे राष्ट्रीयीकृत बँका वन टाईम सेटलमेंट करतात त्याप्रमाणेच जिल्हा सहकारी बँक,राज्य सहकारी बँक,अर्बन बँक आणि भूविकास बँक या चारही बँकांच्या बाबतीत वन टाईम सेटलमेंट ची कार्यवाही करण्याबाबत सह निबंधक किंवा सहकार खात्याला सूचना द्या. गरीब लोकांना सावकाराच्या कर्जातून मुक्त करा. याबाबत सहकारमंत्र्यांनी निवेदन करावे. आज मर्सीडीज कार घेण्यासाठी साडेसात टक्के दराने कर्ज मिळते आणि शेतक-याला ट्रॅक्टर घ्यावयाचा असेल तर 12-13 टक्के व्याज द्यावे लागते. नाबार्डकडून 6.50 टक्के दराने घेऊन जिल्हा बँकेला 11 टक्के दराने देतात आणि सोसायटीकडून 14 टक्के दराने कर्ज घ्यावे लागते. शेतक-यांचे हे शोषण थांबविले पाहिजे. कर्जाची वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी केंद्र शासनाने नाबार्डला डायरेक्शन दिल्या त्याप्रमाणे राज्यानेही बँकांना अशा सूचना द्याव्यात. वन टाईम सेटलमेंट करण्याचा क्रांतिकारी निर्णय क्रांतिकारी मंत्र्यांनी घ्यावा आणि महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांचे नांव सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे असे वाटते. याबाबत मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा आणि शेतक-यांच्या आत्महत्या थांबवून त्यांना वाचवावे अशी माझी कळकळीची विनंती आहे.

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री): सभापती महोदय, भूविकास बँकेच्या संदर्भात हाप्रश्न विधानसभेमध्ये आला होता. त्यावेळी मी जाहीर केले होते की, याप्रश्नाच्या संदर्भात कायद्यामध्ये दुरुस्ती केली जाईल. वन टाईम सेटलमेंट करण्याबाबत आदेश दिले जातील. जिल्हा बँकांना सहकार खात्यामार्फत आदेश दिलेले आहे की त्यांनी 10.5 टक्के व्याज लावले पाहिजे. ज्या जिल्हा सहकारी बँकांना परवडणार नाही त्यांनी एनओसी दिल्यानंतर राष्ट्रीयीकृत बँकांनी शेडयूल बँकेकडून कर्ज घेण्यासाठी परवानगी द्यावी. वन टाईम सेटलमेंटच्या बाबतीत संबंधितांची बैठक

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ...

घेऊन एक महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाईल आणि अशी योजना लागू करण्याबाबत विचार केला जाईल.

श्री. भाऊसाहेब फुंडकर : सभापती महोदय, याबाबतचा निर्णय होईपर्यंत कर्ज वसूली थांबविणार काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, भूविकास बँकेला कर्जवसूलीबाबत आदेश दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व पक्ष याविषयाच्या बाबतीत शासनाच्या मागे आहेत. केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांची सर्वांनी मिळून भेट घेऊ. उपमुख्यमंत्री,अर्थमंत्री आपण जाऊ या. शेतक-यांच्या या महत्वाच्या प्रश्नाबाबत 8 दिवसात बैठक घ्या. यवतमाळ जिल्हयामध्ये 7 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, 8 दिवसात याविषयाबाबत बैठक घ्यावी आणि 15 दिवसात निर्णय जाहीर करावा.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या नेत्यांना एकत्र बोलावून 15 दिवसात बैठक घेऊ आणि सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या बाबतीत पॉझिटीव्ह विचार करण्यासंबंधीचे आश्वासन दिलेले आहे,या निर्णयामुळे महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळणार आहे म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो, त्यांचे अभिनंदन करतो त्याचप्रमाणे हा निर्णय त्वरित घ्यावा अशी माननीय मंत्रिमहोदयांना मी विनंती करतो.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेल्या सूचनेच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी पॉझिटीव्ह निर्णय घेण्याचे आश्वासन दिलले असल्यामुळे आता त्यांनीच सर्वाना जेवण दिले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : मी सर्वांना जेवण दिलेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांची उत्तरोत्तर प्रगती होत राहो आणि सध्या ते ज्या पदावर आहेत त्या पेक्षासुध्दा वरच्या पदावर ते महिनाभरात जावो. तसेच त्यांनी महाराष्ट्राचे यशस्वी नेतृत्व करावे अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली सूचना निर्णयाच्या स्वरुपात कार्यान्वित झाली तर मी स्वत: पत्रकारांसहित सभागृहातील सर्व सदस्यांना जेवण देईन.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी: डान्सबारसंबधी करण्यात आलेल्या आरोपासंबंधी श्री.आर.आर.पाटील उपमुख्यमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

मु.शी : डान्सबारसबंधी करण्यात आलेल्या आरोपासंबंधी श्री.आर.आर.पाटील, उपमुख्यमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) :सभापती महोदय, मी काल सदनामध्ये निवेदन केले होते परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेते त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हते.सदनामध्ये जे काही बोलले गेले त्याबाबत नियमाप्रमाणे व त्यांच्या हक्काप्रमाणे त्यांनी माध्यमांना सागितले होते.राज्यातील जनतेचा गैरसमज होता कामा नये . तसेच आरोपीच्या पिंज-यात उभे राहून काम करणे हे मी कधीही पसंत करणार नाही.म्हणून विरोधी पक्ष नेत्यांच्या लक्षात यावे यासाठी मी काही माहिती या ठिकाणी देऊ इच्छितो. मी या राज्याचा गृहमंत्री झाल्यानंतर डान्सबारच्या संदर्भात माझ्याकडे एकूण 21 प्रकरणे विचारार्थ आली होती.त्या प्रकरणावर मी हिअरींग दिले होते. त्या संदर्भात असा आरोप झाला होता की ,दोन प्रकरणात पॉझिटीव्ह निर्णय घेतल्यामुळे आमचा विश्वास बसला आणि श्री.साटम यांच्याबरोबर मी पुढची बोलणी केली होती. सभापती महोदय, त्यांनी ज्या दोन बारची नावे सांगितली होती त्या बारच्या केसेस मी तपासून पाहिल्या होत्या आणि सुदैवाने महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही न घडलेली घटना गेल्या वर्षभरात सातत्य ठेऊन माझ्या हातून घडत होती.ज्या 21 डान्स बारच्या संदर्भात मी हिंअरीग दिले होते त्यापैकी एकाचाही निर्णय डान्स बारच्या बाजूने लागलेला नाही. त्याचे कारण असे की, बार मालक यावयाचे आणि असे सांगावयाचे की एक तर दंड करण्यात यावा किंवा अपील फेटाळण्यात यावे.सभापती महोदय, अपीलेट ॲथॉरिटीला दंड करा किंवा अपील फेटाळा असे सांगितले जावयाचे म्हणजे तुमचा जो काही दंड असेल तो दंड आम्हाला सांगा तो दंड आम्ही भरु आणि बार पुन्हा चालू करु अशा पध्दतीची कायदा पायदळी तुडविणारी आणि दंड भरण्याची हिंमत दाखवून बार पुन्हा सुरु करणारी भूमिका त्यातून व्यक्त होत होती. जे काही निर्णय झालेले आहेत त्यातील 21 च्या 21 निर्णय बारच्या विरोधात दिले गेलेले आहेत.त्यामुळे यासबंधीचा कोणी तरी निकाल तयार करुन आणला होता आणि त्यावर आम्ही विश्वास ठेवला असे जर कोणी सांगत असेल तर त्यावर विश्वास ठेवण्यासारखे काहीही नाही. असे मला सांगावयाचे आहे.यांसंबंधीचे सर्व रेकॉर्डस मी आपल्याला सुध्दा उपलब्ध करुन देईन. यानंतर श्री.साटम यांच्या संदर्भात मी खुलासा करु इच्छितो. खालच्या सभागृहामध्ये 30 तारखेला एका लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात राज्यातील बार बंद

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. 30 तारखेलाच या संदर्भात काही वक्तव्ये करण्यात आली होती.श्री.साटम यांच्या संदर्भात 12 मार्च 2005 रोजी अधिवेशन सुरु होण्यापूर्वी अशी तक्रार करण्यात आली होती की, एम.पी.एस.सी.च्या मार्फत नोकरी लावतो असे सांगून श्री.साटम याने एका व्यक्तीकडून चार लाख रुपये घेतले होते. परंतु त्या व्यक्तीला नोकरी लागली नाही म्हणून तीन लाख रुपये त्याने परत दिले होते व एक लाख रुपये तो परत देत नव्हता म्हणून त्यासंबंधीची तक्रार माझ्याकडे करण्यात आली होती. यासंबंधीच्या सगळया प्रकरणाची मी माहिती घेतली होती. ज्यावेळी 12 तारखेला हे प्रकरण माझ्याकडे तक्रारीच्या स्वरुपात आले होते. त्यावेळी 12 तारखेला सभागृहाची बैठक सुरु होण्यापूर्वी त्या तक्रार अर्जावर "अत्यंत महत्वाचे, ताबडतोब चौकशी करुन कारवाई करावी "असे माझ्या हस्ताक्षरात लिहून हे प्रकरण संबंधित डी.सी.पी.कडे 12 तारखेलाच पाठविण्याची मी भूमिका घेतली होती.या प्रकरणामध्ये त्याला जर पाठीशी घालण्याचा प्रयत्न असता तर अत्यंत गांभीर्याने हे प्रकरण डी.सी.पी.कडे सोपविण्याची आवश्यकता मला वाटली नसती. यामधून माझे इन्टेन्शन स्पष्ट होत आहे यासबंधीच्या नोंदी दोन्ही पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेल्या आहेत. पक्षामध्ये लाखो कार्यकर्ते असतात. कदाचित श्री.साटम हा परस्पर काही करीत असेल. परंतु त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका घेतली गेली नाही .उलट त्यांना पक्षातून काढून टाकले आहे.त्या माहितीत तथ्य आढळून आल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली असून 20 तारखेपर्यन्त पोलीस कस्टडीसुध्दा मिळालेली आहे. राजकारणात वावरत असतांना लाखो लोक सभोवताली फिरत असतात तेव्हा कोणी अशा प्रकारचे परस्पर उपद्व्याप केले तर ते सुध्दा सहन करता उपयोगाचे नाही.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

या दोन्ही प्रकरणातील असलेली माहिती माझ्याकडे द्या, माझ्याकडेही काही माहिती गोळा मी केलेली आहे. राज्य सरकारने चांगल्या हेतूने घेतलेला निर्णय बदनामीच्या चक्रव्यूहामध्ये अडकता उपयोगी नाही म्हणून या बाबतीत या दोघांचीही चौकशी करून कायद्यानुसार जी काही कारवाई करावी लागेल ती निश्चितपणे केली जाईल. सभापती महोदय, ही कारवाई झाली नसती, 12 तारखेलाच कारवाई करण्याचे आदेश झाले नसते तर कदाचित काही शंकाही व्यक्त केल्या गेल्या असत्या. परंतु यामध्ये चुकीचे वागणाऱ्या कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका आजपर्यंत घेतलेली नाही आणि भविष्यामध्येही घेतली जाणार नाही. जे दोषी आहेत त्यांना जरूर पकडले जाईल आणि त्यांचेवर कारवाई केली जाईल एवढीच ग्वाही या निमित्ताने मी देऊ इच्छितो.

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो खुलासा केला आहे त्या संदर्भात मी आपल्यापुढे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, त्यातील काही गोष्टी या आमच्याकडून मांडलेल्या नाहीत. आता त्यांनी खुलासा केलेलाच आहे त्याबद्दल त्यांना जरूर धन्यवाद. परंतु आता या संदर्भात मी माझ्याकडे जी माहिती आहे तीही येथे सांगू इच्छितो. या ठिकाणी श्री.साटम म्हणून ज्या व्यक्तीचा उल्लेख झालेला आहे ही व्यक्त एअर इंडियातील एक कर्मचारी होती, पण चोरीच्या आरोपावरून त्यांना तेथून काढून टाकले गेले आहे अशी माझी माहिती आहे., खरे तर हे रत्न आमचे मित्र श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांनी हेरलेले आहे असे लोक म्हणतात. ... असे आपण समजू की, शिवसेनेतील हे रत्न त्यांनी हेरले. खरे खेटे काय आहे ते मला माहीत नाही. तर या श्री.साटम यांनी काय केले ते मी आपल्याला सांगतो. मध्यंतरी मी या बाबत पूर्ण माहिती घेतली आहे आणि काही पुरावा देखील माझ्याकडे आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारमध्ये असा निर्णय झाला होता की, गुमास्ता कायद्याने 24 तास दुकाने उघडी ठेवावयाची. याचा फायदा घेऊन डान्स बारस्ची वेळ रात्री साडेतीन वाजेपर्यंत ठेवावयाची. मग त्याप्रमाणे प्रस्ताव तयार झाला. त्यावेळी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री होते, ते आज आता मंत्री नाहीत, ते माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे गेले होते आणि त्यांनी या बार मालकांना ही सवलत मिळावी यासाठी प्रयत्न केले होते. पण तो प्रस्ताव सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या श्री.आर.आर.पाटील यांचेकडून रिजेक्ट केला गेला हे सत्य आहे. सभापती महोदय, आमचे मित्र श्री.आर.आर.पाटील यांच्या विरोधात मी अनेकदा

..... एमएम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

बोललो आहे पण मी असा एकही आरोप केलेला नाही. तर या श्री.साटम याची डान्स बारचे मालक श्री.मनजितसिंग याची भेट झाली आणि श्री.साटम याने मनजितसिंग याचेकडे मागणी केली की, आम्ही तुम्हाला गुमास्त्यातून सवलत मिळवून देऊ. तुम्ही आम्हाला 5 कोटी रुपये दिले तर हे काम आपण करून देऊ. त्यावर त्याने 5 कोटी देणे जमणार नाही, 3 कोटी रुपये देऊ असे सांगितले. पण शेवटी पाच कोटी ठरल्यानंतर श्री.साटम हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात गेले. तेथे त्यांना श्री.परेश पाटील म्हणून व्यक्ती भेटली. ही व्यक्ती म्हणजे देखील एक मोठे प्रस्थ आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाचे बांधकाम, फर्निचरचे काम त्याने केलेले आहे. त्यांचा माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याशी काही संबंध आहे असा मी आरोप केलेला नाही. आता माननीय मंत्री श्री.अजितदादा यांचा बंगला ते बांधत आहेत., ते एक कंत्राटदार आहेत आणि आम्ही दोघे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोणी तरी मोठे कार्यकर्ते आहोत असा ते दावा करतात. तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात या दोघांची भेट झाल्यानंतर त्यांनी एकमेकांशी बोलणे केले. त्यानंतर त्याच कार्यालयात माननीय श्री.आर.आर.पाटील हे त्यावेळी आतल्या दालनात बसलेले होते आणि ते तेथे आपल्या ग्रामीण भागातून आलेल्या कार्यकर्त्यांबरोबर बोलत असतात. श्री.परेश पाटील आणि साटम आत त्यांचेपर्यंत जाऊन, त्यांचेशी काही तरी बोलून पुन्हा बाहेर आले आणि मनजितसिंगला सांगू लागले की, 5 कोटी रुपयांमध्ये काम जमणार नाही. यासाठी 12 कोटी रुपये लागतील आणि शिवाय माझे 1 कोटी वेगळे लागतील. सभापती महोदय, मी हे येथे अत्यंत जबाबदारीने सांगतो आहे. मी पुन्हा सांगतो की, माझे मित्र श्री.आर.आर.पाटील यांचे विरूद्ध मी असा कोठलाही आरोप केलेला नाही आणि करणारही नाही, तसा कोठला पुरावा देखील माझ्याकडे नाही.त्यांनी असे कोठलेही वर्तन केलेले नाही. तर मी असे सांगत होतो की, श्री.परेश पाटील यांनी त्यानंतर रात्री 12 नंतर 10 वेळा मनजितसिंग यांना फोन केला. त्यांचे मोबाईल नंबर्स देखील माझ्याकडे आहेत व ते मी येथे जाहीर करू शकतो. त्यानंतर एक दिवस श्री.परेश पाटील सफारीमध्ये तेथे आले. तेथे श्री.मनजितसिंग हेही त्यांना भेटले. त्यावेळी त्यांनी श्री.मनजितसिंग यांना सांगितले की, मी येथे बोलणार नाही. कोणी तरी ऐकते आहे. म्हणून मग केवळ चिठ्ठ्या लिहून ते एकमेकांशी संवाद साधत होते. म्हणजे संजीवकुमारच्या चित्रपटातील मुक्या माणसाचा अभिनय होता त्याप्रमाणे खुणा करून ते तेव्हा एकमेकांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी पुन्हा मनजितसिंग यांना सांगितले की, 12

..... एमएम 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

कोटी अधिक माझे 1 कोटी लागतील तर हे काम होईल. हा सगळा व्यवहार करणारे हे श्री.परेश पाटील कोण आहेत, त्यांचा संबंध काय आहे ? तसेच यातील हे श्री.साटम कोण आहेत याचाही आपण विचार करावा. त्यातच एक बातमी आली की, या श्री.साटम यांना मध्यंतरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष श्री.अरूण गुजराथी यांनी पक्षातून निलंबित केले. केवळ त्यांना तेव्हा पदावरूनच काढून टाकले असे नाही तर त्यांची चांगली धुलाई देखील पक्ष कार्यकर्त्यांनी केली आहे. त्यामुळे त्यांचे तोंडसुद्धा सुजलेले होते, चेहरा लाल झाला होता. नंतर या श्री.साटम याने या संदर्भात इन टीव्ही ला मुलाखत दिली. .....

(यानंतर श्री. जागडे ..... एनएन 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

एनडीटीव्हीवर मी मुलाखत पाहिली आहे आणि ऐकली आहे. साटम यांनी असे मान्य केले की, या बाबत मी परेश पाटील आणि मनजितसिंग सेठी यांची भेट करुन दिली तसेच तशा प्रकारची बोलणी करुन दिली. आता हे परेश पाटील राष्ट्रवादीच्या कार्यालयात चहा पाजतात, त्या ठिकाणी सगळीकडे वावरतात. माननीय ज्येष्ठ मंत्री दादांचा बंगला बांधतात. बाहेर जाऊन लोकांना असे सांगतात की, दादांकडे काही काम आहे काय ? मी तुमचे काम करेन. माननीय आर.आर. पाटीलसाहेब मी आपणाबद्दल बोलत नाही. आपल्या गृह विभागात प्रभू नावाचे अवर सचिव होते. या आधी महाराष्ट्राच्या इतिहासात जेवढे लेडीज बार सस्पेंड करण्यात आले होते, त्या एकालाही मंत्रालयातून टर्मिनेट करण्यात आले नाही. मंत्रालयातून ते पुन्हा रिइन्स्टेट झाले. हे प्रभू अतिशय स्वस्त्यात काम करायचे. अपील ॲडमिशनचे ते काम करायचे. मला असे समजले की, प्रभू नास्ता वगैरे थोडेसे काही घेऊन स्वस्त्यात काम करुन द्यावयाचे. त्यावेळच्या सन्माननीय गृहमंत्र्यांनी प्रभूंना असे म्हटले की, " प्रभो तुम यह काम मत करो, यह काम मैं करुंगा. " प्रभूंकडे ॲडमिशनचे जे अधिकार होते, ते देखील त्यांनी काढून घेतले होते. ॲडमिशनचे अधिकार डायरेक्टर गृहमंत्र्यांनी आपल्या हातात घेतले. त्यानंतर ॲडमिशनकरिताही सेवा आणि स्टेकरिताही सेवा, असे सुरु झाले. या सर्व प्रकरणाबाबत मा. आर. आर. पाटील यांच्याबद्दल कोणताही आरोप डायरेक्टली आणि इनडायरेक्टली मी केलेला नाही. बाहेर केला नाही, तसेच पत्रकारांजवळही केला नाही. तसेच मा.अजित पवार यांच्याबद्दलही केलेला नाही. परंतु परेश पाटील आणि गुरुनाथ कुळकर्णीनी हे जे रत्न शोधून आणले होते, त्या रत्नाची धुलाई करुन त्याला राष्ट्रवादी पक्षातून काढून टाकण्यात आले होते. या रत्नाने परेश पाटील याच्या सहकार्याने हा प्रकाश पाडला होता. ही मात्र गंभीर घटना आहे. तसेच ही घटना एनसीपी या पक्षाशी संबंधीत आहे. आता मा. आर. आर. पाटील हे राष्ट्रवादीचे नेते आणि त्यांनी राष्ट्रवादीच्या कार्यालयाची चौकशी करणे बरोबर नाही. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करावी, सीबीआयची मदत घ्यावी. तसेच परेश पाटील व हे जे रत्न आहे, त्यांची चौकशी करावी. 12 कोटी का मागितले ? कोणासाठी मागितले ? कसे मागितले ? त्यांनी जे कार्यालय बांधले आहे, त्यासाठी त्यांना पैसे मिळाले आहेत काय ? त्यांनी जो बंगला बांधला आहे तो कसा बांधला आहे ? त्यासाठी पैसे कोठून आले ? याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, माझी माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

आर.आर.पाटलाला विनंती आहे. मी सुरुवातीला मंत्री झाल्यानंतर त्यांच्यासारखाच संवेदनशील होतो. त्यावेळी पत्रकारांनी माझ्या विरोधात काही लिहिले तर मला पुष्कळ वाईट वाटत होते. माननीय श्री. आर. आर. पाटील यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आम्ही संशय घेतलेला नाही. आम्ही कोणतेही वक्तव्य केलेले नाही. तसे मी करणारही नाही. मी आपणाला विश्वासाने सांगतो. या पवित्र सभागृहात जोपर्यन्त माझे मन कमीट होणार नाही की, हा माणूस गिल्टी आहे, तोपर्यन्त मी त्याच्यावर कधीही आरोप करणार नाही. आता या दोन्ही प्रकरणातील मोबाईल नंबर माझ्याकडे आहे. त्यामध्ये जे काही संवाद झाले, त्याची माहिती माझ्याकडे आहे. आता या दोघानी एनसीपीचा वापर केला आहे. तसेच परेश पाटील हे एनसीपीमधील मोठे प्रस्थ आहे. आता त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेससाठी पैसे मागितले होते. म्हणून या प्रकरणात संशय निर्माण झाला आहे. तेव्हा तेवढ्या पुरती आपण चौकशी केली पाहिजे. परंतु मी दुरान्वये डायरेक्ट आणि इनडायरेक्टली आर.आर.पाटील यांचे नांव घेतले नाही. त्यांच्यावर संशय व्यक्त केला नाही. आजही माझ्या मनात त्यांच्याविषयी काहीच संशय नाही. सभापती महोदय, आजपर्यन्त त्यांच्या विभागाकडे आजपर्यन्त ज्या ज्या लेडीज बारनी अपील केले त्या सगळ्या लेडीज बारला परवानगी देण्यात आली आहे. तेव्हा आम्ही जेव्हा बोलतो, तेव्हा एखाद्या यंत्रणेबद्दल बोलत असतो. माननीय मंत्रिमहोदयांनी डान्सबारचा जो निर्णय घेतला, त्याचे आम्ही स्वागत केले आहे. समाजाच्या स्वाथ्यासाठी हा निर्णय योग्य आहे. या बाबत आम्ही कोणत्याही प्रकारचे आव्हान केले नाही. मात्र या दोन गोष्टी एनसीपीच्या भोवती पिशाच्च उभे करणा-या आहेत. माननीय गुरुनाथ कुळकर्णी यांनी याची काळजी घेतली पाहिजे. The man is know from the company he keeps. आदरणीय नेते श्री. पवार साहेब यांनी विमानातून श्री. शर्मा यांना आणले होते, तेव्हा त्यांना किती त्रास झाला होता, हे आपणा सर्वांना माहिती आहे. आपली आणि कॉंग्रेसची स्पर्धा आहे, हे मला मान्य आहे.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

कॉग्रेसच्या पुढे तुम्हाला जायचे आहे हे आम्हाला मान्य आहे. परंतु कुणीही आले तरी त्याला आपण पदाधिकारी करु, सेक्रेटरी करु असे आपण कृपाकरुन करु नका The man is known from the company he keeps credentials तेव्हा या बाबतीत कॉग्रेसच्या पुढे जायचे आहे, या इच्छेपोटी आपण अशी स्पर्धा करु नका आणि येणाऱ्या माणसाचे क्रेडेन्शिअल, त्याचे चारित्र्य तपासून घ्या. नाही तर माननीय श्री. आर.आर. पाटील हे प्रामाणिक आहेत, कर्तृत्ववान आहेत आणि म्हणून काहीही नसतांना ते अडचणीत येतात. आणि म्हणून हे रत्न पारखतांना आपण काळजी घ्या एवढीच मी विनंती करतो. माननीय श्री. आर.आर. पाटील यांना विनंती करतो की, आपण या राज्याचे उप मुख्यमंत्री आहात तेव्हा आपण थोडीशी संवेदनशीलता बाजूला ठेवून कातडी जाड केली पाहिजे. कारण राजकारण व समाजकारण हे होत असते त्याबद्दल वाईट वाटून घेऊ नका. आणि विरोधी पक्ष म्हणून जिथे जिथे आम्हाला संधी मिळते तिचा उपयोग केला नाही तर आम्ही आमच्या कर्तव्याला मुकलो असे होईल. आमच्या हातात परेश पाटील सापडला, आमच्या हातात साटम सापडला, त्याचे लाल झालेले तोंड सापडले, त्याची एनडीटीव्हीवर झालेली मुलाखत सापडली, त्याचे मोबाईल फोन सापडले, त्याने बारानंतर दहा वेळा केलेल्या फोनच्या माहित्या मिळाल्या. त्यामुळे या विषयावर थोडेसे बोलणारच. मला असे वाटते की, त्यांनी खुलासा केला त्याबद्दल माझा आक्षेप नाही. या निमित्ताने माझ्यासमोर असलेली माहिती मी दिली आहे. एवढीच विनंती आहे की, या संदर्भात राष्ट्रवादी कॉग्रेसच्या या सर्व गोटात रत्नपारख्यांनी केलेले घोळ आहेत ते लक्षात घेता याची चौकशी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांकडून न करता ती सी.बी.आय. कडून करावी ही मागणी केली आहे ती कायम ठेवून माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी त्याबाबत जरुर विचार करावा अशी विनंती करतो. माझ्याकडे परेश पाटीलचे मोबाईल नंबर 9892424882, 98196367 आहेत. या व्यक्तीने रात्री 12 नंतर या फोनवर लेडीज बार असोसिएशनच्या अध्यक्षाला दहा ते बारा वेळा फोन केले आहेत. आणि सात ते आठ बैठकी घेतलेल्या आहेत. तेव्हा ही झारीतील दोन माणसे कोण आहेत? जी एनसीपीची वकिली घेऊन बाहेर बोलतात त्यांच्या बाबतीत चौकशी करावी एवढी माझी मागणी आहे. यातील बरीच माहिती माझ्याकडे आहे. कुठल्या बारमध्ये कसे भेटले याची चौकशी निघेल तेव्हा मला बोलाविल्यास मी जरुर येईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, काही रत्ने पारखून घेतली पाहिजेत. परंतु जर ते रत्न चांगल्या दुकानात ठेवले असेल तर विश्वासाने काही वेळा ते घेतले जाते. आणि प्रत्येक वेळा शंका दाखविली जात नाही. त्यामुळे कदाचित माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी एका चांगल्या दुकानातून रत्न घेतांना ते तपासून बघण्याची त्यांना आवश्यकता वाटली नसेल. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी सांगितलेल्या या सगळया प्रकरणाची गांभीर्याने चौकशी केली जाईल. अशाप्रकारे दोन लूडबूड करणाऱ्यां लोकांची चौकशी करण्यासाठी सी.बी.आय. कडे जाण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी महाराष्ट्रातील पोलीस दल सक्षम आहे. आपण फोन नंबर दिले आहेत ते तपासून बघितले जातील. कोण कोणत्या बारना कोण कोणत्या नररत्नांचे महाराष्ट्रातून फोन गेले आहेत, फोन करणारे कोणत्या पक्षाचे आहेत याची सगळी माहिती घेतली जाईल व संपूर्ण तपास केला जाईल. त्यासाठी एक यंत्रणाच उभी केली जाईल व खरे सत्य सदनासमोर आणले जाईल...

श्री. नितीन गडकरी : शीतल साईराज असे त्या बारचे नाव असून मालक श्री. चव्हाण आहेत...

श्री. आर. आर. पाटील : या संदर्भात आपण जी माहिती आमच्या निदर्शनाला आणली आहे, ही माहिती टाईम्स ऑफ इंडियामध्ये छापून आली आहे. त्या संदर्भात मी चौकशी केली. साईराज बारच्या संदर्भात अपिल चालल्याचे आढळून आले नाही. फक्त एकाच बारच्या संदर्भात मध्यंतरी न्यायालयाने असे काही निर्णय दिले होते की, याबाबत दहा ते पंधरा दिवसात निर्णय द्या. इलेक्शनच्या घाई गडबडीत आम्ही अपिले चालवू शकत नव्हतो. त्यामुळे सचिव, गृह विभाग व गृह खात्याचे दोन्ही राज्यमंत्री यांना अधिकार डेलिगेट केले होते. आणि त्यातील एका अपिलाचा निर्णय मेरिटवर योग्य पध्दतीने सन्माननीय श्री. कृपाशंकर सिंह यांनी दिला आहे..

श्री. नितीन गडकरी : माजी गृह राज्यमंत्री श्री. कृपाशंकर सिंह यांच्या संदर्भातील माहितीही माझ्याकडे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

L.A. BILL NO.XXVII OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमाक 27 - विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता ; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 27 - विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता ; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

. . . .2 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाच्या पान क्र.6 वर मालकांना एवढया सवलती दिलेल्या आहेत म्हणजे शिक्षा करताना आपण पान क्र.5 वरील, कलम 6 मधील (3) मध्ये असे म्हटलेले आहे की, "पोट-कलम(1) अन्वये काढण्यात आलेला आदेश त्यात निर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून फक्त सहा महिने अंमलात राहील, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, तत्सम आदेशाव्दारे त्याची मुदत सहा महिन्यापेक्षा अधिक नसेल एवढया आणखी मुदतीकरिता वाढविता येईल." म्हणजे संपबंदीचा. मंत्री महोदय, येथे असे म्हटले आहे की, पुन्हा सहा महिन्यासाठी अवधी वाढविण्यात येईल. पण या एक वर्षाच्या काळात त्यांच्या जर काही न्याय मागण्या असतील तर त्याला हिअरींग दिले पाहिजे असे काही नाही, या एका मुद्याबाबत आपण आपल्या उत्तरामध्ये खुलासा करावा. त्याला तुम्ही काही हिअरींग देणार नाही. पहिले सहा महिने संपबंदी करणार. हे मला मान्य आहे. मी नावे घेत नाही. पण मुंबई शहरात पावसाळा आला रे आला की एखाद्या प्रशासनाला वेठीस धरुन आपले नेतृत्व सिध्द करण्यासाठी जनतेला वेठीस धरावयाचे. मग कचरा साठला तरी चालेल, अनेक गोष्टींसाठी नागरिकांना हाल सहन करावे लागले तरी चालतील पण आपले नेतृत्व समाजात कामगार नेता म्हणून प्रस्थापित करण्यासाठी जनतेला वेठीस धरतात हे मला मान्य आहे. परंतु काही वेळेला न्याय मागण्यांसाठी, उदाहरण द्यावयाचे तर आपल्याकडील आश्रमशाळा किंवा ज्या बालवाडया चालतात, गेली चार-पाच वर्षे आपण त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या मागण्या मान्य केलेल्या नाहीत. पण या सगळयांना उडदामाजी काळेगोरे, या सगळया लोकांना ज्यांच्या न्याय मागण्या आहेत त्यांनाही आणि जे समाजाला वेठीस धरुन नेतृत्व प्रस्थापित करतात, त्यांनाही आपण एकाच मोजमापाने बांधलेले आहे. तुम्ही सहा महिन्याचा कालावधी संपबंदीसाठी देणार आणि पुन्हा तुम्हाला योग्य वाटल्यास पुढे सहा महिने करणार. बरोबर ? परंतु त्या एक वर्षाच्या काळात जर त्यांच्या न्याय मागण्या असतील तर त्यांच्या हिअरींगची यामध्ये काही तरतूद नाही ही पहिली गोष्ट. याठिकाणी कलम 6 मधील (4) मधील (अ) मध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "कोणत्याही मालकाला हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात कोणतीही टाळेबंदी जाहीर करता येणार नाही किंवा सुरु करता येणार नाही" म्हणजे काय ? हे मला कळले नाही. कदाचित यामध्ये प्रिटींगमध्ये चुक झाली असेल. नंतर मालकाला तुम्ही किती शिक्षा देणार आहात ? तर केवळ दोन हजार रुपये दंड आणि सहा

. . . .2 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिन्याचा कारावास आणि पुढे असे आहे की, जे संपावर जातील, त्यांना दोन्ही शिक्षा देणार आहात. उदाहरणार्थ पान क्र.6 वर असे लिहीलेले आहे की,"आस्थापनेच्या संदर्भात कोणत्याही कामगारांची कामबंदी करणारा किंवा चालू ठेवणारा कोणताही मालक, अशी अपरिहार्य कामबंदी करणे किंवा चालू ठेवणे ही या कलमान्वये अवैध ठरेल. तो दोषसिध्दीनंतर सहा महिन्याच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढया कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रुपये." म्हणजे कारण नसताना, जसे अनेक लोकांनी मिल बंद केल्या, त्यांना तुम्ही याठिकाणी दोन हजार रुपये दंड करणार हे चुक आहे असे मला वाटते. त्याचबरोबर कलम 7 मध्ये असे दिलेले आहे.. . . .

डॉ.अशोक मोडक(खाली बसून) : "किंवा" म्हटले आहे. "आणि" नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभपती महोदय, होय. मला मान्य आहे. माझे असे म्हणणे आहे की, फक्त दोन हजार रुपये दंड नाही, तर जास्त केला पाहिजे. त्यानंतर कलम 7 मध्ये असे म्हटलेले आहे की, "या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेला संप सुरु करणा-या किंवा अशा कोणत्याही संपावर जाणा-या किंवा राहणा-या किंवा अन्य प्रकारे संपात भाग घेणा-या कोणत्याही व्यक्तीस दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल एवढया कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असे शकेल एवढया दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील." नंतर कलम 9 मध्ये असे लिहीले आहे की, "या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेल्या संपाच्या पुर:सरणार्थ किंवा त्यास पाठिंबा देणासाठी जाणुनबुजून जी व्यक्ती कोणताही पैसा खर्च करील किंवा पुरवील तिला, दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील." सभापती महोदय, जो संपावर जाणारा कामगार आहे किंवा त्या संपाचे नेतृत्व करणारा नेता आहे, त्याला दोन्ही शिक्षा दिल्या जातील आणि जो त्याठिकाणी टाळेबंदी करील, जो त्याठिकाणी कामगारांचे शोषण करुन कोणत्या तरी माध्यमातून आपला प्रस्थापित व्यवसाय बंद करुन ती जमीन विकावयाची असेल किंवा त्याला त्याठिकाणी गडगंज संपत्ती मिळवावयाची असेल, त्यासाठी टाळेबंदी करेल,

सभापतीस्थानी-तालिका सभापती(श्रीमती सुधा जोशी)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू.....

त्याला सहा महिन्याची शिक्षा किंवा 2 हजार रुपये दंड." दोन्ही दंड का नाही ? उलट कामगार हा आपल्या हक्कासाठी लढत असतो. कदाचित कोणत्या तरी कामगार नेत्याच्या दबावाला बळी पडून आवश्यकतेपेक्षा अधिक काळ संपावर जाईल, कारणाशिवाय संपावर जाईल. ज्यावेळेला एखादी टाळेबंदी केली जाते, ज्यावेळेला एखादा व्यवसाय बंद केला जातो, काही गिरणी कामगारांना आपण देशोधडीला लावले, त्यांना मात्र आपण 2 हजार रुपये दंड करणार, मला असे वाटते की, जनतेच्या हितासाठी संपावर बंदी आणणे, हे काही केल्या, दोन-चार वर्षाचे अनुभव घेतले तर यामुळे कामगार चळवळ चिरडून टाकली जाणार नाही, त्यांच्या न्याय्य मागण्या मागितल्यानंतर हा जो आपण कायदा करणार आहात, त्याचा बडगा उभारून कायमची 1975 ची आणीबाणी आणणार नाही, त्या काळामध्ये देखील बोनस बंद, संप बंद, कोणत्याही मागण्या बंद होतात. 1977 नंतर जो उद्वेग झाला, तो आपल्या सगळ्यांना माहीत आहे. म्हणून हे दुधारी हत्यार आहे. मला असे वाटते की, माझी उपसूचना स्वीकारणार की नाही, हे मला माहीत नाही. जसे "किंवा", किंवा "दोन्ही" या दोन्ही शिक्षा मालकाला देखील होणे आवश्यक आहे. 2 हजार रुपये दंड ठेवलेला आहे. जसे हॉस्पिटल्सनी आपल्या अटी पाळल्या नाहीत, तर त्यांना 1950-55 साली 2 हजार रुपये दंड ठेवलेला होता. कोणताही मालक 2 हजार रुपये दंड देऊन मोकळा होईल. तुम्ही "किंवा" केलेले आहे, म्हणजे तुमच्या हातामध्ये डिस्क्रीशनरी पावर आहे, म्हणून मला असे वाटते की, याचा सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे. घाईघाईने हे बील मंजूर करणे बरोबर नाही. त्यामुळे कामगार चळवळीच्याबाबतीत औद्योगिक कलह कायदा आहेच. त्यामध्ये तुम्ही सुधारणा केल्या नाहीत. आर.एम.एस. आपल्या हातात रहावी म्हणून बी.आय.आर.ॲक्टमध्ये तुम्ही सुधारणा केल्या नाहीत. जे आपल्या सोईचे आहे, ज्या कामगार संघटना आपल्या हातामध्ये आहे, त्यामुळे तुम्ही बदल करणार नाही. परंतु अत्यावश्यक सेवेवर बंदी आणतांना आणि जनहिताच्यादृष्टीने कायदा करत असतांना, आपली कामगार चळवळ भरडली जाणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत आवयक आहे. "किंवा"आणि 'दोन्ही' यामध्ये फरक आहे. मला असे वाटते की, जे टाळेबंदी करतील किंवा आकसाने कोणत्या तरी मार्गाचा अवलंब करून आपला व्यवसाय बंद करतील, तेव्हा त्यांच्यावर कठोर शासन करण्याची व्यवस्था यामध्ये नाही. याचा सर्वंकष विचार करण्याची आवश्यकता आहे. पण हे बील पावसाळ्यामध्ये पास झाले तर फार मोठे आकाश कोसळणार नाही. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन्माननीय मंत्री महोदयांनी विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक आणलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी बोलतांना एक विषय मांडला. मुळामध्ये अत्यावश्यक सेवा आणि तद्नुषंगिक सेवा यामध्ये कोठेही फरक असल्याचे दिसत नाही. अत्यावश्यक सेवा या सर्वांना माहीत आहेत. मूळ मुद्दा असा येतो की, कोणताही कर्मचारी किंवा कोणत्याही आस्थापनातील कामगार हा त्याच्या मागण्यांसाठी संप हे शेवटचे हत्यार समजतो. कोणतीही ट्रेड युनियन चळवळ देखील, नोटीस देण्यासंबंधातील कायदा आहे.. पूर्वी 40 दिवस अगोदर नोटीस दिली जात होती. ही नोटीस दिल्यानंतर असे अपेक्षित असते की, दरम्यानच्या काळामध्ये पॅसिव्ह पिरिअड डेमॉस्ट्रेशन होत असतात, कोणते तरी कार्यक्रम केले जात असतात, काळ्या फिती लावणे किंवा लंचमध्ये, भोजनाच्या सुट्टीमध्ये निदर्शने करणे, अशा पध्दतीने मागण्यांकडे लक्ष वेधण्याचा कार्यक्रम घेतला जातो. दुर्दैवाने शासनाने त्या दरम्यान लक्ष वेधून घेतले असते, तर प्रश्न नव्हता. परंतु त्यामध्ये त्यांनी लक्ष घातले नाही तर परिणामी त्यांना संपाचे हत्त्यार उचलावे लागते. मी या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधून घेईन की, गिरणी कामगारांचा संप विसरू नका, कायद्याच्या चौकटीध्ये कशी पळवाट निघते, तेही मी दाखवितो. गिरणी कामगारांच्या संदर्भातील मागण्या निघाल्या. त्या काळी सारे गिरणी कामगार शिवसेना प्रमुखांकडे आले. त्या संदर्भात निदर्शने झाली. एक जोरदार सभा झाली. त्यानंतर एक लाक्षणिक संप करण्याचा निर्णय घेतला. त्या लाक्षणिक संपानंतर त्यामध्ये थोडे लक्ष घालावे अशी अपेक्षा होती. सभापती महोदया, लाक्षणिक संप झाला. कोणतीही मान्यताप्राप्त संघटना नसतांना शिवसेना प्रमुखांच्या एका शब्दाने या मुंबईतील गिरणी कामगार एकत्र आले. मान्यताप्राप्त संघटना आणि गिरणी कामगार सगळे यांच्याकडे. संप झाला सरकारने वेळीच त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामध्ये आणखी काही गोष्टी आहेत. कामगारही थोडेसे चुकीचे वागले. गिरणी मालकांच्या संबंधात जेव्हा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा ते ताबडतोब दत्ता सामंत यांच्याकडे गेले. दत्ता सामंतांचा संप आजतागायत संपलेला नाही. त्यांनी संप पुकारला.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

त्यांनी संप पुकारला तेथेही पुन्हा अशीच घटना घडली, मान्यताप्राप्त संघटना, राष्ट्रीय मिलमजदूर संघ, आणि कामगार दत्ता सांमतांच्या युनियनकडे. शेवटी गिरणी कामगार उध्वस्त झाला. आता आपण जे हत्यार उपसता आहात. ते रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती व्हायची. याच्यातील अमानूषपणा आपण लक्षात घेतला पाहिजे. राष्ट्रीय मिलमजदूर संघटना आणि मालक यांचे साटेलोटे जमले तरी कामगार उध्वस्त होतो. आणि मान्यताप्राप्त संघटना आणि मालक यांच्यामध्ये संघर्ष टोकाचा झाला तरी सुध्दा कामगार उध्वस्त होऊ शकतो. या पार्श्वभूमिवर माननीय हिंदू हृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेला विचार प्रचंड मोठा आहे. तो अनेकांना पचनी पडला नाही. समजला नाही. त्यांनी दोन विचार दिले."उद्योग जगला तर कामगार जगेल" आणि "हक्क मागतांना कर्तव्याला विसरु नका." त्यासंदर्भात सातत्याने सांगितले जाते की, जपानमध्ये आंदोलन कसे होते? प्रॉडक्टिव्हिटी वाढवायची. दिवसरात्र काम करायचे. एका शूजच्या कंपनीमध्ये आंदोलन झाले. त्यांनी काय केले? कंपनी बंद पाडली नाही. शूजचे जोड असतात त्या शूजचा एकच पाय सगळया कामगारांनी काढला, दुसरा पाय काढलाच नाही. त्यामुळे प्रॉडक्टिव्हिटी चालू राहिली. पण पादत्राणाचा जोड तयार झाला नाही. अशा पध्दतीने प्रॉडक्टिव्हिटी केली आणि मालकालाही अडचणीत आणले. अशा पध्दतीने त्या ठिकाणी आंदोलन केले जाते. येथे मुळात आंदोलन कर्त्यांवर डायरेक्टर कसे प्रहार केले आहेत ते पाहा. मला मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, आपले उदिष्ट कदाचित चांगले आहे. या मागचा हेतु वाईट असेल असेही मी म्हणणार नाही. श्री. मधुकर चव्हाणांनी उल्लेख केला की, पावसाळा आला की, पावसाळयात त्या छत्र्या उगवाव्यात तशा पध्दतीने त्यांच्या युनियन सुरु होतात आणि लोकांना वेठिस धरतात. काही मूलभूत सेवा आहेत हे मलाही मान्य आहे. शासन यामध्ये ट्रान्स्पोर्ट धरीत आहे. ज्या वेळेला यामध्ये ट्रान्स्पोर्टचा समावेश केला जातो, त्यावेळेला खाजगी उद्योधंद्याना एका बाजूला प्रोत्साहन देण्यात येत आहे. आज सातत्याने एस.टी. कामगारांचे आंदोलन सुरु आहे. एस.टी. कामगार आज कित्येक महिने आंदोलन करीत आहे. यामध्ये सरकारची किती हतबलता आहे ती मी दाखवितो. एका बाजूला अवैध वाहतूक सुरु आहे ती सुरु आहे.पण त्याचे दुष्परिणाम एस.टी. महामंडळावर होतात. एस.टी. महामंडळ तोटयात जाते. परिणामी कर्मचा-यांच्या भविष्यावर परिणाम होतो. या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

जो तोटा होतो तो अत्यंत वाईट आहे. सभापती महोदय, मी एस.टी. महामंडळाचेच उदाहरण देतो. एस.टी. महामंडळाच्या डेपोच्या बाहेर खाजगी गाडया उभ्या असतात यामध्ये दोन्ही प्रकार आहेत. एस.टी.चे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांच्या गाडया वेळेवर सुटत नाहीत. वेळेवर सुटल्याच तर त्याच्या गाडीच्या अगोदर खाजगी गाडी निघून जाते आणि मग यांचे साटेलोटे जमते. बाहेरच्या खाजगी गाडया आगोदर सगळे प्रवाशी घेऊन जातात आणि मग एस.टी. महामंडळाची रिकामी गाडी मागून जाते. याला आशिर्वाद कुणाचे आहेत? पोलीस खाते पहात नाही, परिवहन खाते पहात नाही. जेथे जेथे पोलीस खात्याने किंवा परिवहन खात्याने हस्तक्षेप केला सभापती महोदया, मला सांगायला आनंद होतो की, त्या त्या ठिकाणी एस.टी. महामंडळ फायद्यात आले. मग ते बुलढाणा असेल किंवा आणखी एखादे ठिकाण असेल. एका बाजूला जेव्हा आपण कायदा आणू इच्छिता तेव्हा ही जबाबदारी आपण विसरता. एस.टी.च्या बाबतीत जरुर कायदा आणा. अवैध वाहतूक चालू राहते, मॅक्सीकॅप चालू राहते, 96000 मॅक्सीकॅप या महाराष्ट्रात सुरु आहेत. त्यांना एकालाही प्रवाशी वाहतुकीचा परवाना नाही. त्यांच्या गाडीमध्ये आठ किंवा नऊ प्रवाशांची क्षमता असते. पण ते 25 ते 30 प्रवाशांची वाहतूक करतात. हे सगळे आपण उघडया डोळयांनी सारेजण पाहतो. त्याला कायद्याचे बंधन नाही. ती सगळी जी चोरटी वाहतूक चालू आहे, त्याचे हप्ते पोलीस गोळा करतात. याचे परिणाम सा-या एस.टी. महामंडळाला भोगावे लागतात. ही एस.टी. शासन अत्यावशक सेवेमध्ये आणीत आहे. त्या कर्मचा-यांनी काय करायचे? मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना सांगावे की, एस.टी.च्या कर्मचा-यांनी हे अमुक, अमुक मार्ग अवलंबिले पाहिजेत. शासन ती अवैध वाहतूक पण चालू ठेवणार आणि एस.टी. तोटयात पण जाणार आणि एस.टी.महामंडळ तोटयात गेले की, आपण सगळेजण शंख फोडतो की, एस.टी. महामंडळ तोटयात. एका बाजूला त्याची बिरुदावली काय? गांडयावर लिहिले असते. "प्रवाशांच्या सेवेसाठी", "गाव तेथे एस.टी." महाराष्ट्राने हे विसरता कामा नये.की, एस.टी. महामंडळ स्थापन झाले त्यानंतर जशा शरीरात रक्तवाहिन्या असतात तसे हे एस.टी. महामंडळ आहे. या महाराष्ट्राच्या विकासामध्ये एस.टी. महामंडळाचे प्रचंड मोठे योगदान आहे. गाव तेथे एस.टी.गेली., आपल्याला तेथे नफ मिळेल कां तोटा होईल याचा विचार केला नाही, चार-चार, पाच-पाच प्रवाशी घेऊन आदिवासी भागात एस.टी.बस जाते. त्या एस.टी.बसला पुन्हा टोल नाक्यावर टोल भरावा लागतो.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीरहित प्रत / ग्रामसूचीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

मी एक साधे उदाहरण देतो. सकाळी ठाण्याहून बोरीवलीसाठी एस.टी.ची बस निघते. कारण बोरीवलीवरुन ठाण्याला सगळया इंडस्ट्रीजमध्ये येणारे पॅसेंजर असतात. ती बस रिकामी जाते. ठाणे ते बोरीवलीच्या दरम्यानच्या काळात दोन टोलनाके लागतात. त्या ठिकाणी 100 रुपये, 50 रुपये टोल भरावा लागतो. गाडीमध्ये 5 प्रवासी असतात आणि प्रत्येकी भाडे 17 रुपये याप्रमाणे पाच प्रवाशांचे भाडे 85 रुपये होतात. म्हणजे 85 रुपये आवक आणि 100 रुपये टोल भरावा लागतो. मग एस.टी. फायद्यामध्ये कशी येईल ? या बिलामध्ये अत्यावश्यक सेवेमध्ये परिवहन सेवा सुध्दा आहे. ही जर अत्यावश्यक सेवा असेल तर त्याची जी ॲटॉनॉमी होती त्याचा विचार करावयास पाहिजे. पूर्वी ही एकमेव सेवा होती. त्यावेळी दुसरी कोणीही सेवा नव्हती. आज कायदा आणत आहात पण एस.टी. महामंडळातील युनियनने नोटीस दिलेली आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे. सुदैवाने गेल्या आठवडयामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक बोलविली होती. त्या बैठकीमध्ये मी उपस्थित होतो. सुदैवाने राज्याचे माननीय मुख्यमंत्री सुध्दा मागच्या काळात परिवहन मंत्री होते. त्यामुळे एस.टी. महामंडळाबद्दल त्यांना आत्मियता आहे. त्यांनी सांगितले की, मला यासंदर्भात माहीत आहे. म्हणून यासंदर्भात मार्ग काढत असताना या ठिकाणी आपण कसा कायदा आणत आहात ? या विधेयकामध्ये खंड 7 मध्ये बेकायदेशीर संपाबद्दल शास्ती यासंदर्भात असे म्हटले आहे की, " या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेला संप सुरु करणाऱ्या किंवा अशा कोणत्याही संपावर जाणाऱ्या किंवा राहणाऱ्या किंवा अन्य प्रकारे संपात भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यन्त असू शकेल एवढया कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील." एकदा कारावास झाला की नोकरी जाते. अत्यावश्यक सेवा कोणाच्या आहेत ? या अत्यावश्यक सेवा शासनाच्या आहेत. मग त्यामध्ये दूधपुरवठा असेल, रुग्णालयांची सेवा असेल, परिवहन सेवा असेल, या सगळया सेवा शासकीय किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सेवा आहेत. या सगळया सेवा शासकीय उपक्रमांतर्गत येतात. एखादा माणूस एकदा जेलमध्ये गेला की, त्याची कायमची नोकरी जाते. कोणालाही संप करण्याची हौस नाही. रिकंसिलिएशन करण्यासाठी आम्ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

असा कालावधी ठेऊ असे या विधेयकामध्ये कोठेही म्हटलेले नाही. त्या रिकंसिलिएशन अधिकाऱ्याला सुध्दा जबाबदार धरु असे म्हटलेले नाही. आता सुध्दा रिकंसिलिएशनची प्रोसीजर आहे. त्यामध्ये नोटीस दिली की, आयुक्त बोलावतात. कोणी चर्चा करतो तर कोणी करीत नाही. मग कंसिलिएशन फेल्ड असे म्हटले की पुन्हा संप करण्यास मोकळे होतात. सर्व औपचारिकपणे पार पाडले जाते. पण त्या दरम्यानच्या काळामध्ये ज्यावेळी त्या आयुक्तांना वाटते की, हे माझ्याकडून होणार नाही किंवा रिवॉर्ड देण्याच्या त्यांच्या सुध्दा काही मर्यादा आहेत त्यामुळे त्यांना ते देता येत नाहीत. कामगार आयुत किंवा उपायुक्त किंवा जे कोणी रिजनल लेबर कमिशनर असतात किंवा लोकल लेबर कमिशनर असतात ते त्यासंदर्भात निर्णय घेत नाहीत. ते कंसिलिएशन फेल्ड करुन पुढे जात राहतात. मग औद्योगिक न्यायालय वगैरे सर्व कोर्टबाजी सुरु होते. नंतर कोर्टातून न्याय मिळेपर्यन्त कर्मचारी हरे राम, हरे राम करीत बाहेर निघून जातो. आपण अवाजवी मागण्यांबाबत म्हटले आहे ते मान्य आहे. आम्ही काही डॉ. दत्ता सामंत नाही. म्हणून मी जाणीवपूर्वक माननीय शिवसेनाप्रमुखांचा उल्लेख केला. आम्ही एका जबाबदारीने कामगार संघटना आणि कामगार चळवळ चालवितो. आता काळच खूप बदललेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण याचे भय आता कर्मचाऱ्यांना सुध्दा वाटू लागले आहे. पूर्वी एस.टी. चा कंडक्टर कधी ओरडत नव्हता. मला आजही आठवते की, एस.टी. मध्ये शिरकाव करताना कंडक्टर पटकन बेल मारुन दरवाजा ओढून घ्यावयाचा. ते दिवस गेले. त्याला आता याची जाणीव झाली आहे. उलट तो आता या या म्हणतो. बुलढाणा जायचे आहे काय, खामगावला जायचे आहे काय असे विचारत एस.टी. स्टँडवर प्रवासी घेण्यासाठी फिरत असतो. पॅसेंजर घेण्यासाठी तडफडत असतो. एवढे तो काम करीत असतो. तुमच्या युनियनने सुध्दा महामंडळाला गाडया दिल्या. महामंडळाला तोटा आहे तर मग आम्ही आमच्या पैशातून गाडया देतो असे म्हणून त्यांनी गाडया दिल्या. एका बाजूला ही परिस्थिती आहे तर दुसऱ्या बाजूला केंद्र शासनाच्या एका नियमावलीमुळे एस.टी. महामंडळाचा 16 हजार गाडयांचा ताफा आहे त्यापेक्षा वाढवावयाचा नाही असा नियम आला. खाजगी गाडयांच्या स्पर्धेमध्ये उतरावयाचे ठरविले आहे. आता होल्वो गाडया आल्या. एस.टी. चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT

श्री. अरविंद सावंत .....

भाडे निश्चित असते. त्याला व्हेरियेशन नाही. आता मोसम आहे म्हणून भाडे वाढविले असे नसते. आत मे महिन्यात सुट्टया पडल्यानंतर खाजगी गाडयांचे लोक वाटेल तेवढे पैसे मागतील. आम्ही तुम्हाला नेतो पण 100 रुपये नाही तर 200 रुपये द्या म्हणतील. लोकही 200 रुपये देतो पण आम्हाला घेऊन चला असे म्हणतात. परंतु एस.टी. च्या बसचे तसे नसते. त्या ठिकाणी तिकीट आहे आणि तिकिटाचा दर निश्चित ठेरलेला असतो. त्या तिकिटामागे शासन साडेसतराटक्के कर घेते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.अरविंद सावंत...

प्रत्येक तिकिटामागे शासन 17.5 टक्के प्रवासी कर घेते आणि मग 17.5 टक्के करामध्ये सवलतही देत नाही, म्हणजे टोल सुध्दा आकारला जाणार, हया 17.5 टक्क्याच्या करातून आलेल्या पैशातून सरकार असे दाखविते की याच्यातील 5 टक्के पैसा कर रुपाने आला आणि त्याच्यातून एस.टी.महामंडळाला कर्ज दिले आहे आणि त्याच्यावर 6 टक्के कर आकारणी शासन करीत आहे. अशा पध्दतीने एस.टी.महामंडळाची शासन पिळवणूक करीत आहे. म्हणून मी अतिशय पोटतिडिकीने मांडत आहे. हया एस.टी.ला जगवा, ती जगणे अत्यंत महत्वाचे आहे. आपण या गाडयांना लाल डब्बा म्हणतो, ही लाल गाडी महाराष्ट्राची रक्तवाहिनी आहे. सर्वसामान्य माणसाच्या विकासाच्या मुलभूत गरजा काय आहेत, वीज, पाणी, रस्ता आणि त्या रस्त्यावरुन चालणारे वाहन. स्व.राजीव गांधी जेव्हा पंतप्रधान होते त्यावेळी त्यांच्यासोबत श्री.सॅम पित्रोडा आले होते, त्यावेळी कम्युनिकेशनची किंमत समजली. त्यांना कळले की, केवळ तीन मुलभूत गरजा नाहीत तर त्याच्यापुढे दळणवळण ही सुध्दा मुलभूत गरज आहे. त्यामुळे आज आय.टी.च्या युगात आलो आहे. हे बिल आणत असताना काही गोष्टी आपण केल्याच पाहिजेत. परंतु त्यांना जगवायचे कोणी ? तुम्ही चोरटया वाहतुकी चालू ठेवावयाच्या, गडबड चालू ठेवणार, भ्रष्टाचार चालू राहणार, त्यांचे हप्ते चालू राहणार, गाडया चालणार, हया 96 हजार गाडया कोठे आणि 16 हजार गाडया कोठे ? खाजगी बसेसना टप्प्याची वाहतूक करण्याची परवानगी नाही. त्यांना थेट मुंबई-पुणे, पुणे-कोल्हापूर अशी वाहतूक करण्याची परवानगी आहे. परंतु ते करीत आहेत, त्यांना कोण रोखतो ? त्यांचे भाडे वाटेल तसे असते. जसा हंगाम असेल तसे त्यांचे भाडे असते. आता मे महिना येत आहे त्यामुळे भाडे अधिक असते. बाकीच्या स्लॅक सिझनमध्ये पैसे कमी घेतल्यामुळे एस.टी.महामंडळाचा तोटा होतो. अशा वेळी एस.टी.च्या कर्मचा-यांनी आंदोलन केले तर या कायद्याखाली तुम्ही ते आंदोलन चिरडून काढणार, त्या कर्मचा-यांचे संसार तुम्ही उद्ध्वस्त करणार. गिरणी कामगार उद्ध्वस्त झालेलाच आहे. सुदैवाने म्हणू की दुर्दैवाने म्हणू या एस.टी.महामंडळामध्ये 100 टक्के मराठी माणूस आहे. तो तुमचा भूमिपूत्र आहे, तो जगला पाहिजे. आता हा तुम्ही कायदा आणत आहात. या कायद्यामध्ये कोणत्या अत्यावश्यक सेवा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

आहेत ? ज्या मालकातर्फे दिल्या जाणार आहेत ? त्यांच्यासंबंधी तुम्ही टाळेबंदी म्हणत आहात. कोणता असा उद्योग आहे की, त्या मालकाने टाळेबंदी केली तर ती तुम्ही मोडून काढणार आहात ? कोणती तरतूद कशासाठी केली आहे ? त्या पन्ना खटाव तुम्हाला विचारत नाहीत, सरकारला किंमत देत नाही, 50 वेळा पत्र पाठविले तरी पत्र देत नाही. तुम्ही त्या कायद्यामध्ये बदल करावा. येथे पत्रकारांनी सभागृहाच्या कामकाजासंबंधी अनुचित बातमी दिली तर सभागृहाचा विशेष हक्कभंग होतो त्यामुळे पत्रकारांना दो-या बांधून आणता तसे मालकांना दो-या बांधून आणण्याची क्षमता शासनामध्ये असावयास पाहिजे तरच त्याला महत्व आहे. ते आपण करीत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की कोणते खाजगी उद्योगधंदे आहे ते अत्यावश्यक सेवेमध्ये येणार आहेत ? त्या खाजगी उद्योगधंद्याच्या मालकांना हा कायदा लागू करु शकता ? वाहतूक हा एकमेव उद्योग आहे, भाजीपाला आणणारे, अन्नधान्य आणणारे ट्रक्स आहेत त्यांचा संप होतो तेव्हा अडचण येते. पण तो काही उद्योगधंदा नाही, हे ट्रक्स कोणीतरी भाडयाने लावलेले असतात. दूध वाहतूक करणा-या संस्था आहेत, त्या खाजगी संस्था आहेत, सहकारी संस्था आहेत. परंतु आरे संस्था ही तर शासकीय आहे. म्हणून या कायद्यामध्ये धोका आहे, कर्मचा-यांना उद्ध्वस्त करणारा आहे. या कायद्यासंबंधी आम्ही ज्या शंका विचारल्या आहेत त्यांचे निरसन झाले पाहिजे. तुम्ही अशाप्रकारचा कायदा आणत असल्यामुळे शासनाची नैतिक जबाबदारी आहे. परंतु कंसिलिएशनसाठी टाईमिंग नाही. तुम्ही एखादी नोटीस दिल्यानंतर यासंबंधीचा निर्णय इस पार या उस पास झाला पाहिजे, ही मागणी अवाजवी आहे असे तुम्ही जाहीरपणे सांगितले पाहिजे, हे असे असे मागत आहेत, आम्हाला एवढा फायदा व तोटा आहे. एवढे पैसे आहेत असे असताना सुध्दा हे कर्मचारी अवाजवी मागणी करीत आहेत. ते देता येणार नाही असे जाहीरपणे सांगितले तर लोक सुध्दा तुमच्या पाठीमागे उभे राहतील. न पेक्षा कर्मचारी सांगतील की तुम्ही चोरटया वाहतुकीला परवानगी देता, तुम्ही हप्ते घेता आणि एस.टी.महामंडळाला तोटयात आणता म्हणून लोक तुमच्या बाजूने उभे रहात नाहीत. मग सांगा एकदा, हा सूर्य हा जयद्रथ. ते स्पष्टपणे झाले पाहिजे. परंतु असे होत नाही, माझ्या हातामध्ये दंडुका आहे, नाच नाही तर तुला मारतो असा हा कायदा आहे त्याचा मी निषेध करतो आणि माझे भाषण संपवितो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा. सभापती)

पृ.शी./मु.शी.: मासिक निधी वितरणाबाबतचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005-2006 या वर्षाचे मासिक निधी वितरणाबाबतचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : मासिक निधी वितरणाबाबतचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

--

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक

L.A. BILL NO. XXVII OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNTY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये चर्चा होत असताना कोणत्या तरी एका विषयाच्या संदर्भात याठिकाणी असा उल्लेख झाला की, याच पध्दतीने हे राज्य चालू राहिले तर आणीबाणी दूर नाही. पण त्याची प्रचिती इतक्या तातडीने येईल असे वाटले नव्हते. या सभागृहामध्ये सन 2005चे वि.स.वि.क्रमांक 27- महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक आणलेले आहे. वाईट गोष्टी या नेहमी सुप्त मार्गाने येत असतात. त्यांचा चेहरा नेहमी गोंडस असतो. कोणीही भूलून जाईल आणि कोणालाही चांगला वाटेल अशा प्रकारचा तो चेहरा असतो. अत्यावश्यक सेवा चालू ठेवायला पाहिजेत. मग जो कोणी त्याच्या आडवा येईल त्याला आम्ही सोडणार नाही, अशा प्रकारे या विधेयकाची भाषा आहे. अत्यावश्यक सेवा म्हणजे काय याची व्याख्या या विधेयकाच्या पृ.क्र. 3वर केलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "संप" याचा अर्थ, कोणत्याही अत्यावश्यक सेवेत कामावर लावलेल्या व्यक्तींच्या गटाने एकत्रितपणे काम बंद करणे किंवा अशा रीतीने ज्या व्यक्ती कामावर असतील किंवा ठेवलेल्या असतील अशा कितीही व्यक्तींनी काम चालू ठेवण्यास किंवा काम स्वीकारण्यास एकविचाराने किंवा एकमताने नकार देणे, असा आहे आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होईल :-" पुढे (एक) मध्ये "कोणतीही अत्यावश्यक सेवा... असा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. This is applicable to all. पृ.क्र. 2 वरील खंड 2 मध्ये "अत्यावश्यक सेवा" याचा अर्थ - जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, उतारु किंवा माल, जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा,". मा.सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...

अरविंद सावंत हे एका संघटनेचे सरचिटणीस आहेत. त्यांनी एस.टी.महामंडळाच्या संबंधात आपले विचार मांडले. अत्यावश्यक सेवेमध्ये एस.टी.महामंडळाची परिवहन सेवा देखील आली. हे विधेयक जेव्हा मंजूर होईल त्यावेळी डबघाईस आलेल्या परिवहन सेवेतील कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी संपावर जायचे म्हटले तर या विधेयकाच्या तरतुदीमध्ये अडकून त्यांना संपावर जाता येणार नाही. आज परिवहन सेवा जी हालाखिच्या परिस्थितीमध्ये आहे त्याला अनेक कारणे आहेत. काही अंशी कामगारही त्या परिस्थितीस जबाबदार आहेत. परंतु संपूर्ण कामगार जबाबदार नाहीत. ग्रामीण भागात गावागावामधून ही लाल गाडी सेवा देते. ती सेवा देणा-या कर्मचा-यांना आपल्या न्याय मागण्यासाठी जर संप करावयाचा असेल तर अत्यावेश्यक सेवा म्हणून त्यांचा संप बेकायदेशीर ठेरेल. कारण परिवहन सेवेचा अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश केलेला आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, उतारु किंवा माल म्हणजे माथाडी, माथाडी कामगारांसाठी कायदा या सभागृहाने केलेला आहे. माथाडी कामगारांवर उद्या हे सर्व आक्रीत येणार आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दोन वर्षात तीन वेळा संप झाले. त्यातील एक संप गँगस्टरच्या छळामुळे झालेला आहे. दोन संप हे माल उतार,चढाव करणारे माथाडी कामगार आणि व्यापारी यांच्या वादामुळे झालेले आहेत. ही अत्यावश्यक सेवा यामध्ये येते. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती अतिशय सक्षम आणि समर्थ आहे. या बाजार समितीचा टर्न ओव्हर कोटयावधी रुपयांचा आहे. माथाडी कामगारांचे कंबरडे मोडून व्यापारी मोठया प्रमाणात नफा कमावितात. येथील व्यापा-यांनी सरकारी यंत्रणेला आपल्या ताब्यात घेतले आहे. तेथील माथाडी कामगारांवर अन्याय हा अजूनही होतच आहे. या माथाडी कामगारांवर जास्त अन्याय होऊ लागला तर या माथाडी कामगारांना भविष्यात संप करता येणार नाही. कारण ती अत्यावश्यक सेवा ठरणार आहे. मुंबइकडे येणारा हजारो विविध टनातील माल हा मुंबईकराच्या अत्यावश्यक सेवेमध्ये मोडतो. माथाडी कामगारांच्या माथ्यावर वरवंटा फिरविणारा हा कायदा निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा याचा देखील यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.पाण्यावरुन वाहून नेणारी परिवहन सेवा दुर्देवाने खाजगी आहे. शासनाची यासंदर्भात कोणतीही सेवा नाही. फक्त एक सेवा आहे. मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या वतीने आहे. मनोरा येथे पाण्यावरुन वाहून नेणारी सेवा आहे. ती एकमेव सेवा आहे, त्या सेवाचा देखील या कायद्यामध्ये समावेश होणार आहे. त्या सेवेमध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांना आता न्याय कोणाकडे मागता येणार नाही. राज्यात पाण्यावरुन वाहून नेणारी सेवा केंद्र सरकारची आहे. समुद्रावर टेहाळणी करणारी राज्य शासनाची पोलीस पथके आहेत त्यांना हा कायदा लागू होणार आहे. कस्टमची पथके आहेत, परंतु ते कर्मचारी केंद्र शासनाच्या अखत्यारित येतात. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय म्हणाले की, हे चांगले विधेयक आहे. आपण थोडी चर्चा करु आणि पास करुन घेऊ. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु या विधेयकामध्ये एक ज्वालामुखी लपलेला आहे. तो ज्वालामुखी भयानक आहे. या ज्वालामुखीच्या बाबतीत आमचे जेष्ठ सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार हे विचार मांडणार आहेत. त्या क्षेत्रातील त्यांना अनुभव मोठया प्रमाणात आहे. ते स्वत: कामगार नेते आहेत. त्यांनी लेबर ऑफिसर म्हणून मोठया कंपनीत काम केलेले आहे. या कायद्यातील सर्व बारकाव्यांची त्यांनाझ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माहिती आहे. या विधेयकातील खंड 2 (अ) मधील (दोन) मध्ये असे नमूद केले आहे की, जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, गॅस किंवा दूध किंवा पाणी किंवा वीज पुरवठा करण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा. सभापती महोदय, पाणी आणि दूध अत्यावश्यक सेवेत येतात याबाबतीत वर्णन करण्याची काही गरज मला वाटत नाही. मुंबई शहरात खाजगी दूध मोठया प्रमाणात येत आहे. समजा उद्या शासनाची दूध सेवा बंद झाली तर जनतेवर त्याचा काही फरक पडणार नाही. कारण दुधाची पूर्ण योजना खड्डयात घालणा-या अधिका-यांच्या बाबतीत मी सहानुभूतीने बोलावे अशातला भाग नाही. पाणी पुरवठा करणारे कर्मचारी आणि वीज पुरवठा करणारे कर्मचारी अत्यावश्यक सेवेत येतात.मुंबई महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली येणा-या बी.ई.एस.टी.चे कर्मचारी अत्यावश्यक सेवेमध्ये मोडले जाणार आहेत. पण उपनगरातील श्री.अंबानी यांच्या रिलायन्स कंपनीच्या अधिपत्याखालील सेवा यामध्ये येत नाही. ती सेवा खाजगीकरणात मोडली गेली. आज अतिशय मोठया अभिमानाने ऊर्जा मंत्र्यांनी जाहीर केले आहे की, काहीही झाले तरी वीज मंडळाचे आम्ही खाजगीकरण करणार नाही. ते शासनाच्या अधिपत्याखालीच रहाणार आहे. वीज मंडळाचे खाजगीकरण व्हावे अशी आमची वा कोणाचीही इच्छा नाही....

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.

या कर्मचा-यांना सुध्दा भविष्यामध्ये संप करण्याचा अधिकार नाही. 3. रुग्णालये,दवाखाने,सार्वजनिक आरोग्य,स्वच्छता राखण्यासंबंधातील कोणतीही सेवा. म्हणजे जिल्हा परिषदेच्या पातळीपर्यंत सर्व रुग्णालये आली,महापालिकेची आली आणि सरकारी सुध्दा त्यात आली. श्री. डायगव्हाणे यांना म्हटले की तुम्ही बिल वाचा कारण तुमच्यावर सुध्दा कु-हाड येऊ घातली आहे. या महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त खर्च शिक्षणावर होतो आणि जो या सदनातून मंजूर होतो त्याच्यावर सुध्दा आता हे बालंट आलेले आहे. त्याच्यामध्ये म्हटले आहे की,राज्याच्या कामकाजाच्या संदर्भातील कोणतीही सेवा. बिलाची व्यापकता एकेका शब्दामध्ये वाढविली आहे. म्हणजे अंगणवाडी सुध्दा आली. भाऊबीज द्या असे सांगायला त्यांना रस्त्यावर येता येणार नाही. बंदी. तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सचिवालयाच्या कर्मचा-यांच्या पदावर नियुक्त केलेले कर्मचारी. उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक. हे जर सोडले तर अडवायचे राहिले काय ? हे कमी पडले म्हणून त्याच्यामध्ये पाचवा कलम आणलेले आहे आणि ते म्हणजे स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा. लोकल सेल्फ गव्हरमेंट आले. सगळया बिलाच्या पानापानावर भाष्य करायला लागलो तर एकेक वक्ता किती तरी तास बोलू शकेल. महाराष्ट्राच्या कानाकोप-यातील विविध अशा बाबतीत बोलू शकू. अशा प्रकारची बिलामध्ये प्रचंड अशी आणिबाणी येणारी अशी दडलेली सुप्त भीती आहे. या बिलाच्या अनुरोधाने महाराष्ट्रातील कामगारांच्या हक्काला नख लावण्याचे काम करावे किंवा न करावे अशा संभ्रमीत अवस्थेत आम्ही आहोत. मालकांना काय अधिकार मिळतात याच्यापेक्षाही ठराविक क्षेत्रात असलेली,सरकारशी संबंधित असलेली लोकल सेल्फ गव्हरमेंट अशी एकही बाब नाही की जी यामधून सुटते आहे. एक गोष्ट नक्की आहे की कामगारांच्या संघटित दादागिरीपुढे झुकावे काय ? कामगारांवर अन्याय होत असेल तर त्यांना तो अधिकार आहे आणि कामगार जर संघटितपणाने अन्याय करीत असेल तर अजिबात झुकू नये. पण जनता नक्कीच सावध असते. मुंबई महानगरपालिकेचा संप हा मुंबईतील जनजीवनाचा एक चिंतेचा भाग असतो. वारंवार संप करणा-या मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना शेवटी जनतेने धडा शिकविला आणि रस्त्यावर बदडायला सुरुवात केली त्यावेळी संप बिनशर्त मागे घेण्याची पाळी बलाढय कामगार संघटनेवर आली. ज्या जनतेच्या अत्यावश्यक बाबी आहे त्यांच्यावर सोडा. यामध्ये आणखी एक मोठी भीती दिसू लागली आहे. मध्यंतरी चार पोलीस

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अधिका-यांना बॉम्ब स्फोटातील आरोपी ख्वाजा युनूस प्रकरणात चार कर्तव्यदक्ष अधिका-यांना ज्यावेळी अटक करण्यात आली....

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

त्यावेळी संतापाची लाट पोलीस अधिका-यांमध्ये उसळली होती आणि त्या बॅचच्या सर्व पोलीस अधिका-यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखवली होती.राजीनामा देऊ परंतु आता आम्ही अन्याय सहन करणार नाही असे त्यांनी सांगितले होते. शेवटी कोर्टाने या पोलीस अधिका-याला जामीन देऊन त्यांना मोक्का कायदासुध्दा लावता येणार नाही अशा प्रकारची तंबी दिली होती.त्यामुळे तो भाग बाजूला पडलेला आहे.अशाप्रकारे पोलीस खात्यातील दंडेली बाहेर पडलेली आहे. उद्देश आणि कारणांच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की," शासनाच्या तसेच स्थानिक प्राधिकारणंच्या कर्मचां-यांच्या आणि अत्यावश्यक सेवांमधील कर्मचारी वर्गाच्या न्याय्य मागण्या, समस्या व गा-हाणी यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने नेहमीच वास्तववादी आणि सहानुभूतीपूर्ण दृष्टीकोन स्वीकारला असून हे प्रश्न नेहमीच सलोख्याने व शक्यतितक्या त्वरेने सोडविण्याचा प्रयत्न केला आहे " तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी मला हे उत्तराच्या भाषणात पटवून द्यावे. आज अनेक पोलीस कर्मचारी आत्महत्या करीत असतात कामाच्या प्रचंड जाचामुळे पोलीस कर्मचारी हैराण झाले असून पोलीस समोरच्या अधिका-यावर गोळया झाडतात . या पोलिसांच्या घरात कसहीही व्यवस्था नसते,तेथे लाईट आणि पाण्याची सोय नसते. त्यांच्या राहण्याची व्यवस्था नाही.त्यांच्या मुलांची आबाळ होत असते. दुर्देवी अवस्थेत असलेल्या या पोलिसांना कोणताही आवाज उठवता येत नाही.पोलिसांना कायद्यानुसार संप करण्याचा अधिकार नाही हे सुध्दा मला मान्य आहे. जर त्यांना हा अधिकार दिला तर राज्यामध्ये शिस्त राहणार नाही. हे सुध्दा मला मान्य आहे. कर्मचा-यांच्या न्याय्य मागण्या, समस्या व गा-हाणी या बाबतीत शासनाने नेहमीच वास्तववादी आणि सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवला असल्याचे आपण म्हणता आहात परंतु वर्तमानपत्राच्या माध्यमातून माजी आयुक्त श्री.सोमण आणि इतरही माजी आयुक्तांनी पोलिसांच्या दुर्दशेची सध्याची अवस्था सांगितलेली आहे. त्यासंबंधीची कात्रणे माझ्याकडे आहेत ती कात्रणे या ठिकाणी वाचून दाखवली तर त्यामध्ये माझा आणखी एक तास वेळ जाईल.ही सर्व कात्रणे वाचून दाखविण्याची माझी इच्छा आहे. परंतु आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस असून सर्व कामकाज आपल्याला पूर्ण करावयाचे आहे.त्यामुळे मी सर्व कात्रणे वाचून दाखवत नाही. हे विधेयक जर लवकर घेतले गेले असते तर या विधेयकाची चिरफाड करता आली असती कारण हे विधेयक फार महत्वाचे आहे.अन्याय पीडित शासकीय कर्मचा-यांची दु:खद कहाणी या ठिकाणी सांगता येण्यासारखी आहे.सभापती महोदय, नर्सेसच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

युनिफॉर्मच्या बाबतीत निर्णय घेणे ही अगदीच लहानशी बाब आहे. परंतु त्याही बाबतीत निर्णय घेतला जात नाही. वर्षानुवर्षापासूनचा त्यांचा जो युनिफॉर्म आहे तो बदलण्यात यावा अशी त्याची मागणी आहे. त्या मागणीची कारणमिंमासा मी या ठिकाणी सांगू इच्छित नाही.परंतु सर्व अंग झाकले जाईल अशा प्रकारचा पंजाबी ड्रेस द्यावा अशी त्यांची मागणी असून गेल्या दोन तीन वर्षापासून त्यांनी ही मागणी लावून धरली आहे.परंतु ती मागणीसुध्दा मान्य केली जात नाही.ही मागणी का मान्य होऊ शकत नाही ? तर त्या ड्रेसचा रंग कोणता असावा हे निश्चित होत नाही.या युनिफॉर्मचा रंग गुलाबी असावा की सफेद असावा यावर गेल्या तीन वर्षापासून घोळ घातला जात आहे.आपल्याला गुलाबी रंग निश्चित करावयाचा असेल तर गुलाबी रंग निश्चित करावा. रुग्णांची सेवा करीत असतांना युनिफॉर्म आटोपशीर असावा अशी त्या नर्सेसची यामागची भावना आहे. ड्रेस कसा असावा हे सांगण्या मागचा त्यांचा जो उद्देश आहे तो फार महत्वाचा आहे. याबाबतीत युनियन बरोबर चर्चा झाली होती.परंतु रंगाच्या बाबतीत अजूनही निर्णय होत नाही. या विधेयकाच्या उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की, "कर्मचा-यांच्या मागण्या, गा-हाणे, समस्या या बाबतीत महाराष्ट्र शासन नेहमीच वास्तववादी आणि सहानुभूतीची भूमिका घेत असते."तेव्हा या नर्सेसच्या बाबतीत आपण अशा प्रकारची भूमिका घेतलेली आहे काय ? युनिफॉर्मच्या मागणीसाठी या नर्सेसने संपावर जाण्याचे ठरविले तर या विधेयकामुळे त्यांच्यावर बंदी आणली गेली आहे पोलिसांची सुध्दा हीच अवस्था आहे.महाराष्ट्र राज्यामध्ये डॉक्टर्सची कमतरता किती आहे. हे मी सांगावयास नको.त्यातून डॉक्टरांचे विविध प्रश्न निर्माण होत असतात. कुपोषणाचा प्रश्न डॉक्टरांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेला आहे. अनेक भागात डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध नाहीत. कुपोषणाच्या प्रश्नाबाबत मी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्याबरोबर चर्चा करीत असतो व त्यांना मी नेहमी विचारत असतो की डॉक्टरांची कमतरता का आहे? डॉक्टर्स का मिळत नाहीत ? तेव्हा मला असे समजले की, हे शासन डॉक्टर्सना हमी देत नाही.डॉक्टरांचे असे म्हणणे आहे की, त्या भागातील रुग्णांची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहे व आम्ही त्या भागात जाऊ परंतु एखाद्या डॉक्टरवर राग असेल तर त्याला दुर्गम भागात पाठवले जाते आणि त्याची तेथून बदली केली जात नाही.त्याला मुद्दाम तेथेच ठेवण्यात येते. त्यामुळे हा डॉक्टर रजेवर जातो अशा प्रकारे डॉक्टरांना शिक्षा दिली जाते. डॉक्टरांचे असे म्हणणे आहे की , एक एक वर्षासाठी जर डॉक्टरांना ग्रामीण वा

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

दुर्गम भागात पाठविले तर ते चांगल्याप्रकारे काम करु शकतील. एक वर्ष झाल्यानंतर त्याच्या ट्रान्सफरची ऑर्डर त्यांच्या हातात दिली गेली पाहिजे. त्यातून कुपोषणाच्या प्रश्नाला काही अंशी फरक पडू शकेल परंतु. तसे न करता अडेलतट्टुपणा दाखविला जातो. हीच शासानाची सहानुभूतीची आणि वास्तववादी भूमिका आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

आणि मग त्या लोकांना संप करावयाचा असेल तर या विधेयकातील तरतुदीनुसार त्यांना संप करता येणार नाही कारण अत्यावश्यक सेवा या खाली त्याला बंदी करता येणार आहे. म्हणूनच हे विधेयक आता स्थगित करून पावसाळी अधिवेशनामध्ये अधिक चर्चेसाठी घ्यावे किंवा संयुक्त समितीकडे अधिक विचारार्थ पाठवावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. अन्यथा आम्हाला या विधेयकाला विरोध करणे भाग पडेल. सभापती महोदय, खरे तर या विधेयकावर मला खूप काही बोलता येण्यासारखे आहे आणि मला बोलावयाचे देखील होते. पण तरीही मी विनंती इतकीच करतो आहे की, हे विधेयक आपण संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवावे .... माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण अपक्ष आहात. जरूर आपण मंत्रिमंडळाचे सदस्य असलात तरी आपण अपक्ष म्हणूनच आहात. ...

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते वेळोवेळी अशा प्रकारचा उल्लेख करीत आहेत. पण मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी संसदीय कार्यमंत्री म्हणून उपस्थित आहे आणि मी अपक्ष आमदार असलो तरी लोकशाही आघाडी सरकार पुरस्कृत आहे हे आपण लक्षात घ्यावे. तेव्हा आपण या विधेयकावर भाषण करीत असताना, अत्यावश्यक सेवांसंबंधीच्या विधेयकावर भाषण करीत असताना उल्लेख मात्र वेगळाच करीत आहात. तेव्हा तुमच्या अत्यावश्यक सेवा कोणत्या हे तरी आम्हाला कळू द्यात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी आपण कोण आहोत ते येथे सांगितले हे बरे झाले. परंतु आमच्या धर्माप्रमाणे सावित्री एकच टिळा लावते, पण ते दोन टिळे लावतात हे आम्हाला आताच कळले. ...

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही जेथे असतो तेथे आम्ही प्रामाणिकच असतो. वेळोवेळी बदल करणाऱ्यातील आम्ही नाही. तेव्हा या अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी अत्यावश्यक सेवांसंबंधातील हे विधेयक आपल्याला येथे मान्य करावयाचे आहे. असे असताना आपण अशा प्रकारे बोलून वेळ वाया घालविण्याची गरज आहे का ?

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मेण आणि कुंकू`हे दोन्ही एकत्र लावले तरच ते कपाळावर टिकते. मेणाशिवाय ते लावताच येत नाही.

..... वायवाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हे का सांगत होतो तर या विधेयकावर पूर्णपणे चर्चा होण्याची गरज आहे. हे अत्यंत महत्त्वाचे असे विधेयक आहे. यावर सखोल विचार विनिमय न करता हे विधेयक असेच संमत केले तर यामुळे सेवाभावी, सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार आहे. कोणत्याही कर्मचाऱ्यांना आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत आवाज उठविता येणार नाही, आणि त्याची तड लागणार नाही. तेव्हा त्या पापाचे आम्ही धनी होऊ इच्छित नाही. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे यांनाही मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपणही आमच्याशी या बाबतीत सहमत व्हाल. कारण शेवटी कष्टकरी कामगाराच्या न्याय मागण्यांसाठी हे होणे आवश्यक आहे. तेव्हा मी नम्रतेने पुन्हा एकदा शासनाला सांगू इच्छितो की, आपण हे विधेयक आता मागे घेऊन संयुक्त समितीकडे अधिक विचारार्थ सोपवावे. अन्यथा आम्हाला याला विरोध करावा लागेल. कामगारांच्या, कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्काला नख लावण्याचे पाप आम्ही करू इच्छित नाही.

*****

..... वायवाय 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, लोकशाहीमध्ये मुलभूत अधिकाराची पायमल्ली कशी होते हे या ठिकाणी दिसून येत आहे. या सदनामध्ये माननीय मंत्री महोदय सारखे आम्हाला आग्रह करीत आहेत की, हे विधेयक संमत करावे म्हणून. सभापती महोदय, आपणा प्रत्येकाला माहिती आहे की, प्रत्येकाला अधिकार आहेत. आपल्याला एखादी गोष्ट आवडली नाही तर आपण उठून उभे राहतो, प्रसंगी सभापती महोदय आम्ही आपल्यापुढे गलका करतो, 'वेल'मध्ये जातो. तेव्हा व्यक्ती स्वातंत्र्यासाठी आवाज उठविणे यावर गदा आणली जाणार असेल तर मग त्याला 'जुलूमशाही' हाच शब्द योग्य होतो. कारण प्रत्येकाला, आपल्याला ज्या मुलभूत गोष्टी हव्या आहेत त्यासाठी भांडण्याचा अधिकार आहे, त्यासाठी आवश्यक तर संप करण्याचा देखील अधिकार आहे. माझे म्हणणे आपल्या समोर मांडण्याचा हक्क प्रत्येकालाच आहे. ....

(यानंतर श्री. जागडे ..... झेडझेड 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

निवेदन देऊनही कामगारांचे म्हणणे मान्य होणार नसेल तर त्यांना धरणे धरावे लागते, संप करावा लागतो. आता संप करण्याचा मुलभूत अधिकार सरकार काढून घेणार असेल तर यापेक्षा या शासनाची दुसरी अधोगती कोणतीच असू शकणार नाही. सभापती महोदय, अत्यावश्यक सेवेमध्ये अनेक गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. दूध, पाणी, वीज यांचा अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश करण्यात आला आहे. आता यामधील कोणतीही सेवा खंडीत होणार असेल तर शासनाने त्या बाबतची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. शासन आपल्या कर्तव्यापासून मात्र यामुळे दूर जात आहे. दूध पूरवठा करणे, पाणी पूरवठा करणे, तसेच वीज देणे हे शासनाचेच काम आहे. आता या गोष्टी लोकांना ज्यावेळी मिळणार नसतील त्यावेळी पर्यायी व्यवस्था शासनाने करणे गरजेचे आहे. म्हणून अशा प्रकारचा कायदा करुन या ठिकाणी जे लोक काम करीत आहेत, त्यांच्यावर नितीमुल्याचा बडगा उगारणे योग्य होणार नाही.

सभापती महोदय, परवा जे. जे. हॉस्पीटलमधील डॉक्टरांनी संप केला होता. त्यांचे अनेक वर्षापासून पेमेंट तितकेच होते. त्यांना राहावयाला जी रुम दिली होती, त्यामध्ये स्वच्छता नव्हती. त्या ठिकाणी उंदीर आणि घुशी सर्वत्र फिरत होत्या. आता यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी लाक्षणिक संप करु नये काय ? नाहीतर त्यांनी शासनाचे लक्ष कसे वेधावयाचे ? त्यांनी डीन तसेच मंत्रिमहोदयांनी आपले निवेदन केले होते. त्या निवेदनाच्या माध्यमातून त्यांनी आपले म्हणणे अगोदर मांडले होते. नैसर्गिक आपत्ती जेव्हा जेव्हा येत असते, तेव्हा हे डॉक्टर्स वेळेचे बंधन पाळत नाही. बॉम्बस्फोट होतात आणि लोक जखमी होतात, तेव्हा त्यांची सतत सेवा हे डॉक्टर्स करीत असतात. परंतु त्यांनी आपली मते मांडू नये काय ? त्यांना न्याय मिळू नये काय ? निवेदन देऊनही मागणी मान्य केली जात नाही, तेव्हा कोणताही माणूस संपाचे हत्यार उगारत असतो. सभापती महोदय, पाणी खात्यात काम करणा-या माणसाला, दूध पुरवठा विभागात काम करणा-या माणसाला, डॉक्टरांना याची सर्व जाणीव आहे. आपण जर संपावर गेलो तर काय होईल, याची त्यांना कल्पना आहे. या सर्व लोकांकडे सदसदविवेक बुध्दी आहे. आपण जर पाण्याचा नळ सोडला नाही तर कोणालाच पाणी मिळणार नाही. इतरांना जसे पाणी मिळणार नाही, असे आपल्या घरातही पाणी येणार नाही. म्हणून सभागृहासमोर जे विधेयक चर्चेला आले आहे, ते अतिशय वाईट विधेयक आहे. लोकांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणारे हे विधेयक आहे. या विधेयकात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

शिक्षेबाबत जी तरतूद केली आहे, ती तर अतिशय वाईट आहे. संप करणारा माणूस आणि त्याला उद्युक्त करणा-या माणसाला शिक्षा सूचविली आहे. एक वर्षाची कारावासाची शिक्षा आणि 2 हजार रुपये दंडाची शिक्षा सूचविण्यात आली आहे. अशा प्रकारे संप करणा-या कामगारांना ही शिक्षा भोगावी लागणार आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आता असे सांगितले आहे की, बाहेरच्या राज्यात अशा प्रकारचा कायदा आहे. असे असले तरी आपले राज्य हे प्रगत राज्य आहे. त्यामुळे राज्यात अशा प्रकारचा जुलमी कायदा माननीय मंत्रिमहोदयांनी आणू नये. अशी माझी शासनाला विनंती आहे.

(यानंतर श्री.सरफरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

"फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करता येईल" "या अधिनियमाखालील सर्व अपराध जामीनयोग्य नसतील". सभापती महोदय, अशाप्रकारे आपल्या मूलभूत अधिकारावर गदा आणणारे हे विधेयक आहे. यामुळे कामगार वर्गामध्ये प्रचंड असंतोष निर्माण होईल. हे विधेयक जर संमत झाले तर आपण एका ज्वालामुखीच्या उंबरठयावर उभे आहोत असे वाटते. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे, व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी विनंती केली तिचा पुनरुच्चार करतो की हे विधेयक आपण संयुक्त समितीकडे पाठवावे. त्या समितीमध्ये या विधेयकावर सांगोपांग विचार करावा, त्या ठिकाणी साधक बाधक चर्चा व्हावी. आणि त्यानंतर पुन्हा या सदनामध्ये हे विधेयक आणावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता हे सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27 या सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मालक, व्यवस्थापक, शासन आणि प्रशासन जेव्हा एमबीए म्हणजे "मूक, बहिरे आणि आंधळे" होते तेव्हा संप हे शेवटचे हत्यार कामगार उगारतात. केवळ हौस किंवा मौजमजा म्हणून संपाचे हत्यार कामगार उगारीत नाहीत हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. संप करण्याचा हक्क आपल्या देशातील किंवा राज्यातील कोणत्याही कामगाराला असला, कोणत्याही समाजाला, समूहाला असला तरी आपल्या हक्कासाठी लढण्यासाठी संसदीय मार्गाने संघर्ष करण्याचे देशाच्या संविधानाने त्याला पारीत केले आहे. असे असतांना देखील संप हे कामगारांचे शेवटचे शस्त्र आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर कामगारांच्या अधिकाराचा ते प्राणवायू आहे. आणि जर आपण ते काढून घेण्याचा प्रयत्न केला तर कामगार चळवळीवर, कामगारांवर व शोषित, पिडीत कामगार आहे त्याच्यावर मोठा अन्याय होईल. अत्यावश्यक सेवेमध्ये ज्या 1,2,3,4,5,6 बाबींचा समावेश करण्यात आला त्याचा उल्लेख करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. या सहा बाबींचा अत्यावश्यक सेवेत समावेश करतांना त्याचा जो अर्थ सांगितला आहे त्या पलिकडे जाऊन राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे अत्यावश्यक सेवा असल्याचे जाहीर करील. राज्य सरकारला वाटेल ती सेवा अत्यावश्यक म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आपण राखून ठेवला आहे. ही महत्वाची बाब आहे. म्हणून आपण अलिकडे पहातो की, केवळ सरकारी किंवा निम सरकारी क्षेत्रातील सेवा आहे त्या संदर्भात संप व टाळेबंदीसाठी हे विधेयक आहे. परंतु अलिकडच्या काळात एलपीजीची पॉलिसी आली, लिबरलायझेशन, प्रायव्हेटायझेशन, ग्लोबलायझेशन म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण आले आहे तेव्हापासून आपल्या राज्यात व देशात खाजगीकरणाच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रात अनेक प्रकारच्या अत्यावश्यक सेवा खाजगी क्षेत्राला प्रदान करण्यात आल्या. त्याबाबत माननीय सदस्य श्री. रावते यांनी अंबानीच्या विद्युत कंपनीचा उल्लेख केला. या खाजगी क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत येणाऱ्या ज्या सेवा आहेत त्यांचा उल्लेख यामध्ये केला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

पण खाजगी क्षेत्रात ज्या अत्यावश्यक सेवा सरकारने प्रदान केल्या आहेत, त्यांना अधिकार दिलेले आहेत, त्याबद्दल कोणत्याही प्रकारचा यामध्ये उल्लेख नाही. सभापती महोदय, मी आपला जास्त वेळ घेत नाही. पण कामगारांच्या हिताचा विचार करुन, कारण आपले प्रागतिक असे सरकार आहे. सामाजिक न्यायाच्या गोष्टी बोलल्या जातात, अशा वेळी संपाचे हत्यार हिसकावून घेऊन त्याला नि:शस्त्र करणे योग्य नाही. एका कमजोर माणसाकडे हे जे शेवटचे संपाचे हत्यार आहे, ते देखील हिसकावून घेऊन त्याला नि:शस्त्र करण्याचा प्रयत्न झाला तर या कमजोर माणसावर फार अन्याय होईल. या दृष्टीकोनातून आमचे सरकार, माननीय मंत्री महोदय विचार करेल असा मला विश्वास वाटतो. एवढेच मला यासंदर्भात सांगावयाचे आहे.

. . . .3 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापूरे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, खरे म्हणजे आज शनिवार असल्याने, घरी जाण्याच्या घाईत असताना मी हे विधेयक वाचले. पण सुरुवातीला मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांचे आभार मानतो. कारण त्यांनी मला हे विधेयक वाचावयास सांगितले आणि मी ते जसे वाचावयास लागलो तसे जॉर्ज बरवर यांच्या "ॲनिमल फर्म" या कादंबरीची आठवण झाली. लोकशाही पध्दतीने लोकशाहीचा खून किती सुंदर पध्दतीने करता येतो किंवा लोकशाही विडंबन कसे चांगल्या प्रकारे करता येते याचे उत्कृष्ट वर्णन "ॲनिमल फर्म" या कादंबरीत आहे. हा तसा सोपा कायदा नाही, तर तो सर्वंकष कायदा आहे. या कायद्याने आपण भारतातील एका सिस्टीमला धक्का पोहोचवित आहात. कोणतीही संघटना उठसूठ संप करीत नाही हे आपण सर्वांनी सांगितले आहे. तर संप करण्यापूर्वी सभासदांमध्ये खूप चर्चा होते, पुढे काय होईल याचा विचार केला जातो आणि जेव्हा नाईलाज होतो, तेव्हाच कोणताही कामगार संपाचे हत्यार उचलतो. मघाशी येथे मांडण्यात आलेले विधेयक आणि आताचे विधेयक, ही दोन्ही विधेयके आताच्या शासनाच्या मन:स्थितीचे निदर्शक आहेत असे मी मानतो. आपल्या कारभारात कोणाचा अडथळा नको, मग अडथळा येणा-या कोणत्याही संभाव्य गोष्टींचा अगोदरच बिमोड करण्याचा जो प्रकार आहे, तो येथे चालू आहे आणि ते बरोबर नाही. कारण लोकशाही ही जीवन पध्दती आहे, तसेच ती समाज पध्दती आहे, तसेच राजकीय पध्दती आहे. लोकशाहीमध्ये मतभेद असूनही एकत्र कारभार करण्याचे मुलभूत तत्वाचे वर्णन केलेले आहे आणि लोकशाहीने त्याचे वर्णनही अतिशय पावित्र्याने गायलेले आहे. एडमण्ड बर्गपासून जेफरसन्पर्यंत आणि आपल्या देशातील कै.नाथ पै पर्यंत सगळयांनी लोकशाहीचे कौतुक करताना या गोष्टी मान्य केल्या आहेत. कामगार हा समाजाचा एक भाग आहे. मग तो गिरणीतील असेल, शासकीय सेवेतील असेल किंवा अन्य मंडळातील असेल. लोकशाहीतील सरकार त्या सर्वांना घेऊन जन्माला येते. लोकशाहीतील सरकार हे केवळ सरकार निर्माण झाले म्हणून या लोकांपासून अलिप्त राहू शकत नाही. तर जनतेच्या हिताच्यादृष्टीनेच त्यांनी सर्व विचार केला पाहिजे. जर जनता आपल्या विरोधात जात असेल तर आपले कुठेतरी चुकत आहे असा विचार करण्याची मन:स्थिती लोकशाहीमध्ये राज्यकर्त्यांची असली पाहिजे. यात असे म्हटले आहे की, काही वेळेला अव्यवहार्य मार्गाचा लोक अवलंब करतात. ठीक आहे. अपवाद असू शकतात. एखादा हट्टी माणूस असू शकेल.पण तो अपवाद आहे. या देशात झालेले सर्व संप अतिशय चुकीच्या पध्दतीने झाले असे म्हणता येणार

. . . .3 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापूरे . . . .

नाही, असा इतिहास नाही. आपल्या देशातील पूर्वीच्या अनेक नेत्यांनी संपासारखे हत्यार हे आवश्यक बाब आणि एक पवित्र हक्क असल्याचे मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या एका पुरोगामी, कल्याणकारी राज्यामध्ये कोणत्याही स्तरावरील कामगार असला तरी त्याचा संपाचा हक्क काढून घेणे म्हणजे ही पापी गोष्ट आहे, चुकीची गोष्ट आहे, अनैतिक गोष्ट आहे. असा विचार सुध्दा मनात आणणे म्हणजे it is immoral thing आणि immoral thing करण्यासाठी फार विचार करावा लागत नाही. तो फार सोपा मार्ग वाटतो. हुकूमशाहीचा मार्ग स्विकारताना फार सोपे वाटते पण जगातील सर्व हुकूमशहांचा इतिहास पाहिला तर त्यांनीच निर्माण केलेल्या, स्वत:साठी आखलेल्या नवीन रस्त्यावर त्यांचा अंत झालेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल. ऐनापुरे (पुढे चालू....

कदाचित या कामगार विरोधी कायद्यामुळे या सरकारचा अंत होण्याची शक्यता आहे. आम्हीच नीट वाचलेले नव्हते, महाराष्ट्रातील जनतेने ते नीट वाचलेले असेल की नाही याची शंका आहे. कारण मनातच अशा गोष्टी येणे, हेच मुळामध्ये अतिशय चुकीचे आहे, लोकशाही विरोधी आहे. जनतेच्या सुखसोयीसाठी सर्वंकष अधिकार शासनाला असावेत, हा मुळातच चुकीचा विचार आहे. हा विचार हुकूमशहासारख्या माणसामध्ये, हिटलरसारख्या माणसामध्ये किंवा मुसोलिनीसारख्या माणसाच्या डोक्यात आला तर ते आम्ही समजू शकतो. परंतु लोकशाहीच्या मार्गाने सत्तेवर आलेल्या सरकारच्या डोक्यात हा विचार येणे. अतिशय व्यवस्थितपणे कायदा करण्यासाठी येथे आणणे, ही गोष्ट योग्य झालेली आहे, असे मला वाटत नाही. सरकारने हा मार्गच स्वीकारण्यास तयार होऊ नये, असा प्रसंगच त्यांच्यावर येऊ नये,असे मला वाटते. हुकूमशाहीकडे नेणारा, लोकशाहीच्या मार्गाने सरकारने स्वीकारलेला हा मार्ग ताबडतोब अव्हेर करावा. संपाचा अधिकार हा पवित्र अधिकार आहे. अन्यायाविरूध्द अनेक पध्दतीने मागण्या मांडल्यानंतर, आपला आवाज उठवल्यानंतर नाईलाज होतो, त्याचवेळी दुबळा माणूस संपावर उतरतो. संपावर सशक्त संघटना उतरत नाही. ते आपल्या ताकदीच्या जोरावर सगळ्या मागण्या मान्य करून घेऊ शकतात. महात्मा गांधींनी म्हटलेले आहे की, दुबळा माणूस स्वातंत्र्याचा अधिकार मागतो आहे. त्यावेळेला त्यांनी सत्त्यागृह, असहकार हे धोरण स्वीकारले, त्या मागे फार मोठे तत्वज्ञान,विचार दडलेला होता. ज्यामुळे लढाई करून आपल्याला काही मिळणार नाही, आपण त्या पात्रतेचे नाही, म्हणून त्यांनी हे दोन मार्ग स्वीकारले. अहिंसेचा मार्ग स्वीकारला आणि स्वातंत्र्य मिळविण्याची घोषणा केली. हा महात्मा गांधींचा विचार आपल्या विरोधात आहे, हे माहीत असून देखील ब्रिटिशांनी त्यांना कधी गोळी घातली नाही. त्यांनी देखील ते सगळे सहन केले, एवढा मोठा देश, एवढा भूभाग सोडून जायचे, सोन्याची भूमी सोडून जायची हे त्यांनी पत्करले, परंतु त्यांनी महात्मा गांधींना गोळ्या घातल्या नाहीत. तरीसुध्दा हा मतभेदाचा मुद्दा त्यांनी मान्य केला आणि शेवटपर्यन्त वाटाघाटीनेच सगळे प्रश्न सोडवत राहिले. आज शासनाचा भाग असलेल्या कोणत्याही व्यवस्थेमधील सेवक संप करण्याचा अधिकार मागतात, त्या सगळ्यांशी चर्चा करून त्यांच्या भावभावनांशी, त्यांच्या मागण्यांशी एकरूप होऊन त्यांच्याशी जर सुसंवाद साधता आला तर ते कधीही संपावर उतरणार नाहीत. कोणतेही शासन चांगले असेल तर चांगल्या शासनाला संपाची भीती कधी वाटत नाही. ज्या शासनाने चुका केलेल्या आहेत, ज्या शासनाची मनो-प्रवृत्ती गिल्टी आहे, ज्या शासनात असलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे (पुढे चालू.....

माणसे ही अपराधित्वाने पछाडलेली आहेत, काही तरी लवकर मिळविण्याच्या सोप्यात सोप्या मार्गाला लागलेली माणसे शासनामध्ये असली तर मग त्यांना या विधेयकाची गरज वाटते. हा एक प्रकारचा आपल्या लोकशाहीमधील पराभव आहे. निवडणुकीला उभे रहाणाऱ्या प्रत्येक माणसाचे एकप्रकारचे ट्रेनिंग झाले पाहिजे. लोकशाहीमध्ये काही पवित्र भावना आहेत, काही तत्त्व आहेत, त्या तत्त्वांचे पालन 'माझा जीव केला तरी मी करेन'.... इंग्लंडच्या पार्लमेंटच्या दरवाजावर एकाने सांगितले ते लिहिलेले आहे की, "तुझे म्हणणे एक मिनिट पटत नसले तरीसुध्दा तुला बोलण्याचा आणि माझ्यापासून मतभेद व्यक्त करण्याचा जन्मसिध्द अधिकार आहे, यासाठी मी जीव सुध्दा द्यायला तयार आहे." ते वाक्य आज घोष वाक्य झाल्यासारखे झालेले आहे. जगातील अनेक देशामध्ये लोकशाहीचे वर्णन करतांना, नेहमी याचे वर्णन करून सांगितले जाते. आम्ही आज शाळा-कॉलेजेसमधून पॉलिटिक्स, नागरिकशास्त्र शिकवितांना याचा उद्घोष करीत रहातो, लोकशाहीचे पावित्र्य सांगत रहातो. अशा या लोकशाहीमध्ये एका दुबळ्या घटकाला ताकतीच्या जोरावर चिरडणे ही गोष्ट केव्हाही योग्य होणार नाही, ही प्रवृत्तीच मुळामध्ये वाईट आहे. मी पुन्हा पुन्हा 'इर्मोरल" आहे, असा शब्द वापरतो. ' इर्मोरल' या शब्दचा अर्थ दुसरा न घेता लोकशाहीच्या अर्थाने घ्यावा. 'मॉरल' म्हणजे लोकशाहीला पुरक असलेली मनोवृत्ती यालाच 'मॉरल माईंड' म्हणता येईल आणि लोकशाहीला मारक असलेली मनोवृत्ती त्याला 'इर्मोरल ॲटीट्युड', असे म्हणता येईल. त्या पध्दतीने अर्थ घेतला तर शासनाच्या मनात विचार येणे अतिशय चुकीचे आहे, शासनाने जरूर याचा विचार करावा.

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापुरे...

याच्याबरोबरच मी पुन्हा आणखी एक गोष्ट सांगतो की, हुकुमशाही प्रवृत्तीच्या विरुध्द जेव्हा प्रतिक्रिया येते, तेव्हा ही क्रिया जेवढया फोर्सने येते तेवढीच प्रतिक्रिया उलट फोर्सने येते. कामगार विरोधी कायदे करुन कामगारांना दडपण्याचे जेवढे जोरदार प्रयत्न होतात तेवढाच विरोध कामगार करतात. पण हे कामगार म्हणजे आपले शत्रू नाहीत. ते या समाजाचाच एक भाग आहेत. जसे शासन समाज चालविण्यासाठी समाजाच्या सोयीसाठी, समाजाच्या हितासाठी ,समाजाच्या कल्याणसाठी जे जे करते असा दावा करते, कामगार सुध्दा तेच करतात. ते घोषणा करीत नसतील, पण त्यांचा प्रत्येक तास हा समाजाच्या हितासाठीच कुठेनाकुठे तरी खर्ची पडत असतो.त्यातूनच त्याचा उदरनिर्वाहही होत असतो. हे जरी खरे असले तरी उदरनिर्वाह करणे एवढाच त्यांचा उद्देश नसतो, ते काम करीत असतांना आपण कुणाची तरी सेवा करतो, अशा भावनेतून ते काम करीत असतात. ही भावना वाढीला लावणे, राष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लावणे, याच्याऐवजी भेदाभेद निर्माण करुन,तिरस्काराची, मत्सराची आणि दडपशाहीची भिती त्यांच्यात निर्माण करुन, अशी दुबळी माणसे निर्माण करुन कधी देश समर्थ झालेला नाही. आणि होत नाही. हे मागच्या दत्ता सामंताच्या संपामध्ये महाराष्ट्र शासनाने अनुभवलेले आहे आणि. मी ही वाचलेले आहे.ज्यावेळी श्री. दत्ता सामंत सांगत होते की,संप करणार त्यावेळी शासन इतके दुबळयासारखे वागले, इतके खुळयासारखे वागले की, त्यांना शासन म्हणता येणार नाही. सबंध कामगार देशोधडीला लागला, तरी या शासनाने वर्तमानपत्रात मुलाखती देण्याशिवाय काहीही केलेले नाही. हे शासनाचे पापच आहे. त्यावेळी जे कोणी सत्ताधिकारी होते त्यांनी हा कामगारांशी केलेला द्रोह आहे. त्यांनी चूक केलेली आहे.श्री. दत्ता सामंतांना नाव ठेवून चालत नाही. तो त्यांच्या पध्दतीने गेला. शासनाला अपल्या पध्दतीने जाता आले असते.पण शासन आपल्या पध्दतीने गेले नाही. त्यामुळे आज कामगार आपल्या खोल्या विकून गावी जाऊन बसलेले आहेत. त्याला खायला अन्न नाही, आणि त्याला शेतीची वगैरे कामेही येत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये आजच्या शासनला जरी वाटत असेल की, आम्ही भल्यासाठी करीत आहोत. तरी एकदा केल्यानंतर ते तुमच्याच हातात राहील असे नाही. कदाचित तुमच्यापेक्षा विचित्र पध्दतीने वागणारा माणूस जर आला आणि त्याने याचा गैरवापर करायचे ठरविले तर या महाराष्ट्रातील कामगारांची परिस्थिती काय होईल?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापुरे...

हिटलरसुध्दा लोकशाहीच्या पध्दतीनेच हुकुमशहा बनलेला आहे. हिटलर जन्माला आल्यानंतर एकदम हुकुमशहा झालेला नाही. लोकशाहीच्याच पध्दतीने त्याने हुकुमशाही राबविली. आणि ती लोकांना पटवून राबविली. कदाचित उद्या एखादा हिटलरसारखा या महाराष्ट्र शासनात येणार नाही याची गॅरंटी आपण देऊ शकता काय? आपण आज शासनकर्ते आहात. कदाचित उद्याच्या कालखंडात असे होऊ नये. पण उद्याच्या कालखंडामध्ये कदाचित तुमच्या विरोधी विचाराचे सरकार आले आणि त्यावेळी तुम्हाला असे वाटले की, संप करावा, तर तुमचाच कायदा तुमच्या नरडीचा घोट घेईल. त्यावेळी तुमचा संकोच करील. त्यावेळी तुम्हाला वाटेल की, हा कायदा नको होता. स्वार्थापुतरा, सोयीपुरता कायदा वापरण्याची कला ही शासनाला योग्य वाटत नाही. म्हणून मी मुद्दाम माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, शासनाने हा कायदा मागे घ्यावा. अन्यथा संयुक्त समितीकडे तो पाठवावा, अन्यथा घाईघाईने हा कायदा पास करुन कामगार विरोधी अगदी महात्मा गांधीचे तत्वज्ञान सांगणा-या लोकांनी सुध्दा गांधींच्या तत्वज्ञानाच्या विरुध्द जाऊन लोकशाहीचे नांव घेऊन सत्तेवर आलेल्या लोकांनी सुध्दा लोकशाहीचे विरोधक अशा पध्दतीची भूमिका घेऊ नये, एवढीच मी विनंती करतो. धन्यवाद.

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सन्मानीय सभापती महोदय, सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 27. कामगार विषयक विधेयकावर या सदनामध्ये चर्चा चालू आहे. आमच्या सर्व सन्माननीय सहकारी आमदार या विषयावर बोलत असतांना माझे सहज लक्ष माझ्या उजव्या बाजूला गेले. त्याठिकाणी भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तसबीर लावलेली आहे. पाठिमागे पाहिले तर लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांची तसबीर लावलेली आहे. त्यानंतर महात्मा गांधीजींची तसबीर आहे. महत्मा ज्योतिबा फुलेची तसबीर आहे. या विधेयकावर चर्चा चाललेली असतांना श्री. कवाडे साहेब आपण बारकाईने बघितले तर डॉ. आंबेडकरांच्या डोळयात तुम्हाला अश्रू दिसतील. आपण जरा -नीट तपासून बघा.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

आपण महाराष्ट्रामध्ये काय करीत आहात ? आपण या ठिकाणी हे विधेयक कशासाठी आणले आहे ? याचा उद्देश काय आहे ? कोणाला चिरडण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे याचा साधा विचारही कोणी केलेला दिसत नाही. सभापती महोदय, महाराष्ट्रासारख्या या प्रगत राज्यामध्ये असे विधेयक यावे की ज्यामुळे एक संपूर्ण कामगारवर्ग चिरडला जाणार आहे. अशा प्रकारचे हे विधेयक आहे. त्याला जगण्याचा अधिकारच नाकारलेला आहे. जगावयाचे असेल तर गुलामासारखे जगा, आम्ही म्हणतो तसे जगा नाही तर तुम्हाला जगण्याचा अधिकार नाही असाच या विधेयकाचा अर्थ आहे. त्यामुळे माझ्या मनामध्ये असा विचार आला की, खरोखर आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहोत की, अधोगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहोत ? याचा जर प्रामाणिकपणे विचार केला आणि हे विधेयक या ठिकाणी आणण्याचे उद्देश आणि कारणे हे दोन्ही तपासून पाहिले तर एक गोष्ट लक्षात येते की, या शासनाला मनातून कामगारवर्गाबद्दल भीती वाटते. आज सगळा कामगारवर्ग उध्वस्त झालेला आहे. लाखो गिरणी कामगार उध्वस्त झालेले आहेत. लाखोच्या संख्येने इंजिनिअरींगमधील कामगार उध्वस्त झालेले आहेत. फार्मास्युटीकल कंपनीतील कामगार उध्वस्त झालेले आहेत. प्रत्येक क्षेत्रात काम करणारा कामगार आज उध्वस्त झालेला आहे. बाहेर कोठे जावे, कोठे नोकरी करावी आणि आपल्या कुटुंबियांचे पालनपोषण कसे करावे अशा संभ्रमावस्थेत कामगार असताना एम्प्लॉईज फेडरेशन ऑफ इंडिया यांनी शासनाला एक पत्र दिले होते आणि त्या पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी करावी या उद्देशानेच हे विधेयक आले आहे असे मला वाटते. कामगार कायद्यामध्ये परिवर्तन करण्यासाठी ज्यावेळी महाराष्ट्र राज्यामध्ये विधेयक आले होते त्यावेळी आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील आणि मुंबईतील लाखो कामगारांनी मोर्चा काढून त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. त्यावेळी माननीय पंतप्रधानांना सुध्दा भेटलो होतो. माननीय पंतप्रधानांना सांगितले होते की, तुम्ही कामगारवर्गाच्या संदर्भात कोणताही कायदा आणण्यापूर्वी जे कोणी कामगार क्षेत्रात काम करतात त्या सर्व संस्थांना समोर बोलवून राऊंड टेबल कॉन्फरंस घ्या, त्यांचे म्हणणे ऐकून घ्या, तुम्हाला काय सुधारणा करुन पाहिजे आहेत त्या सांगा, केवळ मालक म्हणतात ती सुधारणा घडवून आणावयाची असे करु नका अशी विनंती तत्कालीन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP/

श्री. मधुकर सरपोतदार .....

होती. त्यांनीही ते मान्य केले आणि त्या कायद्यातील परिवर्तन त्यांनी पुढे ढकलले. आता ते परिवर्तन येणार आहे. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये श्री. विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते आणि आताही तेच मुख्यमंत्री आहेत. परंतु आज संधी साधून त्यांनी हे विधेयक मांडलेले आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, हे जे विधेयक मांडले आहे त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांचे नाव आहे परंतु या विधेयकाच्या संदर्भात उत्तर कोण देणार आहे हे माहीत नाही. कारण माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी आता उपस्थित नाहीत. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे या विधेयकाच्या बाबतीत समाधानकारक उत्तर मिळेल यावर विश्वास नाही. माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे उत्तर देतील परंतु या विधेयकावर माननीय मुख्यमंत्र्यांचे नाव आहे. ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावरील गोष्ट आहे. महाराष्ट्रामध्ये हे जे परिवर्तन आपण सत्तेचा बडगा वापरुन करु इच्छिता त्याला माननीय मुख्यमंत्री जबाबदार आहेत. त्यांनी या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. असे कोणते आकाश कोसळले होते की ज्यामुळे आपण हे विधेयक आणलेले आहे ? आपण या विधेयकाच्या उद्देश व कारणे याच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "1994 चा उक्त अधिनियम दोन वर्षाच्या कालावधीकरिता अंमलात होता आणि तो दिनांक 24 ऑगस्ट, 1996 रोजी समाप्त झाला. त्यानंतर, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, 1999 हा अधिनियमित केला होता. 1999 चा उक्त अधिनियम पाच वर्षाच्या कालावधीसाठी अंमलात होता आणि तो दिनांक 8 मार्च, 2004 रोजी समाप्त झाला. एक वर्ष अत्यावश्यक सेवेचा कोणताही अधिनियम नव्हता. आपण त्याला पुनर्जन्म देण्याचे धोरण स्वीकारले. पहिला जो अधिनियम अस्तित्वात आला तो पाच वर्षासाठी वापरला. त्या पाच वर्षामध्ये काही तरी कारखाने महाराष्ट्रामध्ये जिवंत होते.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

आज सगळे कारखाने उद्ध्वस्त झाले आणि अद्याप मालकवर्गाची कोणती इच्छा पुरविण्याचे शिल्लक ठेवले आहे ? इंडियन मर्चंटस चेंबरच्या परिसंवादामध्ये श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपणही होता. सेक्शन 9-ए ला त्यांनी परिवर्तन मागितले होते आपण त्यावेळी नकार दिला होता. हे मला आठवते. मालकवर्गाची सुप्त इच्छा होती ती पूर्ण करण्यासाठी हे नव्याने विधेयक आणले आहे. एक वर्षापूर्वी हे विधेयक अस्तित्वात नव्हते, त्या कायद्याला पुनर्जन्म देण्याचे काम यानिमित्ताने करीत आहात. महाराष्ट्रामध्ये कायम कामगार नावाची संकल्पना इतिहास जमा झाली आहे. सगळया ठिकाणी असुरक्षित कामगार आणि तात्पुरते कामगार असेच कामगार दिसत आहेत. लाखो, हजारोंच्या संघटना आहेत त्या कामगारांना कोणत्याही कायद्याचे संरक्षण नाही, असंघटित कामगार संघटना ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठी झाली आहे आणि देशामध्ये अशा कामगारांना संरक्षण देण्यासाठी एखादा कायदा आणला असता तर त्याचे स्वागत केले असते. परंतु ते न करता जे कामगार अद्याप जीवंत आहेत त्यांना मारण्याचा कायदा तुम्ही या निमित्ताने पुढे आणला आहे. कामगार चळवळ दडपून टाकण्याचा आणि मालकवर्गाची इच्छा आहे ती फलद्रुप करण्यासाठी हे विधेयक आणले आहे अशी माझी या शासनाबद्दल भावना झाली आहे. ती चुकीची असेल तर कशी ते स्पष्ट करुन सांगावे. हे जे विधेयक आणले आहे त्या व्याख्येमध्ये काय म्हटले आहे ? यात असे म्हटले आहे की, "जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, ऊतारु किंवा माल, जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा." तुमच्या कोणत्या सेवा पाण्यावरुन चालत आहेत ? पाण्यावरील कोणत्याही सेवांचा यात उल्लेख केलेला नाही, त्यामुळे ते जाहीर करावे. या सगळया सेवा पाण्यावरुन चालल्या आहेत, त्या शासकीय आहेत, तेथे जर काही गडबड झाली तर आम्ही त्यांना सोडणार नाही, अशी काही परिस्थिती आहे काय ? कशासाठी पाण्याच्या सेवेचा उल्लेख करता ? महाराष्ट्र एवढा भाग्यवान आहे, महाराष्ट्राला एवढा समुद्र किनारा लाभला आहे, परंतु आपली कोणतीही सेवा उपलब्ध नाही. मग हे विधेयक कोणासाठी आणले आहे ? या व्याख्येमध्ये जलसेवा कशासाठी म्हटले आहे ? यात उतारु किंवा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

माल, माल म्हटले की माथाडी कामगार. माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ आहे, माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा आहे. असे असताना त्यांचा उल्लेख करण्याची गरज का भासली ? "ऊतारु किंवा जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा," असे म्हटले आहे. आता जमिनीवरुन वाहून नेणारी कोणती सेवा आहे ? मुंबईमध्ये बेस्ट सेवा आहे, पुण्यामध्ये पीएमटी सेवा आहे, पिंपरी-चिंचवड येथे मनपाची सेवा आहे, एस.टी.महामंडळ आहे. एस.टी.च्या समस्या तुम्हाला माहीत आहेत. गेल्या दोन वर्षापासून एस.टी.च्या कर्मचा-यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. त्या मागण्यांसंबंधी शासन कोणत्याही वाटाघाटी करीत नाही. त्यांचे प्रश्न सोडवित नाही आणि जैसे थे परिस्थिती ठेवली आहे. आता तुम्ही कायद्याने बांधता आणि संप करु देणार नाही, निदर्शने करु देणार नाही, मोर्चे काढू देणार नाही, अशाप्रकारची व्यवस्था केली तर याचा अर्थ असा आहे की, त्या कामगारांची कायमची तोंडे बंद करुन टाकावयाची हा याच्या पाठीमागचा प्रधान हेतू आहे. दुसरा कोणताही हेतू त्याच्या पाठीमागे नाही. "जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे, अशा गॅस, दूध किंवा पाणी, वीजपुरवठा करणा-या संबंधातील कोणत्याही सेवा." अशी यामध्ये तरतूद आहे. सभापती महोदय, वीज मंडळाचे विभाजन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्या कामगार संघाटनांना सांगितले आहे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये आम्ही वीज मंडळातील कामगारांना धोका पोहोचू देणार नाही. 1 लाख 8 हजार कर्मचारी राज्य वीज मंडळामध्ये आहेत. आपण या वीज मंडळाचे विभाजन करुन 3 विभाग करीत आहात. त्याचा परिणाम काय होणार आहे ? तुम्ही खाजगीकरणाच्या दिशेने चालला आहात या खाजगीकरणासंबंधी वीज मंडळाच्या कामगार संघटनांनी सांगितले आहे की, जर आपण खाजगीकरणाचा निर्णय घेतला तर आम्ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संप करु आणि सर्व सेवा खंडित करुन टाकू. अशाप्रकारची नोटीस त्या कामगारांनी शासनाला दिलेली आहे. असे असताना सुध्दा आपण जे काय करीत आहात त्यासाठी वीज मंडळ नजरेसमोर ठेवले आहे, एस.टी.महामंडळ नजरेसमोर ठेवले आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकरराव सरपोतदार...)

कोणती गोष्ट नजरेसमोर ठेवून इतक्या घाईने हे विधेयक आणलेले आहे हे मला समजत नाही. यापूर्वीच हे विधेयक शासनाने का आणलेले नाही ? तसेच या अधिवेशनानंतर आणखी तीन महिन्यांनी विधिमंडळाचे अधिवेशन होणार आहे. त्या अधिवेशनामध्येही हे विधेयक मांडता आले असते. हे विधेयक आणण्या मागे इतकी घाई करण्याचे कारण काय हा माझा शासनाला सवाल आहे. आता विधानसभेने हे विधेयक संमत केलेले आहे त्यामुळे या विधानपरिषदेमध्ये आपण देखील ते संमत करावे असे मा.मंत्री महोदय सांगतील. हे विधेयक विधानसभेने पास केले म्हणून ते विधानपरिषदेमध्ये देखील पास केले पाहिजे असे जर आपण म्हणत असाल तर या विधानपरिषदेला काहीच अर्थ राहाणार नाही. मग त्या पेक्षा ही विधानपरिषदच बरखास्त करुन टाका. विधानसभेतच विधेयके पास करुन घ्या. काही राज्यामध्ये असे चालले आहे. येथेही तुम्ही तसेच चालवा.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये असेही म्हटलेले आहे की, "रुग्णालये व दवाखाने यांच्यासह, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा". या विधेयकाची व्याप्ती खूप वाढवलेली आहे. रुग्णालयामधील सेवाबाबत मा.मंत्री महोदयानां खरोखरच माहिती आहे काय? रुग्णालयामध्ये औषधांचा अपुरा पुरवठा असतो, डॉक्टर्स्ची पदे भरली जात नाहीत, परिचारिकांची पदे कमी आहेत. आज रुग्णालयातील परिचारकांना दुप्पटीने काम करावे लागते. जी पदे भरायला पाहिजेत ती भरली जात नाहीत. चार परिचारकांचे काम एका परिचारकाला करावे लागते. त्यांना श्वास घ्यायलाही वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत त्यांनी तक्रार केली तर त्यांना कायद्याचा बडगा दाखवला जाणार. त्यांच्यावर कशा प्रकारे आपण कारवाई करणार आहात त्या मुद्यावर मी नंतर येणार आहे. कोणावर आणि कशासाठी आपण कारवाई करता ? आमच्या शिवसेना आणि भारतीय जनता पक्षामध्ये एका गोष्टीला नेहमी पाठिंबा राहिलेला आहे तो म्हणजे या देशातील कामगार असोत, कर्मचारी असोत, पोलीस असोत किंवा कोणत्याही सेवेतील कर्मचारी असोत त्यांनी आपले कर्तव्या पार पाडले पाहिजे. तुम्ही कर्तव्यामध्ये कसूर करु नका, तुमच्या मागण्या अधिकाराने मागून घ्या, पण जेव्हा अधिकार बजावू पाहाता त्यावेळी कर्तव्यसुध्दा बजावले पाहिजे ही भूमिका आमच्या संघटनांनी आजपर्यन्त घेतलेली आहे. कोणत्याही गोष्टींचा विचार न करता या ठिकाणी भयानक अशा स्वरुपाचे विधेयक आणलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकरराव सरपोतदार...)

विधेयकाच्या खंड 2 मधील (चार)मध्ये असे म्हटलेले आहे की, "राज्याच्या कामकाजाच्या संबंधातील कोणतीही सरकारी सेवा, पद आणि नोकरी आणि तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचा-यांच्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती, आणि उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक". सभापती महोदय, या विधानमंडळ सचिवालयामध्ये कधी संप झाल्याचे मी ऐकलेले नाही. याचा अर्थ त्यांच्या काही व्यस्था नाहीत, वेदना नाहीत, तक्रारी नाहीत असा होत नाही. या तक्रारी सोडविण्याचे काही मार्ग आहेत. मी लोकसभेमध्ये असताना पे रिव्हाईज समितीचा चेअरमन होतो. तेथील कर्मचा-यांच्या 5 वर्षे कंडिशन्स ऑफ सर्व्हिस रिव्हाईज झालेल्या नव्हत्या. मी त्या समितीचा चेअरमन असताना विद्यमान पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग तसेच श्री. कुमार मंगलम, श्री. यशवंत सिन्हा, डॉ. राम गोपाल यादव हे त्या समितीचे सदस्य होते. राज्य आणि लोकसभेच्या कंडिशन्स ऑफ सर्व्हिस रिव्हाईज करण्याची जबाबदारी आमच्यावर टाकली गेली. सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, या विधान भवनातील कर्मचा-यांचीसुध्दा काही दु:खे आहेत, व्यथा आहेत, वेदना आहेत. अधिवेशन काळात हे कर्मचारी रात्री 2.00 वाजता घरी पोहोचतात आणि दुस-या दिवशी जेव्हा सकाळी 10.00 वाजता सभागृह असते त्याआधी ते 9.00 वाजता कार्यालयात उपस्थित असतात. एक नाही तर अशा किती तरी गोष्टी सांगता येतील. परंतु ते कर्मचारी काही बोलत नाहीत. कारण त्यांना युनियन करण्याचा अधिकार नाही. नोकरी टिकवायची असेल तर काम करा नाही तर बाहेर व्हा. कारण आज पुष्कळ लोक नोकरीच्या शोधार्थ वेटिंग लिस्टमध्ये उभे आहेत. लोकसंख्या इतकी वाढलेली आहे की, क्लार्क, टायपिस्ट, स्टेना अशी कितीही माणसे लगेच मिळू शकतील अशी आजची एकंदर परिस्थिती आहे. So, you are exploiting the situation. Let any Govt. come. The Govt. is exploiting the situation by taking undue advantage of the situation. अशा पार्श्वभूमीवर आपण हे विधेयक आणलेले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांनी अशा प्रकारचे विधेयक आणून या सभागृहामध्ये काय चालवले आहे ते कळत नाही.

सभापती महोदय, विधेयकामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "(पाच) स्थानिक प्राधिकरणांच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा पद ; ज्या बाबीसंबंधी राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशा बाबींशी संबंधित असलेल्या ज्या कोणत्याही

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकरराव सरपोतदार...)

इतर सेवेतील किंवा नोकरीतील किंवा नोक-यांच्या वर्गातील संपामुळे राज्य शासनाच्या मते, कोणतीही सार्वजनिक सुरक्षितता राखण्यास किंवा समाजजीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल किंवा समाजास गंभीर स्वरुपाच्या अडचणी येतील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी अत्यावश्यक सेवा असल्याचे जाहीर करील अशी कोणतीही इतर सेवा, पद, नोकरी किंवा त्यांचा वर्ग असा आहे."

..नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

केवढी व्यापकता वाढली आहे. मी या ठिकाणी सूचना करीत आहे त्याची या सभागृहात कोणीही मंत्री नोंद घेताना दिसत नाही. या विभागाशी संबंधित मंत्री सभागृहातून बाहेर निघून गेले. या विधेकावरील चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्री उपस्थित राहणे गरजेचे होते.

श्री. बाबा सिध्दीकी : मी नोंद घेत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : आम्ही उपस्थित केलेल्या सगळया प्रश्नांची उत्तरे तुम्हाला द्यावी लागणार आहेत. ज्या पध्दतीने ही विधेयके पास करुन घेण्याचा आपण प्रयत्न करीत आहात ती गोष्ट योग्य नाही. आपण लोकशाहीमध्ये रहातो आहोत. लोकशाहीत प्रत्येक माणसाला जगण्याचा अधिकार आहे. पाण्यावर प्रत्येक माणसाचा अधिकार आहे. त्या पाण्यावर तुम्ही सिलींग लावून टाकले. दोन मुलांपेक्षा जास्त मुले असतील तर त्या शेतक-याला सिंचनासाठी पाणी देण्यात येणार नाही अशी तरतूद कायद्यात तुम्ही करुन टाकली आहे. तुमच्यात हिंमत असेल सगळयांना नागरी समान कायदा लागू करुन दाखवा. ज्यांना तुम्ही दाबू शकता, जेथे तुमची संख्या आहे, तेथे तुम्ही म्हणता अरे माझे ऐकले पाहिजे. नाही ऐकावयाचे तर खाली बस. ज्या ठिकाणी तुमचे काही चालत नाही. तेथे तुम्ही जाऊन गुढगे टेकून नमाज पढत बसता. तुम्ही काय लावले आहे ? या राज्यात शासन नावाची यंत्रणा अस्तित्वात आहे काय ? मी आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटून सांगितले. तुम्ही एवढी आश्वासने दिली. परंतु एकही आश्वासन पाळले गेलेले नाही. त्या आश्वासनाची अंमबजावणी करण्यात आली पाहिजे. तुमच्याकडे आश्वासन पूर्ण करण्यासाठी पैसे नसतील तर या सभागृहात एकदा सांगा. आम्ही हप्त्याने पैसे देऊ. परंतु एकदा काय ते सांगा. तुमच्या शब्दात निर्धार असला पाहिजे. तुमच्या शब्दात धार असली पाहिजे. तुमच्या शब्दात विश्वास असला पाहिजे. जर तुम्ही आश्वासने पाळण्यात यशस्वी झालात तर राज्य चांगल्या प्रकारे चालू शकते. मला असे वाटते की, अशा प्रकारचे विधेयक सभागृहात आणणे म्हणजे शासनाला त्यांच्या अस्तित्वाची भीती वाटावयास लागलेली दिसते. म्हणून अशा प्रकारची विधेयके सभागृहात शासनाकडून आणली जात आहेत. तुम्हाला भीती नसती तर असले विधेयक आणण्याचे तुम्ही धाडसच केले नसते.भयानक असे विधेयक तुम्ही आणलेले आहे. सभापती महोदय, "संप" याची व्याख्या केलेली आहे. कोणत्याही अत्यावश्यक सेवेत कामावर लावलेल्या व्यक्तीच्या गटाने एकत्रितपणे काम बंद करणे, किंवा अशा रितीने ज्या व्यक्ती कामावर असतील किंवा ठेवलेल्याइ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

असतील अशा कितीही व्यक्तींनी काम चालू ठेवल्यास किंवा काम स्वीकारण्यास एक विचाराने किंवा एक मताने नकार देणे असा आहे. आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे. (एक) कोणतीही अत्यावश्यक सेवा चालू ठेवण्यासाठी अतिकालीक काम करणे आवश्यक असेल त्या बाबतीत असे काम करण्यास नकार देणे. आमच्या कोकणात पूर्वी बैलघाट होते. एकदा त्या बैलाच्या डोळयांना कापडाची झापड बांधली जाते. त्या बैलास एक फटका मारला जातो, तो बैल रहाटा भोवती फिरावयास लागतो, रहाटाच्या आवाज येण्याचे बंद झाले तर मालक बैलाला ओरडून सांगतो. तो बैल पुन्हा रहाटा भोवती चालू लागतो. तो बैल दमला तर पुन्हा थांबतो. मालक बैलावर पुन्हा पुन्हा ओरडतो. तो बैल मालकाच्या ओरडण्याकडे लक्ष देत नाही. त्यावेळी मालक मोठा बांबू घेऊन त्या बैलाकडे जातो आणि त्या बैलाच्या पाठीवर मारतो. तो बैल पुन्हा रहाटा भोवती चालू लागतो. तुम्हाला असेच करावयाचे आहे काय ? आपण कामगार राज्यमंत्रीपद स्वीकारले आहे.हे विधेयक काय आहे याची आपल्याला काही माहिती आहे काय ? आपण हे विधेयक वाचले आहे काय ? कामगार राज्यमंत्र्यांचे आमच्या भाषणाकडे लक्ष देखील नाही. आपल्याला पद मिळाले आपण आरामात सभागृहात येऊन बसला आहात. लाल दिव्याच्या गाडीतून आपण फिरता आहात. लाल दिव्याची गाडी झोपडपट्टीच्या ठिकाणी लावावयाची. त्या झोपडपट्टीतील सगळी माणसे जमा करावयाची. ती झोपडपट्टी अधिकृत आहे की अनधिकृत आहे काही पाहिले जात नाही. कोणत्याही प्रकारची माहिती न घेता लाल दिव्याच्या गाडया मतांचा जोगवा गोळा करण्याच्या उद्देशाने थांबविल्या जातात. झोपडपट्टीचे नाव घेण्याचा जेवढा मला अधिकार आहे तेवढा तुम्हाला अधिकार नाही ही बाब आपण लक्षात ठेवा. मी जेव्हा एखादी गोष्ट बोलतो त्याच्यापाठीमागे काही कारणे असतात. त्यामुळे मी त्या संदर्भात बोलू शकतो. सदर विधेयक हे कामगार मंत्र्यांशी संबंधित आहे. म्हणून कामगार मंत्र्यांनी उपस्थित रहाणे आवश्यक होते. राज्यातील सगळया कामगारांना झोपवून टाकण्याचा तुम्ही निर्णय घेतलेला आहे...

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. मधुकर सरपोतदार ...

कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबविण्यास किंवा ब-याच प्रमाणात ते कमी होण्यास ज्या कोणत्याही इतर वर्तणुकीची परिणीती होण्याचा संभव असेल किंवा होईल अशी कोणतीही वर्तणुक म्हणजे ज्याला काम करावयाचे असेल त्याला करावेच लागेल नाही म्हणावयाचे नाही. आठ तास काम विधानपरिषदेमध्ये झाले. मी या संपूर्ण अधिवेशनात पाहतो आहे की अधिवेशनाचा कालखंड कमी करुन टाकायचा. खरे म्हणजे 7 ते 8 आठवडे अधिवेशन चालले पाहिजे असा दंडक होता. आता एक महिन्यावर आणला. परिणाम असा झाला की, आमदारांना सकाळी 10 वाजल्यापासून बोलवायचे आणि रात्री 9-10 वाजेपर्यंत कामाला जुंपून ठेवायचे. आपण म्हणाला सभागृहात थांबा असा तुमच्यावर दंडक नाही. जायचे असेल तर जाऊ शकता. हे खरे आहे.पण जे जबाबदार आहेत त्यांना असे वाटते की हे विधानमंडळ आहे कायदे मंडळ आहे याठिकाणी उपस्थित राहिले पाहिजे. जे काही सदनामध्ये घडते आहे त्यामध्ये भाग घेतला पाहिजे. बरे असेल तर बरे म्हटले पाहिजे आणि वाईट असेल तर वाईट म्हटले पाहिजे. या पध्दतीने येथे जे आमदार येऊन बसतात त्यांच्यावर सुध्दा अन्याय होतो. मध्यंतरी लोकसभेचे आणि संपूर्ण विधानसभांच्या पीठासीन अधिका-यांचे अधिवेशन झाले होते त्यावेळी असे ठरले होते की, वर्षातून कमीत कमी 100 दिवस या विधानमंडळाचे काम चाललेच पाहिजे. असा प्रस्ताव मंजूर केला होता. परंतु आमचे अधिवेशन संपूर्ण वर्षामध्ये 60-65 दिवस सुध्दा होत नाही. नागपूरला जायचे 15 दिवसात परत यायचे. मुंबईमध्ये दोन अधिवेशने मिळून साधारणत: 45 दिवस. 60 दिवस संपूर्ण अधिवेशन चालते आणि मग आम्हा आमदारांना दावणीला बांधले जाते. मग कोणीतरी मंत्री येऊन सांगणार खालच्या सभागृहात विधेयक मंजूर झाले आहे ते आपल्याला पास करुन घ्यायचे आहे. सभापती सांगणार की, आज ही सगळी विधेयके मंजूर करुन घ्यायची आहेत. याचा अर्थ असा होतो की, लोकशाहीवर न्याय करतो की अन्याय करतो हे पाहिले पाहिजे. आता जे विधेयक आले आहे ते दोन तासापूर्वी खालच्या सभागृहातून पास होऊन आले आहे. त्या सदनामध्ये काय घडले याची माहिती नाही. खरे म्हणजे त्याबाबतची माहिती मंत्र्यांनी दिली पाहिजे. या कारणासाठी या विधेयकाला विरोध झाला,या कारणासाठी या विधेयकाला पाठिंबा दिला. इतक्या आमदारांनी विरोध केला आणि इतक्या आमदारांनी पाठिंबा दिला म्हणून आपणही पाठिंबा द्या असे सांगणे आवश्यक होते. परंतु याठिकाणी कोणत्याही प्रकारचे स्टेटमेंटच केले गेले नाही. आता चर्चेला सुरुवात झालेली आहे काही सदस्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ..

बोलून गेले आता आम्ही काय बोलणार ? 1947 चा औद्योगिक विवाद कायदा पाहिला तर त्यामध्ये अशी व्याख्या केलेली आणि कलम 5 आणि 6 मध्ये वापरलेली परंतु व्याख्या न केलेले शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील ते अर्थ. You are over-riding the provisions of Industrial Disputes Act. त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न करीत आहात. तुम्हांला अधिकार दिले कोणी ? यासंबंधी प्रोसिजर आहे. प्रथा आहेत आणि परंपरा आहेत. हे जे कामगार कायदे झालेले आहेत त्याच्या पाठीमागे 100 वर्षांची परंपरा आहे. अनेक कामगारांनी आपल्या पंचप्राणांची आहुती दिलेली आहे. एकेक नियम तयार करण्यासाठी कामगारांना खूप मोठे संप घडवून आणावे लागले आहेत आणि या सगळया अग्निदिव्यातून कामगार बाहेर आला आणि कायद्यामध्ये तरतुदी निर्माण झाल्या. या तरतुदी केवळ मालक वर्गाला अडचणीच्या वाटतात आणि मालकांनी शासनाला पत्र लिहिले आणि पंतप्रधान म्हणाले म्हणून ते सांगतील तशा गोष्टी केल्या तर निवडणुकीला फंड मिळू शकतो. या भावनेने सगळे देशातील लोक वागत आणि त्यातून कामगार उध्वस्त होत आहे. आज महाराष्ट्रातील कामगार उध्वस्त झालाच आहे. एक तरी संप महाराष्ट्रात चालू असेल तर मला दाखवा. विधेयक आणले आहे. महाराष्ट्रात अमुक ठिकाणी संप चालू आहे आणि त्याचा त्रास जनतेला होत आहे. मध्यंतरी महापालिका कर्मचा-यांच्या बाबतीत श्री. राव यांनी सांगितले की,आम्ही अमुक तारखेपासून संपावर जातो. पण आमच्या संघटनांनी त्याला विरोध केला. लोकांच्या जीवनाशी निगडीत ज्या गोष्टी आहेत ते संप करुन त्यांना अडचणीत आणणे हे कामगार क्षेत्राचे काम नाही. ट्रेड युनियन ॲक्टीव्हीटीमध्ये अशी तरतूद नाही. लोकांना वेठीला धरा आणि आपल्या मागण्या मान्य करुन घ्या अशी तरतूद नाही. आमचे म्हणणे तर असे आहे की, जी कामे महापालिकेत असतील,मंत्रालयात असतील किंवा विधानमंडळात असतील ती करा आणि सांगा कोणते काम शिल्लक असेल तर ते आम्ही करतो...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री मधुकर.सरपोतदार..

परंतु त्यांचे जे काही प्रश्न आहेत ते प्रश्न तुम्ही सोडवलेच पाहिजेत परतु औद्योगिक विवाद कायद्यात व्याख्या बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विधेयकाच्या खंड तीन मध्ये असे म्हटलेले आहे की. " (1) कलम 2 च्या खंड (अ) च्या उप खंड (सहा) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असेल तर ताबडतोब व जर त्यांचे अधिवेशन चालू नसेल तर सभागृहाच्या पुढील अधिवेशनाचा प्रारंभ होईल तेव्हा पहिल्या दिवशी त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ती अशा रीतीने ठेवण्यात आल्याच्या तारखेपासून किंवा, यथास्थिती, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यापासून चाळीस दिवसाच्या समाप्ती नंतर, त्या मुदतीच्या समाप्तीपूर्वी ती अधिसूचना काढण्यास मान्यता देणारा ठराव राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहानी संमत केला नसेल तर, अंमलात राहण्याचे बंद होईल. " आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असून आता तीन महिने अधिवेशन होणार नाही.हे विधेयक आपण आणलेले आहे आणि ते विधेयक पास केल्यानंतर वरवंटा फिरविण्यास तुम्ही सुरुवात करणार आहात.आपल्याला हे विधेयक मंजूर करण्याची एवढी घाई का झाली आहे ? आपल्याला जर घाई नसेल तर हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे. Let us have a discussion on each clause of the Bill. We should find out as to what are the pros and cons of tbe Bill. पंरतु त्याप्रमाणे आपण काही करीत नाही. फक्त हे विधेयक तातडीने पास करण्यात यावे एवढेच सांगितले जात आहे. खंड 3 च्या पुढे असेही म्हटलेले आहे की,

"(2) पोट कलम (1) व्दारे किंवा तद्न्वये कोणतीही अधिसूचना अंमलात राहण्याचे बंद होईल तेव्हा त्या बाबतीत अशा रीतीने तिचा अंमल बंद होणे यामुळे अशा समाप्तीपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीस बाधा येणार नाही."

आपण ज्या काही तरतुदी करीत आहात त्या काळजीपूर्वक तपासल्या पाहिजेत.स्पष्टीकरणात असे म्हटलेले आहे की, "राज्य विधानमंडळाच्या सभागृहाची अधिवेशने निरनिराळया तारखांना पुन्हा बोलाविण्यात आली असतील तर त्या तारखांपैकी जी उशिराची तारीख असेल त्या तारखेपासून ही चाळीस दिवसांची मुदत मोजण्यात येईल." माननीय मंत्रिमहोदयांना मी विचारु इच्छितो की, या ठिकाणी आपण कोणती तरतूद केलेली आहे हे आपण पाहिलेले आहे काय ? विधानमंडळाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..

अधिवेशनाच्या बाबतीत आपण तरतूद केलेली आहे.राज्य विधानमंडळाची अधिवेशने कोण बोलावतो त्या तारखा कोण ठरवितो ? हा अधिकार मंत्रिमडळाला आहे काय ? मंत्रिमंडळाला जर हा अधिकार नसेल तर त्याचा या ठिकाणी उल्लेख का करण्यात येत आहे.? विधानमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार माननीय राज्यपालांचा आहे.हे अधिवेशन केव्हा बोलवावयाचे आणि केव्हा समाप्त करावयाचे हे माननीय राज्यपाल ठरवत असतात. मंत्रिमंडळ फक्त सल्ला देत असते. विवक्षित नोक-यांमध्ये संपास मनाई करण्याच्या अधिकाराचा येथे उल्लेख करण्यात आला आहे मला माननीय मंत्रिमहोदयांना असे सांगावयाचे आहे की, तुम्ही सर्वच अधिकार आपल्याकडे घ्यावेत.नोकरीवर ठेवावयाचा आणि नोकरीवरुन काढावयाचा असे सर्व अधिकार आपण आपल्याकडे ठेवत आहात.

श्री.राजेश टोपे (बसून) : मागच्यावेळी आपण मंजूर होते.

श्री.मधुकर सरपोतदार :त्यावेळी आम्ही मंजूर केले होते .आम्ही चूक केली म्हणून तुम्हीसुध्दा चूक केली पाहिजे असा नियम नाही.आमची चूक झालेली आहे असे आपले म्हणणे आहे ना ? मग आमची चूक तुम्ही दुरुस्त करुन टाका.आम्ही जे जे चुकीचे करीत आहोत ते ते दुरुस्त करण्यासाठीच तुम्ही आला आहात ना ? मग त्यामध्ये तुम्ही दुरुस्ती करावी. तीच चूक ठेवून तुम्ही पुढे का जात आहात? आम्ही कर्ज काढले होते. ती आम्ही चूक केली होती परंतु तुम्ही कर्जाचा डोंगर उभा केला होता.आम्ही ज्या काही चुका केल्या होत्या त्याच चुका तुम्ही करावयाच्या आणि आमच्याच चुकांकडे बोट दाखवावयाचे ही पध्दत बरोबर नाही.आम्हाला मूल पाहिजे असल्यामुळे आम्ही मुलाला जन्म दिला होता.हे आम्हाला मान्य आहे. तुम्हाला मूल नको असेल तर तुम्ही कशाला मुलाला जन्म देता? तुम्हाला जर मुलगा नको असेल तर तुम्ही अबॉर्शन करु शकता.किंवा अबॉर्शन करावे लागणार नाही अशी परिस्थिती निर्माण करु शकता. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेन्द्र कवाडे यांना मी सांगू इच्छितो की, आपण थोडेसे बोलला आहात परंतु चांगले बोलला आहात. वास्तविक पाहता तुम्ही प्रत्येक क्लॉजवर तुटून पडावयास पाहिजे होते. तुम्ही गरीब आणि श्रमिक लोकांचे प्रतिनिधित्व करणारे आमचे सहकारी आहात . या विधेयकातील एक एक क्लॉज फार भयानक आहेत.गळफास लावणारे हे क्लॉजेस आहेत आणि त्यावर भाष्य करण्याची गरज आहे.खालच्या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.नरसय्या आडम हे दोन ते तीन

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ....

तास या विधेयकावर बोलले होते असे मला कोणी तरी सांगितले होते.हे खरे आहे काय ? असे मी माननीय मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो.

श्री.राजेश टोपे (बसून) :ते अर्धा तास बोलले होते.

श्री.मधुकर सरपोतदार : खंड 4 मध्ये असे म्हटलेले आहे की, "(1)कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील संपास मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य सरकारची खात्री पटल्यास ..." म्हणजे लोकहित काय आहे हे फक्त राज्य शासनालाच कळते. अन्य कोणालाही काही कळत नाही.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ...

पुढे म्हटले आहे की, '... त्यास, पोट-कलम (5) च्या तरतुदीस अधीन राहून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेपासून तसे करता येईल.' पुढे (2) मध्ये म्हटले आहे की, ' पोटकलम (1) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होत असेल अशा व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने तो प्रसिद्ध करण्यात येईल.' सभापती महोदय, अशा अनेक गोष्टी तुम्ही यामध्ये घातल्या आहेत. म्हणजे अन्याय करायचा तुम्ही आणि त्या अन्यायाची चौकशीसुद्धा त्यांनीच करायची. एखादा संप झाला की तो कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे हे ठरविण्याचा अधिकार तुमच्याकडेच घ्यायचा. खरे तर त्यासाठी वेगळी यंत्रणा आहे. कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय आहे. कोणताही संप झाला तर तो योग्य आहे की अयोग्य आहे, कायदेशीर आहे की बेकायदा आहे हे ठरविण्याचा अधिकार त्या कोर्टाकडे आहे. परंतु आता हेही अधिकार शासनाने आपल्याकडे घेतले आहेत. कोठलाही संप कायदेशीर असला तरी तो बेकायदेशीर आहे हे ठरविण्याचा अधिकार शासनाने आपल्याकडे घेतलेला आहे. सभापती महोदय, म्हणून या विधेयकातील प्रत्येक कलमांची चिरुाड करण्याची गरज आहे असे माझे मत झालेले आहे. कारण शेवटी हे कामगारांसंबंधातील विधेयक आहे. पुढे ते संपूर्ण महाराष्ट्राला लागू होणार आहे. आता यातील (3) मध्ये म्हटलेले आहे की, 'पोट-कलम (1) अन्वये काढण्यात आलेला आदेश त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून फक्त सहा महिने अमलात राहील. परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, राज्य शासनाला तशाच रीतीने प्रसिद्ध केलेल्या तत्सम आदेशांद्वारे व पोट-कलम (5) च्या तरतुदींच्या अधीन राहून, त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी मुदतीकरिता वाढविता येईल.' सभापती महोदय, हा कायदा अत्यावश्यक सेवेस लागू होत असेल तर यातील (4) मधील (अ) नुसार हा आदेश ज्या अत्यावश्यक सेवेस लागू होत असेल त्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील कोणत्याही व्यक्तीने संपावर जाता कामा नये किंवा संपावर राहता कामा नये; (ब) अशा सेवेत नोकरीस असलेल्या व्यक्तींनी तो आदेश काढण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेला किंवा सुरू केलेला कोणताही संप अवैध ठरेल.' सभापती महोदय, पुढे (5) (अ) मध्ये म्हटलेले आहे की, विधान परिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार

..... 3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

असेल ते खेरीज करून, राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचारी वर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत., तसेच उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत., पोटकलम (1) किंवा पोट कलम (3) अन्वये कोणताही आदेश काढता येणार नाही.' सभापती महोदय, या ठिकाणी विवक्षित आस्थापनांमधील टाळेबंदींना मनाई करण्याचा अधिकार देखील आपण घेतला आहे. यातील (अ) आणि (ब) मध्ये आपण म्हटले आहे की, कोणत्याही मालकाला हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात कोणतीही टाळेबंदी जाहीर करता येणार नाही किंवा सुरू करता येणार नाही., तसेच कोणत्याही मालकाने हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात असलेली व हा आदेश काढण्यात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेली किंवा सुरू केलेली कोणतीही टाळेबंदी अवैध ठरेल. आणि पुढे म्हटले आहे की, कोणताही मालक, आस्थापनेच्या संबंधात, या कलमान्वये अवैध असणारी टाळेबंदी सुरू करील, चालू ठेवील किंवा अन्य प्रकारे तिच्या पुर:सरणार्थ वर्तणूक करील, तर तो, दोषसिद्धीनंतर, सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.' मालकाला मात्र शिक्षा करताना इतकी सौम्य शिक्षा आपण करीत आहात हे कितपत योग्य आहे ? ...

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी या विधेयकातील हे सर्व काही वाचलेले आहे ...

श्री. मधुकर सरपोतदार : त्यांना वाटले ते त्यांनी वाचले आहे आणि मला जे वाटते आहे ते मी येथे वाचतो आहे. आपल्याला त्याबद्दल काही हरकत आहे का ? असल्यास तसे सांगावे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी सांगत आहेत की, मी हे सारे येथे वाचले आहे. पण आम्ही कोर्टामध्ये जातो त्यावेळेस पाहतो की, जज समोर ॲफिडेविट असते आणि तरीसुद्धा आमचे मित्र, वकील तेच वाचत असतात आणि तरीही त्यावर फी वसूल करीत असतात.

(यानंतर श्री. जागडे .... 3एल 1 ...

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, " बेकायदेशीर संपाबद्दल शास्ती " यामध्ये असे म्हटले आहे की, " या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेला संप सुरु करणा-या किंवा अशा कोणत्याही संपावर जाणा-या किंवा राहणा-या किंवा अन्य प्रकारे संपात भाग घेणा-या कोणत्याही व्यक्तीस दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यन्त असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यन्त असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. " आता या शिक्षा कोणी द्यावयाच्या आहेत. तुम्हीच या शिक्षा देणार आहांत. मालक आणि कामगार हा एकाच तराजूत आपण ठेवलेला आहे. मालकांच्या बाबतीत आणि कामगारांच्या बाबतीत एकसारखीच तरतूद आहे. आता या विधेयकाचे ड्राफ्टींग कोणी केले आहे, हे समजून येत नाही. सामाजिक न्याय तत्वावर हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. गिरणी संपामुळे अडीच लाख गिरणी कामगार उध्वस्त झाले आहेत. सभापती महोदय, मला 1981-82 चा संप आठवतो. त्यावेळी माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे, श्री.दत्ताजी नलावडे व मी गिरणी कामगारांना 200 रुपये पगारवाढ मिळावी, म्हणून मागणी केली होती. त्यावेळी एक बदमाश गिरणी मालक पुढे आला. एम्पायर डाईंग या मिलमधील कामगारांना त्यांनी 400 रुपयाची पगारवाढ दिली. एम्पायर डाईंग मधील मिलमधील कामगारांना 400 रुपयाची पगारवाढ मिळते हे पाहून सर्व गिरणी कामगार संपावर गेले. आणि त्यानंतर हा गिरणी कामगार उध्वस्त झाला. त्यावेळची परिस्थिती मी स्वत: पाहिली आहे.

सभापती महोदय, " चिथावणी वगैरे देण्याबद्दल " जी शास्ती देण्यात आली आहे, त्यामध्ये असे म्हटले आहे की, " या अधिनियमान्वये जो बेकायदेशीर असेल अशा संपास चिथावणी देणा-या, त्यात भाग घेण्यास इतर व्यक्तीना उद्युक्त करणा-या किंवा अन्य प्रकारे त्याच्या पुर:सरणार्थ वागणा-या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यन्त असू शकेल, इतक्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयापर्यन्त असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. Those who are inciting the workmen, inciting the mob, for them, you have made provisions of punishement.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय, या विधेयकात पुढे असेही म्हटले आहे की, " कोणतीही व्यक्ती, तिच्या सेवेच्या किंवा नोकरीच्या अटी व शर्तीमुळे शिस्तभंगाच्या स्वरुपातील ज्या कोणत्याही कारवाईला किंवा तिच्या अनुषंगाने होणा-या ज्या कोणत्याही परिणामाला उत्तरदायी होईल त्या कारवाईला किंवा परिणामाला कलमे 7,8, किंवा 9 यान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कारवाईमुळे बाधा पोहोचणार नाही व ती त्यांना अतिरिक्त म्हणून राहील." तसेच पुढे असेही म्हटले आहे की, "फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही पोलीस अधिका-यास एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अधिपत्राशिवाय (वॉरंट) करता येईल. " ही काय आपली मोंगलाई आहे ? आपण पोलीस राज चालविले आहे काय ?

सभापती महोदय, ठाण्यामध्ये एच ॲण्ड जॉन्सन जावाची कंपनी आहे. त्या कंपनीने आपल्या स्वत:च्या अधिकारात त्या ठिकाणी टाळेबंदी केली. त्या कंपनीचा मालक वागळे इस्टेट पोलीस स्टेशनला गेला आणि सगळा पोलीस फोर्स त्या ठिकाणी मागविला होता. त्या ठिकाणी पोलीस आल्यानंतर ते कामगारांना कामावर जाऊ देत नव्हते. हे कामगार माझ्याकडे आले आणि मला असे सांगितले की, " पोलीस आम्हाला आत जाऊ देत नाहीत. "

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

मी एका पोलीस इन्सपेक्टरला म्हटले की, टाळेबंदी साठी कायदा आहे. त्या कायद्याप्रमाणे मालकाने कोर्टामध्ये अर्ज केला आहे कां? टाळेबंदीसाठी परवानगी मागितली आहे कां? तो म्हणाला मला माहीत नाही. मालकाने नोटीस लावली आहे. हे मालकाचे नोकर आहेत. त्याठिकाणी पोलीस फोर्स लावून त्या कामगारांना बाहेर काढण्यात आले. आज त्या 900 कामगारांना बाहेर काढल्यामुळे ती कंपनी उध्वस्त झाली आहे. आणि त्याठिकाणी आज रहेजा कॉप्लेक्स उभा रहात आहे, हजारो घरे त्याठिकाणी बांधली जात आहेत. आमच्या पोलीसांना हप्ते मिळाले की, ते त्या ठिकाणी हजर होतात. आपले जे कर्तव्य करायचे आहे ते करणार नाहीत. परंतु ते विकले गेले की, करु शकतात हे अधिकृतपणे सांगतो. त्या इन्सपेक्टरचे नाव सुध्दा माझ्याकडे आहे. शेवटी अशाप्रकारचे हे विधेयक आपण या ठिकाणी आणून या कामगारांना छळण्याचा प्रकार सुरु करीत आहात याबद्दल मला खूप वाईट वाटते. यामध्ये अजून एक क्लायमॅक्स आपण केला आहे. आपण या विधेयकातील खंड 12 मध्ये "मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, 1946, औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यात, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा तदन्वये काढलेले कोणतेही आदेश प्रभावी राहतील" असे म्हटले आहे. Again you are over-riding the original provisions of Industrial Disputes Act and Bombay Industrial Relation Act. तुम्ही त्यांच्यावर मात करीत आहात. त्यांचे काहीही म्हणणे असले तरी आमचा कायदा सुप्रिम आहे असे म्हणून आपण कामगारांना त्रास देणार आहात. या खंडाचे जस्टिफिकेशन आपल्याकडे काय आहे? या विधेयकातील प्रत्येक क्लॉज तपासून पाहिलातर, हे विधेयक कामगार वर्गाची पिळवणूक करणारे आहे. कामगारांना उध्वस्त करणारा त्या मागचा प्रधान हेतू आहे. मालक वर्गाबरोबर हातात हात मिळवून ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी कामगारांना देशोधडीला लावण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे. तेव्हा या विधेयकाचा उद्देश कामगारांना मदत करण्याचा नाही, जनतेला मदत करण्याचा नाही. कारण अशाप्रकारे संपूर्ण मुंबई शहरामध्ये उध्वस्त झालेला कामगार आहे, त्याचे कुटुंब उध्वस्त झाले आहे. मुंबई शहरामध्ये कोणताही नवीन कारखाना येतच नाही, नवीन आस्थापना नाही. मुंबईमध्ये जे कारखाने होते ते बंद पडले आहेत. आता नवीन कायदा आणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

महाराष्ट्रात 60 टक्के कारखाने बंद पडले आहेत.आणि माननीय ऊर्जा मंत्री म्हणतात की, आम्हाला राज्यामध्ये वीजेचा तुटवडा आहे. ज्या राज्यामध्ये 60 टक्के कारखाने बंद आहेत, ज्या कारखान्यांमध्ये वीजेचा वापर होत नाही तितकी वीज कमी लागते अशा पार्श्वभूमीवर वीजेचे लोडशेडींग केले जात आहे. आज महाराष्ट्रामध्ये 100 टक्के कारखाने चालू असते तर 50 टक्के लोडशेडींग करावे लागले असते. व त्याचे परिणाम जनतेला भोगावे लागले असते. एका बाजूला कामगारांना उध्वस्त केले, जनतेला उध्वस्त केले, जनता उपाशी राहून त्यांचे कुटुंब वाऱ्यावर सोडून आणि त्यामधून डान्स बारसारख्या निरनिराळया प्रवृत्ती निर्माण होत आहेत. आज विद्युत मंडळाचे तीन प्रकारे विभाजन करण्यात येऊन तेथील कामगारांना संपविले जाणार आहे. एस.टी. महामंडळामध्ये सुध्दा भयानक अशांतता आहे. या एस. टी. महामंडळाचे खाजगीकरण हळू हळू करुन त्या महामंडळातील कामगारांना उध्वस्त करण्याचे आपले धोरण आहे. अशाप्रकारची भविष्य काळातील पावले नजरेसमोर ठेऊन अतिशय वाईट हेतूने आणलेले हे विधेयक आहे असा मी त्याचा अर्थ लावीन. या विधेयकाची कोणत्याही प्रकारची आज गरज नसतांना हे विधेयक आपण याठिकाणी आणून महाराष्ट्रातील मेहनत करणाऱ्या कामगार वर्गावर अन्यायाचा वरवंटा फिरविण्यासाठी आपण हे विधेयक आणले असल्यामुळे त्याला आम्ही पाठींबा देणे कदापि शक्य नाही. आम्ही कामगार वर्गामध्ये, जनतेमध्ये नियमितपणे काम करणारी माणसे आहोत. जनतेची नाडी आपल्याला कळणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, जे लोक बाहेरुन येथे येतात, आपण त्याला अपवाद असू शकाल. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून येतात, दुसऱ्या ठिकाणाहून येतात व मंत्री बनतात त्यांना या मुंबईची काळजी नसते, त्यांना आपापल्या भागाची काळजी असते. तरीही या महाराष्ट्राची परिस्थिती अशी आहे. या सर्व पार्श्वभूमीवर अशी विधेयके या महाराष्ट्रामध्ये आणून कामगार वर्गाला चिरडून टाकण्याचे जे उद्योग चालले आहे त्याबद्दल नापसंती व्यक्त करतो. अशा पध्दतीने कामगार वर्गाला नष्ट करणे कदापि शक्य होणार नाही. ते तुमच्यावर बूमरँग झाल्याशिवाय रहाणार नाही. एवढे सांगतो. या विधेयकातील अनेक गोष्टींबाबत भाष्य करु शकतो परंतु माझे सहकारी बोलले असल्यामुळे त्यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही. या विधेयकाला आमचा पाठींबा नाही, त्याला विरोध आहे हे याठिकाणी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आणि हे सांगत असतांना या ठिकाणी आपल्याला प्रत्येक प्रश्नाचा खुलासा द्यावा लागेल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

मी घडयाळ पहात नाही. आम्ही घडयाळ पाहून या सदनात कधी काम केले नाही आणि तुम्ही घडयाळ पध्दतीचे स्पष्टीकरण करावे असे आमचे मत नाही. आम्ही घडयाळाकडे पाहिले असेल तर तसे माननीय सभापतींनी सांगावे की, आम्ही घडयाळाकडे पाहून काम करीत आहोत. आम्ही सकाळी 10.00 वाजता येथे आलो आहोत.

सभापती : आपण सर्वजण सकाळी 10.00 वाजता आलो आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्या सहकारी मित्रांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा आणि नंतर या विधेयकाच्या बाबतीत आपण काय करावयाचे ते पाहू.

. . . .3 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कोकणातील आंबा उत्पादकांचे अकाली पाऊस व गारपिटीमुळे झालेले नुकसान.

मु.शी.: कोकणातील आंबा उत्पादकांचे अकाली पाऊस व गारपिटीमुळे झालेले नुकसान यासंबंधी माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे निवेदन.

श्री.विनय कोरे (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

निवेदन

चालू वर्षाच्या आंबा हंगामामध्ये कोकणात वादळी वा-यासह अकाली पाऊस, गारपीट, हवामानातील बदल इत्यादीमुळे आंबा पिकाचे नुकसान झालेले आहे. या सभागृहातील ब-याच सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून ही बाब सभागृहापुढे आणण्याचा प्रयत्न केला होता. पण ही लक्षवेधी सूचना या सभागृहात येऊ शकली नाही. म्हणून त्सुनामीचे संकट आल्यानंतर हवामानामध्ये जो बदल झाला, त्यामुळे अनेक ठिकाणी वातावरणात बदल झाले. त्यात प्रामुख्याने मोहोर येण्याच्या वेळेला प्रमाणापेक्षा जास्त दिवस वातावरण थंड राहीले. जानेवारी महिन्यात पाऊस पडला. मार्चमध्ये दोन वेळा पाऊस पडला. 3 एप्रिल, 13 एप्रिल आणि 14 एप्रिल रोजी गारपिटीचा मोठा पाऊस झाला आणि फळांचा राजा असणारा हा आंबा आणि महाराष्ट्राच्या फलोत्पादन विभागाचे सर्वात प्रतिष्ठेचे आणि महत्वाचे पीक म्हणून या आंबा पिकाकडे पाहिले जाते. त्या आंबा उत्पादकांचे झालेले नुकसान विचारात घेता, एक विशेष बाब म्हणून आंबा उत्पादकांना मदत देण्याची भूमिका घेतली पाहिजे या भावनेतून आजच झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोकणातील आंबा उत्पादकांना प्रति हेक्टरी रुपये 10,000/- या प्रमाणे एक हेक्टर मर्यादेपर्यंत या हंगामातील उत्पादनक्षम क्षेत्राला मदत देण्याचे शासनाने ठरविलेले आहे.

. . . .3 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

L.A.BILL NO.XXVII OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTIAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु)

श्री.राजेश टोपे(सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, सन्माननीय सदस्य सर्वश्री. जोगेंद्र कवाडेसाहेब, डॉ.दीपक सावंतसाहेब, मधुकर सरपोतदार इ.सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी या बिलावर आपले मत व्यक्त केलेले आहे. मी त्या मतांचे स्वागत करतो आणि सन्माननीय सदस्यांचे निश्चितपणे आभार मानतो.

सभापती महोदय, लोकशाहीची व्याख्या आहे की, लोकांसाठी लोकांनी लोकांकरता केलेले राज्य. मी याठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, हे बिल सामान्य लोकांच्या हिताचे बिल आहे. हे बिल खास करुन जे शासकीय, निमशासकीय किंवा शासन अधिसूचित करेल अशी जी अत्यावश्यक सेवा आहे. अशा अत्यावश्यक सेवेचे कर्मचारी, कामगार जर संप करुन सामान्य लोकांचा जीवन जगण्याचा जो हक्क आणि अधिकार आहे, तो जर बाधित करीत असतील आणि जर सामान्य जनतेला वेठीस धरत असतील तर त्यांना थांबविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाजवळ काही ना काही अधिकार असण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हा काही संपाला विरोध नाही. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, शासन नेहमीच कर्मचारी बांधवांशी आणि कामगारांशी वास्तववादी व सहानुभूतीपूर्वक राहीलेले आहे. मी याठिकाणी अनेक उदाहरणे देऊन सांगू इच्छितो की, शासनाने सातत्याने शासनाच्या कर्मचारी बांधवांच्या, तसेच विविध महामंडळे, मंडळे यातील कर्मचारी बांधवांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने वेळोवेळी अनेक पावले उचललेली आहेत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

श्री.राजेश टोपे (पुढे चालू...

अनेक उदाहरणे देता येतील. पाचवा वेतन आयोग लागू करून 5 हजार कोटी रुपयाचा बोजा आपण अधिक वाढविला. अनेक कल्याणकारी योजना कर्मचारी, कामगारांच्या दृष्टीकोनातून सातत्याने दिल्या. या सगळ्या गोष्टी हेच दर्शवितात. नेहमी सहानुभूतीपूर्वक कामगार, कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने निश्चित प्रकारे शासनाचा प्रतिसाद राहिलेला आहे. या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपल्या मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीकोनातून अनेक मार्ग आहेत. उदाहरणार्थ सामोपचाराने चर्चा करता येते, काळ्या फिती लावून आपला निषेध व्यक्त करता येतो, मोर्चे काढता येतात, आंदोलन करता येते. सभापती महोदय, वेगवेगळया माध्यमातून आपल्या मागण्या मान्य करून घेता येतात..

श्री.मधुकर सरपोतदार : मंत्री महोदयांनी कोणत्या माध्यमातून मागण्या करता येतात याबाबत सांगितले. परंतु ही यंत्रणा गेल्या 50 वर्षापासून अस्तित्वात आहेत. सगळ्या मार्गाने प्रयत्न केले जातात, परंतु शासन गेंड्याची कातडी पांघरून बसले तर कामगारांना, कर्मचाऱ्यांना कोणता न्याय मिळणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी गेंड्याच्या कातडीचा उल्लेख केला, तो रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावा.

सभापती : त्याचा अर्थ कठीण अशाप्रकारचा होतो.

श्री.राजेश टोपे : माझा सांगण्याचा मतितार्थ एवढाच आहे की, सनदशीर मार्ग अनेक आहेत, ते आपल्या मागण्या सनदशीर मार्गाने करू शकतात. संप करणे हा कर्मचाऱ्यांचा कायदेशीर हक्क आहे. परंतु ज्या वेळेला हा संप सामान्य माणसाला वेठीस धरण्यासाठी केला जातो, तेव्हा शासन हाताची घडी, तोंडावर बोट ठेवून पहात बसणार आहे काय, हा सुध्दा या सभागृहासमोर प्रश्न उपस्थित करू इच्छितो. मी आपल्याला उदाहरणा दाखल सांगू इच्छितो की, आज मुंबईतील बेस्ट म्हणजे बॉम्बे इलेक्ट्रीक सप्लाय ॲन्ड ट्रान्सपोर्ट यांच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला तर काय परिस्थिती होईल ? सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला तर काय होईल ? या ठिकाणी सांगू इच्छितो की जाणूनबुजून सामान्य जनतेचे जनजीवन विस्कळित करण्याचा नेहमी प्रयत्न केला जातो. पावसाळा सुरु झाल्यानंतर सफाई कामगार कधी कधी संपावर जातात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय, बोलत असतांना त्यांना सगळया गोष्टींची जाणीव असली पाहिजे, अधिकारी जे माहिती पुरवितात, व्यवस्थित पुरविले पाहिजे. मुंबई महानगरपालिकेमध्ये आजपर्यन्त अनेक संप झाले. संपामध्ये पाणी पुरवठ्याच्या कामगारांनी पाणी बंद केले, तरी त्या चाव्या मोकळया सोडून जनतेची सोय करून निघून जातात. हे आपल्याला माहीत नाही. आपण मघापासून जे सांगत अहात, त्याबाबत मला अत्यंत दुःख होते. मंत्री महोदयांना नक्की काय सांगायचे आहे, ते कळत नाही. जे निवेदनामध्ये आलेले आहे, त्याबाबतीत आपल्याही लक्षात आले असेल. कामगारांना अनेक मार्ग आहेत. त्यांनी काळ्या फिती लावव्यात, त्यांनी मोर्चे काढावेत, आंदोलने करावीत, हे सगळे केल्यानंतर जेव्हा तो जेरीला येतो, तेव्हा तो संपाचे हत्त्यार उपसतो. तो डायरेक्ट संपावर येत नाही. शासकीय यंत्रणेवर मंत्री महोदय अविश्वास दाखवितात. कोणताही संप होत असतांना, युनियनच्या संबंधाने कायद्यामध्ये तरतुदी आहेत. एक तर लेबर कोर्ट आहे, त्याही पलिकडे कोणत्याही कामगार संघटनेला 15 दिवसाची नोटीस दिल्याशिवाय संप करता येत नाही. अन्यथा तो संप बेकायदेशीर होतो. अशाप्रकारची नोटीस संबंधितांना मिळाल्यानंतर त्यांनासुध्दा त्या संपाला प्रतिरोध करण्याचा पूर्ण अधिकार असतो. आतापर्यन्त मुंबईतील आणि महाराष्ट्रातील अशा तातडीच्या सेवेच्या संदर्भातील अनुभव असा आहे की, अशाप्रकारची नोटीस दिल्यानंतर ज्या ज्यावेळेला संबंधित प्रशासन कोर्टामध्ये जाते, त्यावेळेला कोर्ट तातडीने जनतेच्या हिताच्या दृष्टीने त्याचे हिअरींग घेत असते, हा अनुभव आहे. त्यामुळे आतापर्यन्तच्या सगळ्या माहितीमध्ये जे मंत्री महोदय निवेदन करत आहेत, विवेचन करत आहेत, ते दुर्दैवाने अज्ञानावर अवलंबून आहे, हे मी निदर्शनास आणून देतो.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

सभापती महोदय, या ठिकाणी "अज्ञानावर आधारित" अशा पध्दतीचा उल्लेख करण्यात आला.तशा पध्दतीचा हा विषय नाही. मी याठिकाणी उदाहरण असे दिले की, "असे जर घडले तर" ठीक आहे. त्यांनी पाणी सोडून देण्याचा विषय असू शकेल. त्यांचा तो मार्ग असेल. परंतु संप करुन जर ते कुठल्याही थराला गेले तर मी या ठिकाणी उदाहरण देत होतो की, अशा पध्दतीने सामान्य लोकांचा सुरळीत जीवन जगण्याचा जो अधिकार आणि हक्क आहे त्याला कुणी बाधा आणीत असतील तर सभापती महोदय, त्यांना परावृत्त करणे हे शासन म्हणून त्या ठिकाणची गरज आहे. म्हणून मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, यामध्ये शासन पाहिजे तशा पध्दतीने हे करु शकणार नाही. अधीसूचनेत कुठलिही अत्यावश्यक सेवा आपण घेऊ शकू अशातला प्रकार नाही. त्याबाबतीत या ठिकाणी कलम तीनमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, जर अधिसूचित केलेली एखादी अत्यावश्यक सेवा असेल आणि जर सभागृहे चालू असतील तर त्याला दोन्ही सभागृहाची मंजुरी लागेल. आणि सभागृह चालू नसेल तर येणारा लगतचा अधिवेशनचा कालावधी असेल त्यामध्ये त्याची मंजुरी घेतली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे याबाबतीत शासन संपूर्णपणे मनमानी पध्दतीने काम करु शकेल अशातला प्रकार नाही. मी या ठिकाणी एवढीच अधिक माहिती सांगू इच्छितो की, शासन ज्या ज्यावेळी हा अधिकार वापरेल त्या त्यावेळी हा नेहमीच काळजीपूर्वक वापरावा लागतो. शासन हे नेहमी लोकहिताचेच काम करणारे शासन असते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत हा अधिकार स्वार्थासाठी किंवा एखादा संप चिरडून टाकण्यासाठी शासनाने वापरलेला नाही. त्यामुळे नेहमीच काळीपूर्वक वापरण्याचा हा अधिकार आहे. मी याची अधिक माहिती आदरणीय दादांना देखील देऊ इच्छितो. हा कायदा 1970 पासून आपल्या राज्यात सुरु आहे. दर पाच वर्षांनी आपण त्याला रिन्यू करतो.रिन्यूचा अर्थ आपण परत एकदा नवीन बिल आणून त्याला सभागृहाची मंजुरी घेतो आणि पाच वर्षाकरिता परत हा कायदा अस्तित्वात आणतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत श्री. अरविंद सावंत या सगळयांनी 1999 मध्ये केलेली भाषणे माझ्याकडे आता उपलब्ध आहेत. सन्माननीय सभापती महोदय, या सर्व सदस्यांनी त्यावेळी या कायद्याचे मोठ-मोठे लांबलचक समर्थन दिलेले आहे. त्यामुळे आपण नुसते इकडून तिकडे गेलात म्हणून आपली भाषा इतकी बदलावी, असे मला किमान सावंत साहेबांकडून तरी अभिप्रेत नाही. त्यामुळे सभापती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

महोदय, मला एवढेच सांगायचे आहे की, हा जुना कायदा आहे. तो मार्च,2005 च्या दरम्यान संपुष्टात आल्यामुळे आपण याला परत एकदा अधिनियमित करण्याच्या दृष्टीकोनातू सभागृहासमोर आणलेले आहे. हा कायदा फक्त आपल्या राज्यात आहे असे नाही. तो केंद्र शासनात आहे. आपल्या आजूबाजुच्या अनेक राज्यांमध्ये हा कायदा आहे. त्यामुळे सभापती महोदय, मी एवढेच सांगेन की, सर्वसामान्य माणसाचे जीवन सुरळीत राहावे, लोकहित जपले जावे यादृष्टीकोनातून हे बिल आणलेले आहे. त्यामुळे सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करु इच्छितो की, सभागृहाने या बिलाला मान्यता द्यावी.

सभापती :आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो. अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे. ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे ("नाही" चे आवाज)"होय "चे बहुमत आहे.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

सभापती : ठीक आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विभाजनाची घंटा वाजविण्यात आली)

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विभाजनाची घंटा वाजविण्यात आली.)

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विभाजनाची घंटा वाजल्यानंतर आणि अनुकूल/प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर)

सभापती : विभाजनाचा निकाल असा आहे :-

अनुकूल : 19

प्रतिकूल : 14

प्रश्न संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005चे वि.स.वि. क्रमांक 27 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2005चे वि.स.वि.क्रमांक 27 संमत झाले आहे.

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: माहितीच्या मुद्याबाबत

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माहितीच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. दिनांक 30 मार्च 2005 रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, जी माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवलेली आहे त्यासंदर्भात मा.सदस्य पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित करीत आहेत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशांचा अवमान होऊ नये म्हणून माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी पॉईन्ट ऑफ प्रोसिजरवर उभा आहे.

(काही मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : काल सांगितल्या प्रमाणे मा.मंत्री महोदयांनी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवलेले आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, आपण निदेश दिले होते की, 15 दिवसाच्या आत, हे अधिवेशन संपण्यापूर्वी....

सभापती : मा.सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांना मी सांगू इच्छितो की, 30 मार्च 2005 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने काल जेव्हा या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला त्यावेळी मी मंत्र्यांना "उद्यापर्यन्त निवेदन करावे" अशी सूचना केली होती. त्यानुसार आज मंत्री महोदयांनी निवेदन पटलावर ठेवलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कॅबिनेटसमोर नेऊन येत्या 15 दिवसाच्या आत म्हणजेच अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर करावा असे आपण निदेश दिलेले आहेत. यासंदर्भात काय झाले ?

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत काल जी चर्चा झाली. त्यावेळी आपण अट्टाहास केला. त्याप्रमाणे मी संबंधित विभागास सूचना दिल्या. त्या सूचने प्रमाणे विभागाने आज निवेदन केलेले आहे. आता हा विषय संपलेला आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पॉईंट ऑफ प्रोसीजरसंबंधी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नुकतेच एक विधेयक सभागृहात मंजूर झालेले आहे. त्यानंतर आता आमच्या समोर जवळपास पाच ते सहा विधेयके आलेली आहेत. अजून आमच्या समोर आज किती विधेयके येतील याची मला माहिती नाही. विधेयक पास करतो, त्यावेळी त्या विधेयकावर सविस्तर चर्चा करीत असतो. सदस्यांकडून सूचना घेतल्या जात असतात. त्या विधेयकावर सखोल अशी चर्चा नंतर विधेयक पास करण्यात येत असते. कारण आपण कायदा करीत असतो म्हणून या सर्व गोष्टी करीत असतो. कारण प्रत्येक कायदा हा जनतेशी निगडीत असतो. या कायद्याचा राज्यावर परिणाम होत असतो. सभापती महोदय, विधानपरिषद नियमाच्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक 79 वरील नियम 141 मधील तिस-या परिच्छेदातील तिसरा नियम मी या ठिकाणी वाचून दाखवितो. " परंतु आणखी असे की, विधानसभेने संमत केलेल्या व नंतर विधानपरिषदेकडे पाठविण्यात आलेल्या विधेयकाच्या बाबतीत, सभापतींनी ही तरतूद स्थगित करण्याच्या आपल्या अधिकाराचा वापर करुन प्रस्ताव करण्यास अनुज्ञा दिलेली नसेल तर,असा कोणताही प्रस्ताव विधानसभेने संमत केलेल्या सुधारणांची एक प्रत सदस्य निवडील त्यानुसार त्यांचा हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील अनुवाद आणि सुधारणा केल्याप्रमाणे विधेयकाची मराठीतील प्रत यांसह असा प्रस्ताव ज्या दिनांकास मांडण्यात येईल त्या दिनांकापूर्वी दोन पूर्ण दिवस आधी प्रत्येक सदस्यास पाठविण्यात आलेली असल्याशिवाय विधानपरिषदेत मांडण्यात येणार नाही." माननीय सभापतींनी त्याला स्थगिती दिली असेल तर ते मला मान्य आहे. एखादी अत्यंत तातडीची बाब असेल, एखादे विधेयक महत्वाचे असेल, व त्या विधेयकाला खूप महत्व असेल तर आपल्या स्थगितीला या सभागृहाने सन्मानीत करुन त्याप्रमाणे चर्चा करुन ते विधेयक पास करुन घेणे एवढी गोष्ट मी समजू शकतो. परंतु पाच-पाच, सहा-सहा विधेयके काही मिनिटांच्या आत पारित करुन टाका, ती विधेयके मंजूर करुन टाका आणि एकदाचे अधिवेशन संपवा, अशी जर परिस्थिती असेल तर ती बरोबर नाही. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. किमान हे अधिवेशन दीड महिना चालावे अशी अपेक्षा असते. मघाशी मी पणन मंत्र्यांना मी असा प्रश्न विचारला होता की, कापसाच्या बाबतीत तुम्ही काय करणार आहात ? अधिवेशन संपता संपता शेतक-यांना पैसे देऊ असेही त्यांनी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सांगितले होते त्यासंदर्भातही विचारणा मी केली होती. त्यासंदर्भात त्यांनी " होय " असे उत्तर दिले. आम्ही शब्द दिलेला आहे. 29 तारखे पर्यन्त अधिवेशन जाहीर झालेले आहे. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. हे अधिवेशन 29 तारखे पर्यन्त जाहीर झाले असेल तर आम्ही ही विधेयके 29 तारखेपर्यन्त मंजूर करु. 29 तारखे पर्यन्त अधिवेशन चालू ठेवा. आम्ही या विधेयकावर चर्चा करण्यास तयार आहोत. आता जवळपास सायंकाळचे 6.00 वाजले आहेत. अधिवेशनचा शेवटच्या दिवसाचे कामकाज हे 4.00 वाजेपर्यन्त संपवावयाचे असते अशी आपल्याकडे प्रथा आहे. सभागृहाच्या गटनेत्याच्या मान्यतेने विधेयके घेण्याचे ठरविले होते.आज सकाळपासून आपण विधेयके चर्चेला घेत आहोत. आपल्याकडे विधानसभेकडून विधेयके यावयाची होती म्हणून सभागृह अडीच तास तहकूब करावे लागले. आजचे सभागृहापुढील कामकाज 4.00 वाजेपर्यन्त संपविणे आवश्यक होते. सभागृह अडीच तास बंद केले होते त्यात आपला वेळ गेलेला आहे. आम्ही सभागृहाचा वेळ भरुन दिलेला आहे. पूर्ण दिवसभराचे कामकाज आम्ही केलेले आहे. नियमाप्रमाणे विधेयके येणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अचानकपणे विधेयके येत असतील तर ते योग्य होणार नाही. आम्हाला आमची मते मांडता येणार नाही. आपण मघाशीच बघितले कामगारांसंबंधीचे विधेयक किती विचित्र होते. विधेयकांच्या बाबतीत सखोल चर्चा होणे आवश्यक असल्यामुळे आता संपूर्ण दिवसाचे कामकाज थांबवावे. आपण इतर विधेयकासाठी अधिवेशनाचा कालावधी वाढवा किंवा पुढच्या अधिवेशनात चर्चेसाठी ठेवा. सभापती महोदय, शेतक-यांना पैसे देण्याची तारीख शासनाने 29 गृहीत धरलेली आहे. ही विधेयके आताच्या आता पास करा . आम्ही ती विधेयके कशी काय पास करणार?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अधिवेशनाचा कार्यक्रम 29 तारखेपर्यन्त होता. 29 तारखे पर्यन्त अधिवेशन चालवावे अशी शासनाची भूमिका होती. परंतु आता ते कमी का झाले याचे कारण शोधण्याचा या ठिकाणी प्रयत्न होत असेल तर मी सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीमध्ये सर्व पक्षांचे सन्माननीय गटनेते उपस्थित होते. त्या बैठकीस माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते, उप मुख्यमंत्री उपस्थित होते. दोन्ही सभागृहाचे अध्यक्ष, सभापती उपस्थित होते. कामकाज सल्लागार समितीमध्ये अधिवेशनाचा कार्यक्रम 16 तारखे पर्यन्त निश्चित करण्यात आला. तसेच तो कार्यक्रम सभागृहात जाहीर करण्यात आलेला आहे. एकदा कार्यक्रम

3....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाहीर झाल्यानंतर अधिवेशन वाढविण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित करणे आणि सभागृहाचा वेळ घेणे उचित वाटत नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी आता कामकाज सल्लागार समितीचा हवाला दिला गेला. बीअेसी च्या बैठकीत असे ठरले होते की, 15 आणि 16 असे दोन दिवस अधिवेशनाचे कामकाज घ्यावयाचे. या दोन दिवसामध्ये किती बिले चर्चेला घ्यायची अशी चर्चा बैठकीत झालेली नाही. आज 4-5 बिले चर्चेसाठी येतील अशी अपेक्षा होती. आज सकाळी 10 वाजल्यापासून प्रश्नोत्तरे,लक्षवेधी,93 च्या सूचना इ. कोणतेही कामकाज न होता केवळ बिले चर्चेला घेतली जात आहेत. या सभागृहाच्या काही प्रथा आहेत,नियम आहेत आणि पध्दती आहेत त्याप्रमाणे काम चालले पाहिजे. सभापती महोदय, तुम्ही आम्हांला संरक्षण द्या. नियमावली केलेली आहे,नियमाचे पुस्तक प्रत्येक सदस्याला दिलेला आहे त्या नियमानुसार सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे. असे संकेत असताना सरकारला मात्र हया अधिवेशनाचा कालावधी कमी करुन बिले मंजूर करुन घेण्याची घाई झालेली आहे. खरे म्हणजे 29 एप्रिलपर्यंतचा कार्यक्रम होता. आताच जे बिल मंजूर करण्यात आले ते भयंकर स्वरुपाचे होते आणि लोकशाहीची हत्या करणारे बिल असताना सुध्दा घाईगर्दीने मंजूर करण्यात आले. यानंतर कूळकायदा आणि नगररचना यासंबंधीची अत्यंत महत्वाची बिले आहेत. हे बिले आम्हांला फक्त 15 मिनिटांपूर्वी मिळाली आहेत. अजून त्यातील कागदही उलटून पाहण्याची संधी मिळाली नाही. इतक्या घाईगर्दीने बिले मंजूर करणे याचा अर्थ सभागृहाच्या प्रथेविरुध्द काम चालले आहे. म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज येथेच थांबवावे आणि राहिलेली बिले पुढील अधिवेशनाच्या वेळी चर्चेला घ्यावीत अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहाच्या प्रोसिजर संबंधी मुद्दा उपस्थित केला आणि त्या अनुषंगाने मा.सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्यावर आपले विचार व्यक्त केले. मा.विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा याबाबतची वस्तुस्थिती याठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मी एवढेच सांगेन की, सदनामध्ये कोणत्या पध्दतीने काम चालावे किती कामकाज चालावे हे ठरवीत असते. यादृष्टीने 29 तारखेपर्यंतचा मूळ कार्यक्रम आपण अपेक्षित करीत होतो. कामकाज सल्लागार समितीमध्ये उपलब्ध कामकाज, झालेले कामकाज व उपलब्ध असणारे कामकाज आणि त्यासाठी किती वेळ लागेल याची चर्चा आपणा सर्वांच्या समोरच एकत्रित झालेली आहे. त्यानंतर असा निर्णय घेतला की, संपूर्ण कामकाज पूर्ण करण्याकरिता 16 तारखेपर्यंत हे अधिवेशन पूर्ण करावे आणि त्याअनुषंगाने आपण कार्यक्रम निश्चित केला. काल संध्याकाळपर्यंत

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती ....

कामकाज झाले त्यावेळी सुध्दा याठिकाणी अशी अपेक्षा होती की, अशासकीय कामकाज आज सकाळी घ्यावे. शासकीय कामकाज जे आज झाले त्यापैकी काही काल घ्यावे.पण काल रात्री 9.00 वाजल्यानंतरही कामकाज केले आणि काल आपण असा निर्णय केला की ,शासकीय कामकाज काल करणार होतो ते काल केले नाही. आणि अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनापर्यंत पुढे ढकलण्यात यावे असा निर्णय घेतला आणि शासकीय कामकाज जे आज कार्यक्रमपत्रिकेवर आहे ते कामकाज आज घेण्याचे आपण निश्चित केले. बीअेसी च्या बैठकीमध्ये आपण असा निर्णय घेतला की 16 तारखेला ता.प्र.,लक्षवेधी,किंवा अन्य कोणतेही कामकाज न करता जी शासकीय बिले आहेत ती बिले पूर्ण करण्यात यावीत असे ठरले. त्या अनुषंगाने कार्यक्रमपत्रिकेवर असणारी बिले आणि त्याव्यतिरिक्त विधानसभेने मंजूर केलेली आणि कार्यक्रमपत्रिकेवर असलेली अशी बिले पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण सभागृहात बसणे हे अपेक्षित आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती ..

सभापतींना एखादा नियम काही काळाकरिता स्थगित करण्याचा जो अधिकार आहे त्या अधिकाराचा वापर करुन मी असा निर्णय देत आहे की, जी विधेयके राहिलेली आहेत ती आता घेण्यात यावीत.

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्णयाचा आदर करुन मी बोलत आहे. कामकाज व्हावयास पाहिजे हे आम्हालाही मान्य आहे.यासंबंधी मी काल उल्लेख केला होता आणि आजही पुन्हा उल्लेख करीत आहे.अशा प्रकारे काम चालविण्याच्या पध्दतीमुळे या सदनातील लोकप्रतिनिधींना वेठीला धरले जात आहे. हे योग्य आहे काय ? काल आपण असे सांगितले की आज आपण सकाळी 10.00 वाजता कामकाज सुरु करु या. त्याप्रमाणे आज सकाळी 10.30 पासून आपण कामकाज.करीत आहोत.मध्ये अडीच तास काहीही काम नसल्यामुळे आम्हाला बसून ठेवण्यात आले होते.खालच्या सभागृहातून विधेयके आलेली नसल्यामुळे या ठिकाणी कोणतेही काम नव्हते.आज 6.30 वाजेपर्यन्त कामकाज केल्यानंतर पुन्हा आज रात्री 10.00 वाजेपर्यन्त,12.00 वाजेपर्यन्त कामकाज करु असे आपण सांगत आहात. तेव्हा आपण असे सांगा की, विधेयकावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी काहीही बोलावयाचे नाही विधेयके वाचावयाची नाहीत किंवा त्यावर चर्चाही करावयाची नाही.फक्त विधेयक मतास टाकल्यानंतर सर्वानी " होय " असे म्हणावे आणि विधेयक मंजूर करुन टाकावे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की,आपण जे कामकाज करतो ते कामकाज करीत असतांना लक्षवेधी सूचना असो किंवा अन्य कोणतीही आयुधे असोत. त्या संदर्भात प्रश्न विचारण्यासाठी मी सन्माननीय सदस्यांना जास्तीत जास्त संधी दिली आहे. ही संधी जर मी दिली नसती तर जो वेळ वाचला असता तो वेळ कालसुध्दा शासकीय विधेयकासाठी उपलब्ध झाला असता.दररोज तीन लक्षवेधी सूचना घेतल्या पाहिजेत असा नियम आहे.परंतु माननीय मंत्रिमहोदयांवर कामाचा जास्त बोजा पडला असतांनासुध्दा मी काल अकरा लक्षवेधी सूचना घेतल्या होत्या. त्या मागचा माझा उद्देश एवढाच होता की, या आयुधाच्या माध्यामातून जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना संधी मिळावी. त्यामुळे काल जे काही शासकीय कामकाज व्हावयाचे होते ते शासकीय कामकाज काल होऊ शकले नाही.काल आपण अल्पकालीन चर्चा घेतली होती. त्यामुळे कालच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज आज आपण घेतलेले आहे.आज फक्त विधेयकासंबंधीचे कामकाज ध्यावयाचे आहे.म्हणून मी जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे आता विधेयके घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, आपण जो निर्णय दिलेला आहे तो मान्य करुन मला हे सांगावयाचे आहे की, रोज सकाळी 10.00. वाजल्यापासून रात्री 10.00 वाजेपर्यन्त आपण कामकाज पूर्ण करीत आहोत. कामकाज पूर्ण करण्यासाठी आम्ही आपल्याला सहकार्य केलेले आहे. सकाळी 10.00 वाजता बैठक घ्यावयाची असे सागितल्यानंतर आम्ही सकाळी 10.00 वाजता येथे आलेलो आहोत. तेव्हा 12.00 वाजता कामकाज घेण्यात यावे असे आम्ही म्हटलेले नाही.आता 6.30 वाजत आहेत.

. **सभापती** : तुम्ही सगळयांनी सहकार्य केलेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जो निर्णय घेतलेला आहे तो आम्हाला मान्य आहे परंतु सकाळी 10.00 वाजल्या पासून आम्ही येथे बसलेलो आहोत.

श्री.जितेन्द्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. 3 सन्माननीय सदंस्याचें म्हणणे विचारात घेऊन आपण निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयावर सन्माननीय सदस्यांनी पुन्हा वाद घालणे शोभा देणारे नाही. इतर वेळी आम्हाला असे सांगण्यात येते
की, माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे तेव्हा तुम्ही काहीही न बोलता खाली बसावे.तेव्हा आपणही त्यांना आता असे सांगावे की, याबाबत रुलिग देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यावर काहीही न बोलता पुढचे कामकाज करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,या सदर्भात आपण जो काही निर्णय दिलेला आहे त्यासबंधीचा हा विषय नाही.आपण निवेदन केल्याप्रमाणे रात्री 12.00 वाजेपर्यन्त बसून विधेयके आम्ही पास केली असती. दुसरी गोष्ट अशी की, आज सकाळी 10.00 वाजल्यापासून तुम्ही आम्हाला बोलावले असून त्याप्रमाणे आम्ही आलो आहोत पण मध्ये अडीच तास काहीही काम नव्हते. 11 लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊन आपण आम्हाला न्याय दिला आहे. त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती : या संदर्भात मी माझा निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे आता सन्माननीय मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडावे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

पृ.शी. : प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2005.

L.A BILL NO.L OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधानसभेत संमत झालेल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 50 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

(विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत आपल्या समोरील कागदपत्रे सभागृहामध्ये भिरकावून देऊ लागतात...)

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये अशा प्रकारे कागदपत्रे फेकणे हे कोठल्याही प्रकारे शिस्तीला धरून नाही, योग्य नाही. आपली ज्येष्ठता विचारात घेता, आपणास कोठल्याही गोष्टीबद्दल क्षोभ झाला तरी सभागृहामध्ये अशा प्रकारे कागदपत्रे फेकणे हे तत्त्वामध्ये बसत नाही. ...

(विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत, कागदपत्रे भिरकावित 'वेल' मध्ये येतात ... गोंधळ ..)

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 50 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

माननीय सभापती महोदय, हा प्रस्ताव मांडत असताना या विधेयकाबाबत मी इतकेच सांगू इच्छितो की, केंद्र सरकारच्या एकात्मिक नगररचनेशी सुसंगत धोरण राज्य सरकारने आखलेले आहे. त्या ठिकाणी सर्व सामान्यांना घरे उपलब्ध व्हावीत., शहरांतील दाटीवाटी कमी व्हावी या दृष्टीने हे विधेयक मुद्दामहून येथे आणलेले आहे. म्हणून मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, कलम 159 रेग्युलराईज करण्याचे अधिकार आपण घेतलेले आहेत. त्यामुळे डी.सी.नियम करण्यात येतील तेव्हा सर्वांच्या हरकती, सूचना घेऊनच नंतर त्या संमत करण्यात येतील. त्यामुळे या विधेयकाला आपण सर्वांनी मान्यता द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

..... 3डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... गोंधळ ...)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □ीडश: विचारात घे□यात येईल.

□ीड 2 ते 5 विधेय□ाचे भा□ झाले.

□ीड 1, संपू□ शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□ाचे भा□ झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अ□ुमती□ स□ 2005 चे वि.स.वि. □50 संमत □र□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□ मतास टा□ू□ संमत झाला.

सभापती : स□2005 चे वि.स.वि. □मां□ 50 संमत झाले आहे.

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत बसून राहतात.... गोंधळ..)

..... 3डब्ल्यू 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कुळवहिवाट व शेतजमीन कायदे (सुधारणा) विधेय□ 2004.

L.A. BILL NO.XLIII OF 2004.
(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948, THE HYDERABAD TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1950 AND THE BOMBAY TENANCYAND AGRICULTURAL LANDS (VIDARBHA REGION) ACT, 1958.)

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, विधा□सभे□ संमत □ल्याप्रमा□ मी आपल्या अ□मती□ स□ 2004 चे वि.स.वि. □मां□ 43 - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,1950 व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम,1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अ□मती□ स□ 2004चे वि.स.वि. □मां□ 43 - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,1950 व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम,1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत बसून राहतात ..... गोंधळ ...)

प्रश□मतास टा□□ संमत झाला.

सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □डश: विचारात घे□यात येईल.

□डे 2 ते 5 विधेय□चे भा□ झाले.

□डे 1, संपू□ शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□चे भा□ झाले.

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत बसून राहतात ..... गोंधळ ...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2004 चे वि.स.वि. क्र.43 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्नमतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2004 चे वि.स.वि. क्रमांक 43 संमत झाले आहे.

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये घोषणा देत बसून राहतात ..... गोंधळ ...)

(यानंतर श्री.जागडे ..... 3एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

पृ.शी. : जमीन महसूल संहिता (सुधारणा)विधेय□

L.A. BILL NO. XLVI OF 2004.
(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

डॉ. राजेंद्र शिगणे (महसूल राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, विधा□सभे□ संमत □ल्याप्रमा□ मी आपल्या अ□मती□ स□ 2004 चे वि.स.वि. □मां□ 46, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

डॉ.. राजेंद्र शिगणे (महसूल राज्यमंत्री): महोदय, मी आपल्या अ□मती□ सन 2004 चे वि.स.वि. □मां□ 46 , महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□ मतास टा□□ संमत झाला.

सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □□डश: विचारात घे□यात येईल.

□□ड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेय□चे भा□ झाले.

□□ड 1, संपू□ शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□चे भा□ झाले.

डॉ. राजेंद्र शिगणे : महोदय, मी आपल्या अ□मती□ स□ 2004 चे वि.स.वि.क्र.46 संमत □र□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□ मतास टा□□ संमत झाला.

सभापती : स□ 2004 चे वि.स.वि. □मां□ 46 संमत झाले आहे.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : औद्योगिक संबंध (सुधारणा)विधेय□

L.A. BILL NO.XLVI OF 2004.
(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY INDUSTRIAL RELATIONS ACT, 1946.)

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, विधा□सभे□ संमत □ल्याप्रमा□ मी आपल्या अ□मती□स□2004 चे वि.स.वि. □मां□ 64, मुंबई औद्योगिक अधिनियम, 1946 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) महोदय, मी आपल्या अ□मती□ सन 2004 चे वि.स.वि. □मां□ 64 , मुंबई औद्योगिक अधिनियम, 1946 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □डश: विचारात घे□यात येईल.

□डे 2 विधेय□चे भा□झाला.

□डे 1, संपू□शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□चे भा□झाले.

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री): महोदय, मी आपल्या अ□मती□स□2004 चे वि.स.वि.क्र. 64 संमत □र□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□मतास टा□□संमत झाला.

सभापती : स□2004 चे वि.स.वि. □मां□ 64 संमत झाले आहे.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वेतन प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. LXV OF 2004
(A BILL FURTHER TO AMEND THE PAYMENT OF WAGES ACT, 1936, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधा-ासभे-ा संमत □ल्याप्रमा□,मीआपल्या अ-ुमती-ा सन 2004 चे वि.स.वि. □मां□ 65 वेतन प्रदान अधिनियम, 1936, महाराष्ट्र राज्यास लागू असताना,त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती : विधेय□ मांड□यात आले आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : महोदय,मी आपल्या अ-ुमती-ा स-ा 2004 चे वि.स.वि. □मां□ 65 वेतन प्रदान अधिनियम, 1936, महाराष्ट्र राज्यास लागू असताना,त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □ांडश: विचारात घे□यत येईल.

□ांड 2 विधेय□ाचा भा□ झाला.

□ांड 1,संपू□ शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□ाचे भा□ झाले.

श्री. बाबा सिद्दीकी : महोदय, मी आपल्या अ-ुमती-ा स-ा 2004 चे वि.स.वि.□मां□ 65 संमत □र□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्-ा मतास टा□-ा संमत झाला.

सभापती : स-ा 2004 चे वि.स.वि. □मां□ 65 संमत झाले आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सत्रकालातील कामकाजाचा आढावा

सभापती : महाराष्ट्र विधान परिषद - पहिले अधिवेशन, मार्च - एप्रिल 2005

सोमवार, दिनांक 14 मार्च ते शनिवार, दि. 16 एप्रिल, 2005

बैठकींची एकूण संख्या :	24
एकूण कामाचे तास :	162 तास 19 मिनिटे
प्रत्यक्षात झालेले कामकाज :	158 तास 09 मिनिटे
नियमाप्रमाणे अपेक्षित कामकाज : (दररोज 4 तास या प्रमाणे)	96 तास
वाया गेलेला वेळ :	4 तास 10 मिनिटे
रोजचे सरासरी कामकाज :	7 तास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु.शी. : पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

सभापती : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, "महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 11 जुलै, 2005 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"मी एस.एम.कृष्णा, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे शनिवार, दिनांक 16 एप्रिल, 2005 रोजी होणा-या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

यानुसार विधानपरिषदेचे अधिवेशन आता संस्थगित झाल्याचे मी जाहीर करतो.

(6 वाजून 46 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही